
माणूस
१५ जुलै १९६५ : किं. ३० पैसे
युद्ध जिंकले!
तह हरले!!

**श्रेष्ठ साहित्याचा संग्रह**
**किफायतशीर गुंतवणूक**

# राजा शिवछत्रपती

**ब. मो. पुरंदरे**

- मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)
- उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठे
- ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे

**किंमत ३६ रुपये**

**१०० रुपयांची ठेव**
**५ वर्षांसाठी**

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.
- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी

राजहंस प्रकाशित
पुणे

४१९ नारायण, पुणे




वर्ष पाचवे : अंक चवथा : १५ जुलै १९६५ : तीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

---

अल्जीरियातील क्रांती आणि कच्छ प्रकरण या दोन राजकीय घटनांनी गेला पंधरवडा गजबजून गेला. याचा परिणाम साहजिकच या अंकावर झाला. कच्छ प्रकरणी 'माणूस' ची प्रतिक्रिया काय, अशी विचारणा करणारी वाचकांची पत्रे आली. मुखपृष्ठव अंकातील अग्रलेख यावरून ती स्पष्ट होईलच. अल्जीरियाचा प्रश्नही महत्त्वाचा असल्याने एक माहितीपूर्ण लेख या अंकात दिला आहे. शिवाय 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ही चालू लेखमाला आहेच. राजकीय विषयांची अंकात त्यामुळे थोडी दाटी झाली व 'क्रीडा' व 'लेखनवाचन' ही नेहमीची दोन सदरे कमी करावी लागली.

राजकीय, ललित, सांस्कृतिक, निव्वळ करमणूकप्रधान इत्यादी सर्व तऱ्हेच्या साहित्याचा समतोल राखण्याचा 'माणूस' चा नेहमीचा प्रयत्न असतो. पण केव्हा केव्हा परिस्थितीप्रमाणे बदल करावा लागतो, इतकेच. —संपादक

## या अंकातील ललित साहित्य

**कथा** : ● प्रवासातील एक बर्थ
□ **चंद्रप्रभा जोगळेकर**
● कोकरांची कथा
□ **राम पं. साठे**


**ललितलेख** : ● पान्हा फुटायचा असताना
□ **दत्ता मुकुंद सावंत**

**कविता** : ● कुमुदिनी आपटे, चंद्रकांत पाटील

याशिवाय नेहमीची सर्व सदरे

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



## दिल्ली दरबार

# □ रेगिस्तानचे राजधानीवरील आक्रमण

भारताच्या राजधानीला यंदा भरपूर धुळीचा प्रसाद मिळत आहे. धुळीच्या वादळांचे (डस्ट स्टॉर्मस) प्रमाण वाढले असून, राजस्थानचे रेगिस्तान (वाळवंट) राजधानीवर अधिक वेगाने आक्रमण करून येत आहे की काय, अशी साधार शंका प्रकट होऊ लागली आहे. वाळवंटाची ही दिल्लीच्या रोखाने द्रुतगतीने चालू असलेली वाटचाल कशी थोपविता येईल, याची चिंता जोधपूर येथील संशोधनशाळेत (Arid Zone Research Institute) व्यग्रतेने केली जात आहे. परंतु अद्याप त्या संशोधनांत अपेक्षित सफलता प्राप्त झालेली नाही असे कळले. दिल्लीतील माहीतगार व अनुभवी मंडळींचे म्हणणे असे आहे, की वाळवंटाची वाटचाल सध्या तरी बव्हंशी यमुना नदीच्या प्रवाहामुळेच थोपवून धरल्यागत झालेले आहे. दिल्लीच्या आसमंतात आजपर्यंत (७ जुलै) पावसाळ्याचा प्रारंभ झालेला नसला, तरी गेल्या सहा-सात सप्ताहात येथे धुळीचा वर्षाव मात्र भरपूर झालेला आहे. आज दुपारपर्यंतचाच अनुभव असा आहे, की गेले चार तास सतत ‘धूळवादळ’ चालू असून सुमारे अर्धा मैल अंतरापलीकडे, धूलीमय धूसर हवामानामुळे, दिसेनासे झालेले आहे! येथे यंदा मे महिन्यात उन्हाळा जवळजवळ भासलाच नाही. परंतु मे महिन्याच्या शेवटच्या चार दिवसांपासून जी धूळ वादळे चालू आहेत त्यामुळे मात्र दिल्लीकरांची दुर्गति झालेली आहे! जून महिन्यात तपमानही अधिक राहात असे. त्यामुळे तापलेल्या धुळीच्या वर्षावात वावरताना आगीतून फोफाट्यात पडल्यागतच अनुभव येत होता. धूळवादळामागोमाग पाऊस पडावा, असा आजपर्यंतचा संकेत असे. परंतु निसर्गाने यंदा अद्याप तरी त्या प्रकारचा सुखद अनुभव आणून दिलेला नाही. यामुळे खुद्द राजधानीत बर्फाचे भाव कडाडून कित्येक प्रसंगी बाजारातून बर्फ अदृश्य झालेला

दिसत असे ! नव्या जमान्यातील 'कोकाकोला' हे लोकप्रिय पेय तर ज्या दिल्ली-करांना गेल्या सात सप्ताहांत नियमितपणे प्राप्त झालेले असेल, ते स्वतःला अती भाग्यवान् मानू लागलेले आहेत. ज्यांच्या कोमल त्वचेला घामोळ्यांचा स्पर्श ज्ञात नव्हता असे अनेक नागरिक यंदा (आंबे न खाताही) घामबेंडे मिरविताना संकोच प्रकट करू लागले आहेत !

## □ विरोधी खासदारांच्या सरबत्तीचा धसका

दिल्ली दरबारातही यंदा नैसर्गिक हवामानातील धुळवडीचे (धूळवादळांचे) पडसाद लौकरच उमटू लागतील अशी सुस्पष्ट चिन्हे दिसू लागलेली आहेत. ऑगस्ट महिन्यात जी संसदेची बैठक व्हावयाची आहे, तिचा धसका काँग्रेसजनांना आता-पासूनच वाटू लागलेला आहे. त्यामुळे संसदेतील विरोधी खासदारांच्या सरबत्तीला कसे तोंड द्यावयाचे याची चिंता अहर्निश व्यक्त होऊ लागलेली आहे. दि. १२ जुलैचे सुमारास संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक भरणार असून, त्यात प्राधान्ये-करून या विषयाचीच चर्चा होणार असल्याचे कळले. संसदीय काँग्रेस पक्षाचे नव्या उमेदीचे चिटणीस श्री. कैलासचंद्र पंत (माजी गृहमंत्री कै. गोविंदवल्लभ पंत यांचे सुपुत्र) सध्या यासाठी विशेष पूर्वसिद्धता करीत आहेत असे समजले. कच्छ–सिंध-सीमा समझोत्याचे काँग्रेस पक्षातर्फे प्रभावीपणे कसे समर्थन करता येईल; देशाची आर्थिक परिस्थिती प्रतिदिनी अधिकाधिक चिघळते आहे, तिला आटोक्यात आणण्या-साठी काँग्रेस पक्ष कोणत्या उपाययोजना सूचवू शकेल; 'अलीगड' विश्वविद्यालय-प्रकरणामुळे देशातील अल्पसंख्यांक (मुसलमान हा शब्द वापरणे नाही म्हणून हा सोज्वळ शब्द) कसे अरेरावीने वागून केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. महंमद करीम छगला यांचा छळवाद करण्यास पुढे सरसालेले आहेत...आदि अनेक नाजूक प्रश्नांची दखल संसदेत घेतली जाणार असल्याने सत्तारूढ काँग्रेस पक्ष आतापासूनच हवालदिल झाल्यागत वावरू लागला आहे.

## □ दिल्ली महापालिका बरखास्त करा

सुमारे एक वर्षापूर्वी केंद्रीय अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णमाचारी यांनी मोठ्या थाटात घोषणा केली होती, की सरकारी खर्चात सुमारे रु. ७० कोटींची कपात करून दाखवितो, म्हणजे मग आपोआप अन्यत्रच्या खर्चातही कपात होऊन वाढत्या किमतींना आळा बसू शकेल ! संपूर्ण देशाचा विचार केला तर असे दिसून येत आहे, की वाढलेल्या किमती (महागाई) कमी होण्याची लक्षणे नसून त्या किमती स्थिर होऊन पुढील महागाईचा पाया मजबूत करीत आहेत. भारताची विदेशांतील गंगाजळी सध्या जवळजवळ संपुष्टात आल्यागत असल्याने 'निर्यात वाढवा' व 'आयात कमी करा' अशा घोषणा सरकारतर्फे पुन्हा नव्या जोमाने प्रतिवर्षानुसार चालू झालेल्या आहेतच. अन्नधान्यआघाडीवरील टंचाईची तीव्रताही शिगेला पोहोचण्याचे मार्गावर

असल्यान चालू महिन्याच्या अखेरीस बंगलोर मुक्कामी सर्व राज्य मुख्यमंत्र्यांचे संमेलन भरण्याचे ठरलेले आहेच. दिल्लीकर नागरिक म्हणू लागले आहेत, की हे सारे प्रश्न आम्हा सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरचे आहेत. ‘ प्रथम आम्हाला पिण्यासाठी व वापरासाठी पुरेसे पाणी तर द्या; ’–अशी मागणी विविध रूपाने येथे थेट केंद्र सरकारपर्यंत (पंतप्रधान व गृहमंत्री यांच्यापर्यंत) मांडण्यात येत आहे. वीजपुरवठ्यातील दोष, शहरातील वाहनव्यवस्थेतील गोंधळ...आदि समस्याही इतक्या शिगेला पोहोचू पाहात आहेत, की ‘ दिल्ली महापालिका बरखास्त करा ’ अशीही मागणी जोरकसपणे पुढे येऊ लागलेली आहे. आता असे उघडकीस आले आहे, की गतवर्षी दिल्ली महापालिकेने संमत केलेल्या खर्चाच्या रक्कमांपैकी $\frac{2}{3}$ (दोन तृतीयांश) रक्कम खर्चच केलेली नाही ! आदर्श कार्यक्षमतेचा हा मासलेवाईक नमुना आहे. अनेक महत्त्वाची कामे दिल्ली महापालिकेने हातीच घेतली नाहीत. कारण सिमेंटचा तुटवडा ! असे आता समर्थनपर सांगण्यात येत आहे. हा जो सावळागोंधळ चालू आहे, त्यामुळेच पाणीपुरवठा योजना व पूर नियंत्रण योजना यांचे बांधकाम खोळंबून बसल्यागत झालेले आहे ! एकूण काय की राजधानीला ‘ कॉर्पोरेशन ’ (महापालिका) लाभलेली असली, तरी तिची अगदीच मामुली ‘ उलटीपालटी ’ (म्युनिसिपॅलिटी) झालेली आहे ! असा अती कटू अनुभव येत आहे.

**दरबारी**


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

# नवें पेन

plato 66

प्लेटो ६६

किंमत मात्र तीच


रुपये ४/-

प्लेटो-६६ पेनमध्यें आतां
महत्त्वाच्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत.

★ दीर्घ काळ रहाणाऱ्या स्प्रिंग ॲक्शनसाठीं नवी रिफ्लेक्टर क्लिप.

★ अधिक टिकाऊ, मजबूत निब.

अद्यावत् तांत्रिक पद्धतींच्या अवलंबामुळें प्लेटो पेन्स हीं नेहमींच ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरत आलीं आहेत.




पेटंटसाठीं अर्ज सादर केला आहे.




म्हात्रे प्रॉडक्ट

PLATO

सोल डिस्ट्रीब्यूटर्स:
**बेस्ट फाऊंटन पेन डेपो,** पो. बॉ. नं. २४२१, मुंबई २.

Shilpi M.P. 64 Mar.



## अग्रलेख

पृथ्वीराज चव्हाणाने महंमद घोरीला पकडून सोडून दिल्यापासून थेट आजतागायत आपल्या राज्यकर्त्यांची औदार्याची घातक चटक काही कमी झालेली दिसत नाही. आपल्या शूर जवानांनी कच्छसीमेवर पाकिस्तानला चांगलेच पाणी पाजले. त्यांना थोडी अधिक सवड व अधिकार दिले गेले असते, तर आपला ज्यावर संपूर्ण हक्क आहे, असे राज्यकर्त्यांना वाटते, त्या सर्व मुलखातून पाकिस्तानला काढता पाय घ्यावा लागला असता आणि नंतर सीमाआखणीचे काम कटकटींवाचून भारताला पार पाडता आले असते. ' आमचे नीतिधैर्य उत्तम आहे. शत्रूला खडे चारण्यास आम्ही उत्सुकच आहोत, पण दिल्लीतील राज्यकर्त्यांनी नेहमीसारखा आमचा अवसानघात करू नये म्हणजे मिळविली– ' अशा अर्थाचे उद्गार सैन्यातील काही अधिकाऱ्यांनी दिल्लीतील पत्रकार कच्छसीमा-पाहणीसाठी गेले असता त्यांचेजवळ काढल्याचे वृत्तपत्रांत येऊन गेलेच आहे. सैन्य सज्ज आहे, राज्यकर्ते कच खातात असाच आजवरचा अनुभव आहे, हे काही खोटे नाही. काश्मिरात काय घडले ? १९४७ साली टोळीवाल्यांनी आक्रमण केले. आपल्या सैन्याने टोळीवाल्यांना पिटाळण्यास सुरुवात केली. टोळीवाले पळू लागले आणि दिल्लीहून टोळीवाल्यांचा पाठलाग थांबवण्याचा एकदम हुकूम आला. असे म्हणतात, की हा हुकूम चार आठ तास उशिरा आला असता तर संपूर्ण काश्मीर आपल्या हातात आले असते. काश्मीरचा प्रश्न शिल्लकच उरला नसता. पण सैन्याचे पाय राज्यकर्त्यांनी मागे ओढले, यूनोकडे त्यांनी धाव घेतली, युद्धबंदीचा घोळ घातला आणि गेली अठरा वर्षे या प्रश्नावर भारताचे रक्तशोषण चालू आहे. कोटयवधी रुपये वर्षाकाठी खर्ची पडत आहेत. सैन्य अडकून राहिले आहे, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताची बदनामी चालूच आहेत. ' सैन्याला पाठलाग थांबवण्याचा हुकूम दिला गेला ती चूक झाली. सैन्यबलाच्या जोरावर काश्मीरप्रश्न त्याचवेळी निकालात काढला असता तर बरे झाले असते, असे इतरांप्रमाणे माझेही त्यावेळी मत होते– ' अशा आशयाचे उद्गार श्रीमती इंदिरा गांधींनी चारसहा महिन्यांपूर्वी न्यूयॉर्क येथे काढले होते. पण मागाहून बोलून काय उपयोग ! वेळ एकदा निघून गेली ती गेलीच.

# युद्ध जिंकले ! तह हरले !!

## कारगिल कशाला सोडले ?

नुकतीच घडलेली कारगिलची कथा अशीच. ही पाकिस्तानी ठाणी भारतीय जवानांनी मोठया शर्थीचा पराक्रम करून जिंकून घेतली. पुन्हा आम्ही यूनो निरीक्षकांवर भरवसा टाकून ठाणी परत करण्यास तयार ! हे यूनो निरीक्षक काश्मीर युद्धबंदीरेषेवर इतकी वर्षे आहेतच. त्यांची कितीशी पत्रास पाकिस्तानने बाळगली आहे ? या निरीक्षकांच्या डोळ्यांदेखत पाकिस्तानने अनेकदा गोळीबार केले, या गोळीबारांची झळ निरीक्षकांनाही काही वेळा लागली. तरी पाकिस्तानची दांडगाई कमी नाही. आणि यू.नो. च्या आश्वासनांवर विसंबून कारगिलची ठाणी सोडायची होती, तर एवढा आटापिटा करून ती जिंकून घेण्याची तरी काय गरज होती ! जवानांचा सारा पराक्रम मातीमोलच झाला म्हणायचा ! अशा परिस्थितीत ती मरणोत्तर वीरचक्रे आणि गौरवपदके हा सारा पोकळ व अर्थशून्य देखावा वाटू लागतो. एकीकडे रणगीतांचा देशावर भडीमार आणि दुसरीकडे रणशूरांच्या पराक्रमाचे हे खच्चीकरण ! राज्यकर्त्यांच्या हेतूंविषयी संशय यावा, अशीच ही विरोधी वस्तुस्थिती आहे.

कच्छबाबत वाटाघाटींचे गुऱ्हाळ आता सुरू होईल, तेव्हा सैन्याने मिळविलेले राज्यकर्त्यांनी किती राखले ते कळून येईलच. पण सकृद्दर्शनी तरी ‘ पाकिस्तानचा दरोडा ’ पचलेला दिसतो. कच्छसीमेबाबत कोणताही आणि कसलाही वाद नाही, ही भारताची मूळ भूमिका आज सुटलेली आहे. सरदार ठाणे व बियारबेट ही आमचीच ठाणी आम्ही खाली केली आहेत. कच्छमधील आमच्या मुलखातून पाकिस्तानने बेकायदा बांधलेल्या सोळा मैल रस्त्याचा वापर करण्यास पाकिस्तानला मुभा दिली गेली आहे. हा रस्ता पाकिस्तान बांधीत होते, तेव्हा आमचे राज्यकर्ते काय करीत होते ? अक्साई–चीनमधून चीन रस्ता बांधीत असताना जे केले तेच. त्यावेळी नेहरू–मेनन होते. यावेळी शास्त्री–चव्हाण आहेत इतकाच फरक. माणसे बदलली तरी गाफीलपणा कमी झाला नाही.

१५ जुलै १९६५


## कोण न्यूनगंडाने पछाडलेले !

अशी सारी वस्तुस्थिती असता पाटण्याच्या सभेत संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी विरोधकांना व कच्छकराराच्या टीकाकारांना 'पराभूत मनोवृत्तीचे', 'न्यूनगंडाने पछाडलेले' अशी दूषणे दिलेली आहेत. आपले तुटलेले शेपूट लपविण्यासाठी सर्वांच्या धड शेपटांना कमी ठरवण्याचा हा उद्योग अजबच म्हटला पाहिजे. देशात एक बोलणारे आणि परदेशांत जाऊन दुसरेच ठरवून येणारे 'पराभूत मनोवृत्तीचे' व 'न्यूनगंडाने पछाडलेले', की 'जे बोलता ते खरे करून दाखवा, त्यासाठी पडेल ती किंमत द्यायला, हवा तो त्याग करायला देश तुमच्यामागे उभा आहे', असे कंठशोष करून ओरडणारे विरोधक 'पराभूत मनोवृत्तीचे!,' 'न्यूनगंडाने पछाडलेले!' यशवंतरावांचा राजकीय बचावाचा हा आक्रमक पवित्रा त्यांच्या मुत्सद्देगिरीवर प्रकाश टाकणारा असला तरी सत्य त्यामुळे लपणार नाही. शास्त्रीजींनीच हे सत्य हैद्राबादच्या आपल्या भाषणात सांगून टाकले आहे. 'पाकिस्तानशी युद्ध करण्याची कल्पनाच मला अशक्यप्राय वाटते. इतर कोणत्याही देशाशी होणाऱ्या युद्धापेक्षा पाकिस्तानशी होणारे युद्ध हे अधिक भयंकर आणि गुंतागुंतीचे झाले असते.' शास्त्रीजींचे हे उद्‌गार पुरेसे बोलके आहेत. पराभूत कोण आणि खंबीर कोण याचा यावरून कोणालाही चटकन् बोध होऊ शकेल.

पाटण्याच्या आपल्या भाषणात यशवंतराव पुढे असेही म्हणाले की, 'जगात आज सर्वत्र एक शांततावादी देश म्हणून भारताची प्रतिष्ठा उंचावली आहे. याउलट एक 'मारका बैल' म्हणून पाकिस्तानची जगात नाचक्की झालेली आहे; तेव्हा विरोधकांनी एखादा करमणुकीचा कार्यक्रम चालू असल्याच्या सुरात सरकारवर टीका करू नये.' आपण कोण हे जाणून घेण्यासाठी इतरांची ज्यांना मदत घ्यावीशी वाटते, आपल्याविषयी जग काय बोलते याकडे ज्यांचे सारखे लक्ष असते, अशा व्यक्ती न्यूनगंडाने पछाडलेल्या व पराभूत मनोवृत्तीच्या असतात, अशी माहिती मानसशास्त्रावरच्या प्राथमिक पुस्तकात सापडते. कच्छकराराच्या विरोधकांना वाटते–'जग आपल्याला काय वाटेल ते म्हणो; आपल्या स्वाभिमानाळा धक्का पोहोचेल, आपल्या राष्ट्रीय स्वार्थाला बाधा येईल, असे काहीही राज्यकर्त्यांनी करू नये. देशातील पौरुष आणि स्वाभिमान जागृत असणे, हे जागतिक कीर्तीच्या बुडबुड्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे व मोलाचे आहे.' 'परदेशी कोडकौतुकापेक्षा आपल्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा' असे सांगणारे विरोधक 'न्यूनगंडाने पछाडलेले' की मौंटबॅटन-विल्सन इत्यादींची गोरी कातडी पाहून विरघळणारे व आपल्या प्रदेशावर पाणी सोडायला तयार होणारे आमचे राज्यकर्ते 'न्यूनगंडाने पछाडलेले' याचा निर्णय आता आमच्या 'साहेबांनी'च करावा.

## आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचे मृगजळ

आणि 'भारताची प्रतिष्ठा फार वाढली', ही यशवंतरावांची समजूत तरी कितपत



अघोरी महंमद आणि आर्जवी शांतिदूत

खरी आहे ? कच्छआक्रमणाचे वेळी पाकिस्तानने अमेरिकन रणगाडयांचा वापर केला. आपल्या वैमानिकांनी जीव धोक्यात घालून हे सिद्ध करण्यासाठी पुरावे गोळा केले. अमेरिकेने पाकिस्तानच्या निषेधाचा एक शब्द तरी उच्चारला ! भारत आणि चीनचे शत्रुत्व आणि पाकिस्तान चीनची युती. तरीही अमेरिकेची मदत (शस्त्रास्त्रांची व इतरही) भारतापेक्षा पाकिस्तानला अद्यापही जास्त—चीन आणि अमेरिका यांचे हाडवैर असताना. व्हिएटनामविषयी शास्त्रीजींनी वक्तव्य केले. जॉन्सन सोडाच, त्याचा परराष्ट्रमंत्री डीन रस्क यानेसुद्धा ' मूर्खांची वडवड ' यापेक्षा त्याला अधिक किंमत दिली नाही. ही झाली अमेरिकेतील आमची प्रतिष्ठा. रशियाने कच्छबाबत आपली भूमिका मानली का ! शास्त्रीजींचे भरघोस स्वागत केले, पण कच्छबाबत

मोन. आफ्रिकेत तर आपल्याला अद्याप स्थानच नाही. आशियातील स्थान चीनने आक्रमण करून केव्हाच हिरावून नेले. एकूणएक भारतीयांची विनदिक्कत हकालपट्टी करणाऱ्या लंगोटीएवढ्या ब्रह्मदेशाला आपला धाक नाही, तर आम्ही प्रतिष्ठेच्या गोष्टी काय बोलाव्यात ! उलट आजवर अनुभव असा आहे, की ' मारका बैल ' म्हणून जरी पाकिस्तान जगात ओळखले जात असले तरी त्याचीच कड सर्वांनी भारतापेक्षा अधिक घेतली आहे. काश्मीरबाबत तर भारताची भूमिका जगात कोणालाही मान्य होत नाही. आर्थिक व शस्त्रास्त्रांची मदत पाकिस्तानपेक्षा कमी, संघर्षाचे वेळी पाकिस्तानकडे सहानुभूती, अशी अवस्था असताना, ' आमची जगातील प्रतिष्ठा मोठी ' या म्हणण्याला पुरावा काय !

## एक बोलका पुरावा

उलट पुरावा येथे पाहा. इंग्लंडचे भारतातील सध्याचे वकील फ्रीमन हे वकील म्हणून या ठिकाणी येण्यापूर्वी ' New Statesman ' या समाजवादी विचारसरणीच्या, इंग्लंडमध्ये भारदस्त व वजनदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साप्ताहिकाचे संपादक होते. फ्रीमन हे पं. नेहरूंचे चाहते, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा फ्रीमन व त्यांचे स्टेट्समनपत्र यांनी जोरदार पुरस्कार केलेला. किंग्सले मार्टिन हे पं. नेहरूंचे असेच मित्र, चाहते, त्यांच्या ध्येयधोरणांशी सहमत असलेले, भारताविषयी आपुलकी बाळगणारे, स्टेट्समनपत्राच्या संपादक मंडळातील आणखी एक नामांकित पत्रकार. इतकी सारी मानसिक अनुकूलता असतानादेखील हे वजनदार पत्र व विशेषत: किंग्सले मार्टिन कच्छबाबत भारताची बाजू मानायला तयार नाहीत. त्यांच्या हिशेबी भारत आणि पाकिस्तान सारखेच. ' न्यू स्टेट्समन ' मधील त्यांच्या लेखातील या १–२ उताऱ्यांवरून त्यांच्या हिशेबी आमची नैतिकता आणि पाकिस्तानची दांडगाई सारखीच असल्याचे कळून येते. ३० एप्रिल १९६५ या अंकात ते लिहितात–

" We are not leaving in a sane world. Fighting (in Kutch) has broken out on a considerable scale; both sides (India & Pakistan) are massing troops & arms. The press & radio propaganda, both in Delhi & Karachi, is of a kind only too familiar in Europe : ' Our troops are defenders of our frontiers & honour and the other side is cunning & wicked and basely determined on our destruction ......"

" Reason has never played a notable part in Pakistan politics but there now seems little to choose between the rival follies of this dispute......"

**" There is now grave danger of communal outbreaks against the Muslims all over India......"**

इत्यर्थ असा की, ' भारत आणि पाकिस्तान दोघेही युद्धखोर आहेत. पाकिस्तान थोडे अधिक भडक माथ्याचे असले तरी दोघेही मूर्खासारखे भांडत आहेत. भारतात मुसलमानांच्या कत्तली होण्याचा फार धोका नजीकच्या काळात संभवतो.'

आमच्या निधर्मी तपाचरणाचे, सौजन्याचे, शांतताप्रेमाचे काय फलित ! हे मित्र म्हणवणाऱ्या जाणकारांची आमच्याविषयी ही समजूत तर इतरेजनांची कथा काय ! आणि असल्या फसव्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या भाकडकथा सांगून कच्छप्रकरणातील राजकीय पराभव झाकला जातो, ते तर अधिकच खेदजनक ! शिवाजीचे उत्सव साजरे होत असले, तरी पृथ्वीराज चव्हाणाची परंपराच येथे जोरावर आहे, असे समजणे यावरून भाग पडते.

श्री. ग. मा.

● ● ●


# राजा शिवछत्रपती

**ब. मो. पुरंदरे**

[ पूर्वार्ध : उत्तरार्ध ]

**मूल्य छत्तीस रुपये**

आपल्या ग्रंथविक्रेत्याकडे पूर्ण
ग्रंथाची आजच मागणी करा

**किंवा लिहा**

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २**

# विचार धारे

समीर

## • चीनची विदेश-अनीती

चिनी विदेश-नीतीचे ' चिनी कोडे ' सोडविणे भारताला किती अगत्याचे आहे, हे परवाच मोठ्या नाट्यमयरीतीने सिद्ध झाले. कैरोच्या विमानतळावर एका खोलीत शास्त्री नासरशी बोलत होते, तर शेजारच्याच खोलीत चाऊ सोकार्नोशी गुजगोष्टी करीत होते. दोघांनीही एकमेकांना टाळले. चिनी आक्रमणाची टांगती तलवार पुन: केव्हा खाली पडेल, याकडे प्रत्येक भारतीयाचे लक्ष आहे व त्याप्रमाणे भारत तयारी करीत आहे.

पण भारत पादाक्रांत करण्याच्या हेतूने चीन भारतावर आक्रमण करणार नाही, असे मत एका अमेरिकन ' चीन–तज्ज्ञा ' ने नुकतेच प्रकट केले आहे. हा तज्ज्ञ म्हणजे फिलिपाइन्स विश्वविद्यालयाचे श्री. हेन्री श्वार्झ. काही दिवसांपूर्वी ' कॉंग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम् ' या संस्थेतर्फे श्री. श्वार्झ यांनी "चीन आणि जग' या विषयावर दिल्लीत तीन व्याख्याने दिली, तेव्हा त्यांनी हे महत्त्वाचे मत व्यक्त केले.

चीन भारत का पादाक्रांत करणार नाही ? प्रा. श्वार्झ यांच्या मते त्याची खालील कारणे आहेत.

(१) पादाक्रांत भारतावर राज्य चालविण्यासाठी लागणारी शासकीय यंत्रणा उभी करणे सोपे नाही.

(२) भारतात अधिराज्य स्थापन करून चीनची अन्न-समस्या सुटणार नाही. दक्षिण आशियातील तांदूळउत्पादन चीनला पुरेसे नाही. शिवाय अन्न मिळविणे हा चीनचा प्रधान हेतू असेल, तर त्यासाठी देश जिंकणे हा काही सर्वांत चांगला मार्ग नाही.

(३) आपला वंश मूळचाच वरचढ आहे व बाकीचे देश रानटी आहेत, अशी चिनी लोकांची परंपरागत समजूत आहे. परकीय देश शस्त्रास्त्रांनी पादाक्रांत करावे लागणे, या समजुतीशी सुसंगत नाही.

पण याचा अर्थ असा नाही, की चीन भारतावर हल्ला करणार नाही. भारत आणि चीन यांच्यातला सीमासंघर्ष बहुतेक चालूच राहील. या संभवनीय हल्ल्यांची श्वार्झ यांनी पुढील कारणे दिली आहेत.

(१) हल्ल्यामुळे भारताला आपली तटस्थता सोडून लष्करी मदतीसाठी

अमेरिका व तिचे साथीदार किंवा रशिया व त्यांचे साथीदार यांपैकी एखाद्या गोटात शिरणे भाग पडेल.

(२) सीमेवर संघर्ष चालू ठेवला, म्हणजे भारताला आपले लक्ष विधायक कार्याकडून काढून घेऊन संरक्षणाकडे वळवावे लागेल आणि भारताचे विधायक कार्य नीट झाले नाही, म्हणजे चिनी जनतेचा आपल्या (साम्यवादी) पद्धतीवरचा विश्वास दुणावेल.

(३) चिनी हल्ल्यांमुळे एकीकडे भारताचा आर्थिक विकास मंदावेल, तर दुसरीकडे भारताच्या इभ्रतीला कमीपणा येईल.

एकंदरीने पाहता भारतात व इतर दक्षिण आशियाई देशात पेकिंग–समर्थक चळवळींना आतून पाठिंबा देणे, हे चीनचे सर्वसाधारण धोरण राहील. वांशिक उच्चतेच्या चिनी समजुतीबद्दल बोलताना श्वार्झ म्हणाले, माओच्या लिखाणात अशी एक बालिश श्रद्धा दिसते, की "कालांतराने" दक्षिण आशियाई देश पूर्वीप्रमाणेच किती आधिपत्य मानू लागतील. आउटर मंगोलियाबद्दल तर त्याला असे विशेष वाटते.

## चीन–जपान युती

चीन, रशिया व अमेरिका या त्रांगड्याबद्दल बोलताना श्वार्झ म्हणाले, परकीय सहाय्याशिवाय चीनच्या योजना पुऱ्या होणे शक्य नाही, पण सध्या चीन व रशिया यांच्यात बेबनावामुळे चीन रशियाकडे आर्थिक किंवा इतर मदत मागणार नाही; उलट आर्थिक मदतीसाठी जपानचे मन वळविण्याचा चीन खूप प्रयत्न करील. रशियाविरुद्ध चीनने आरंभलेली मोहीम हा चिनी परराष्ट्रीय धोरणातला पहिला मोठा फरक आहे, पण चीन साम्यवादी गटाचे नेतृत्व रशियापासून हिरावून घेऊ शकणार नाही, किंवा प्रगतिशील देशांपुढे आर्थिक प्रगतीचा अनुकरणीय नमुना म्हणून मिरविण्याचे चिनी ईप्सितही साध्य होणार नाही.

आता रशिया व अमेरिका जरा जवळ आल्याने चीनची पंचाईत झाली आहे व या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी चीन आता दोन्ही देशांना सारखीच शिवीगाळ करीत आहे. (शिवाय रशिया व अमेरिका यांच्यातले वैमनस्य काहीसे कमी होण्याच्या आधीपासूनच एका श्वेतवर्ण देशाला नावाजायचे व दुसऱ्या श्वेतवर्ण देशाला शिव्या द्यायच्या, यातली असंगती चिनी लोकांच्या ध्यानात आली होती.) पण ही नीती फार चालू शकणार नाही; कारण चीनची, निकडीच्या भौतिक मदतीची गरज थोडेसे अॅटमबॉंब तयार करून भागण्यासारखी नाही.

# बेनबेला
## आणि
# अल्जीरिया

वा. दा. रानडे


बेनबेला यांची भेट घेण्यासाठी दोन वर्षांपूर्वी एक इजिप्शियन पत्रकार आला होता. संरक्षणमंत्री बूमेदियन शेजारीच बसले होते. पत्रकाराला त्यांची ओळख करून देताना बेनबेला विनोदाने म्हणाले, "हा माणूस माझ्याविरुद्ध कट करीत असतो." आणि मग बूमेदियन यांच्याकडे वळून म्हणाले, "तुमची कारस्थाने कशी काय चालली आहेत?" बूमेदियन यांनी उत्तर दिले. "चांगली चालू आहेत."

दोन वर्षांपूर्वी बेनबेलांनी काढलेले हे उद्गार थट्टा–विनोद म्हणून विसरले गेले, पण अल्जीरिया स्वतंत्र झाल्यापासूनच या दोन नेत्यांमध्ये सत्तास्पर्धा चालू होती व त्याचा शेवट अखेर गेल्या १९ जूनला बेनबेला यांच्या पदच्युतीत झाला.

बेनबेला आणि बूमेदियन यांच्यातील झगडा केवळ सत्तास्पर्धेचा होता काय? या उठावामागे कोणती कारणे होती? अल्जीरियाच्या धोरणात त्यामुळे काही बदल होणार आहे काय? हे प्रश्न केवळ अल्जीरियाच्याच नव्हे, तर आफ्रिकेच्या राजकारणाचे दृष्टीने महत्त्वाचे आहेत. कारण आफ्रिकेच्या राजकारणात संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे अध्यक्ष नासर यांच्याप्रमाणेच अल्जीरियाचे अध्यक्ष बेनबेला आपला प्रभाव पाडू लागले होते. अल्जीर्सच्या आशिया–आफ्रिका परिषदेनंतर हा प्रभाव अधिकच वाढला असता, पण ही परिषद भरण्यापूर्वीच अल्जीरियात लष्करी क्रांती होऊन बेनबेला यांना पदच्युत करण्यात आले.

अल्जीरियाच्या राजकारणावर या पदच्युतीचे काय परिणाम होतील, याचा विचार करताना स्वातंत्र्यलढ्यापासून अल्जीरियन नेत्यांत असलेले मतभेद, त्यांच्यात झालेले झगडे, त्यामुळे चळवळीला मिळालेली वळणे, यांचा विचार करावा लागेल.

अल्जीरिया ही आफ्रिकेतल्या फ्रेंच साम्राज्यातील सर्वांत मोठी वसाहत. फ्रान्सच्या सहापट मोठा असलेला हा देश जुलै, १९६२ मध्ये स्वतंत्र झाला. एक कोट लोकसंख्येपैकी दहा लाख म्हणजे दहा माणसांमागे एक स्वातंत्र्यलढ्यात ठार झाला. जगातील कोणत्याही देशातल्या जनतेने स्वातंत्र्यासाठी एवढा मोठा त्याग केला नसेल. १९५४ साली अवघ्या तीन हजार बंडखोरांनी आपल्या तुटपुंज्या शस्त्रांनिशी स्वातंत्र्यलढ्याला सुरवात केली, पण फ्रान्सची आठ लाख सेना, एक हजार विमाने



बेनबेला : बमेदियन

आणि नाविकदल यांना त्यांनी आठ वर्षे झुंजवत ठेवले आणि अखेर वाटाघाटी करायला भाग पाडून स्वातंत्र्य मिळविले.

## स्वातंत्र्यलढ्यातील आघाडीचा सेनानी

या लढ्यातील आघाडीच्या नेत्यांपैकी बेनबेला एक आहेत. ते पूर्वी फ्रेंच सैन्यात वॉरंट ऑफिसर होते. स्वातंत्र्यलढ्यासाठी उभारलेल्या 'ओ. एस्.' (स्पेशल ऑर्गनायझेशन) या दहशतवादी संघटनेचे ते प्रमुख होते. १० मे, १९५० ला त्यांना अटक झाली, त्यावेळी त्यांच्याजवळ एक जर्मन पिस्तूल आणि २,२३,००० फ्रँकच्या नोटा मिळाल्या. ओटान पोस्ट ऑफिस त्यांच्याच प्रेरणेने लुटण्यात आले होते. बेनबेला व त्यांच्या चार सहकाऱ्यांना शिक्षा होऊन पॅरिसमधील सात्रे तुरुंगात ठेवण्यात आले, पण तुरुंगात असतानाही पहारेकऱ्यांची नजर चुकवून बाहेरच्या चळवळीशी संबंध बेनबेलांनी ठेवला होता. पॅरिसमधील बंडखोर अल्जीरियनांच्या संघटनेचे एक नेते अदमड तालेब यांच्या घरी बेनबेला यांनी तुरुंगातून पाठविलेल्या काही चिठ्ठ्या पोलिसांना मिळाल्या. बेनबेला यांच्या सहकाऱ्यांना राजबंद्यांचा दर्जा मिळाला होता. त्यांना भेटीस येणाऱ्या लोकांना भेटण्याची, जेवण मागविण्याची वगैरे सवलती होत्या. एकदा जेवणाच्या पदार्थातून पक्षकार्यकर्त्याने एक ब्लेड पाठविले. त्या ब्लेडने तुरुंगाच्या कोठडीचे गज कापून बेनबेला यांनी १६ मार्च, १९५२ ला तुरुंगातून पलायन केले व ते कैरोस गेले.

कैरो रेडिओच्या 'व्हॉइस ऑफ दि अरब्ज्' कार्यक्रमात बेनबेला व इतर अल्जी-

रियन नेत्यांची फ्रान्सविरोधी भाषणे होत. अल्जीरियन क्रांतिकारकांसाठी लिबियातून शस्त्रे पाठविण्याची व्यवस्था बेनबेला यांनी केली होती. उत्तर लिबियात १९५५ अखेर शस्त्रांचे डेपो स्थापन करण्यात आले होते. दक्षिण ट्रिपोलियानियामधून उंटांचे तांडे शस्त्रे घेऊन निघत. दर महिन्याला एक हजार शस्त्रे अल्जीरियन बंडखोरांना मिळत. क्वचित एखादा तांडा फ्रेंच पकडीत, पण बाकी बहुतेक आपली कामगिरी पार पाडीत.

नुसती शस्त्रे पाठविण्याची व्यवस्था करूनच बेनबेला थांबले नाहीत, तर शस्त्रांच्या शिक्षणाचीही व्यवस्था त्यांनी केली. मोरोक्कोच्या काही विद्यार्थ्यांना इजिप्शियन लष्कराचे अधिकारी लष्करी शिक्षण देत आहेत, असे समजताच त्यांना भेटून अल्जीरियनांनाही असेच शिक्षण मिळण्याची तरतूद त्यांनी केली.

अल्जीरियाचा नेमेमचास भाग पुन्हा आपल्या हाती घेण्याची मोहीम फ्रेंचांनी सप्टेंबर, १९५५ मध्ये सुरू केली. या भागातील अल्जीरियन स्वातंत्र्यसेनेचा नेता बचीर चिहानी याचे मुख्य ठाणे एका गुहेत होते. फ्रेंचांनी तेथे केलेल्या हल्ल्याचे वेळी झालेल्या चकमकीत बारा बंडखोर ठार झाले, काही पकडले गेले, पण चिहानी पळाला. त्याच्या गुहेत फ्रेंचांना एक ब्रीफकेस सापडली; त्यात चिहानी व बेनबेला यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार होता. नेमेमचास भाग स्वायत्त करण्याच्या पूर्वयोजना अमलात आणण्यास स्वातंत्र्यसेनेने सुरवात केली होती. ग्रामीण भागात स्वतःचे पोलीसही नेमले होते, असे या पत्रव्यवहारावरून दिसून आले. अल्जीरियन सेनेची ' विनंती ' (अर्थात शस्त्रे पाठविण्याची) ' बड्या भाईने ' (नासर) मान्य केली आहे, असा उल्लेख बेनबेला यांच्या एका पत्रात होता.

### चळवळीतील दोन तट

अल्जीरियाच्या स्वातंत्र्यचळवळीत बाह्यतः एकजूट दिसली, तरी त्यात मुख्यतः दोन तट होते. एक खुद्द अल्जीरियातून चळवळ करणारांचा आणि दुसरा बाहेरून चळवळ करणारांचा. चळवळीवर आपले प्रभुत्व असले पाहिजे, असे आतल्या गटाला वाटत होते व हा उद्देश साधण्यासाठी बेनबेलांचे प्रतिस्पर्धी बेनकासेम क्रिम यांचे अनुयायी रामदेन अबेन यांनी खुद्द अल्जीरियातच स्वातंत्र्यसैनिकांची परिषद भरविण्याचा घाट घातला. बेनबेला यांना या परिषदेचे उद्देशाबद्दल शंका होती, तरीही तिला उपस्थित राहण्याचे त्यांनी मान्य केले. बेनबेलांचा सल्ला न घेताच परिषदेची वेळ व जागा त्यांनी ठरविली व बेनबेलांना नुसते औपचारिकपणे कळविले. नंतर फ्रेंचांना परिषदेचा सुगावा लागला आहे, तेव्हा सर्व काही बिनधोक असल्याचा संदेश मी पाठवीपर्यंत कोणी येऊ नये, अशा सूचना त्यांनी पाठविल्या. संदेश येताच लागलीच एका गुप्त ठिकाणाहून भूमध्य समुद्र ओलांडावयाचा, अशी योजना आखून संदेशाची वाट पाहात इटालीतील सान रेमो येथे बेनबेला व त्यांचे सहकारी वीस दिवस थांबले होते, पण संदेश आला नाही. अखेर बरेच दिवस वाट पाहिल्यावर त्यांना आश्चर्याचा

धक्का देणारी बातमी आली. त्यांच्या गैरहजेरीतच परिषद भरविण्यात आली होती.

अल्जीरियाचा प्रश्न तडजोडीने सोडविण्याचा प्रयत्न मोरोक्कोचे सुलतान करीत होते. २१ ऑक्टोबर, १९५६ ला बेनबेला व त्यांचे पाच सहकारी राबतमध्येच आहेत, असे समजल्यावर सुलतानाने राजवाड्यात त्यांचे स्वागत केले व दुसऱ्या दिवशी आपले पाहुणे म्हणून आपल्यावरोबर त्यांना टयुनिसला नेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे अल्जीरियन नेत्यांना घेऊन एअर ॲटलास या फ्रेंच कंपनीचे विमान दुसऱ्या दिवशी टयुनिसकडे निघाले. वैमानिक फ्रेंच होता. विमान अल्जीरियाचे सीमेजवळ येताच वैमानिकाला रेडिओ संदेश आला, की अल्जीर्सजवळच्या मेसनब्लांच विमानतळावर विमान उतरवा. या गुप्त संदेशाचा काहीही सुगावा वैमानिकाने प्रवाशांना लागू दिला नाही. विमानाचा बदललेला मार्ग लक्षात येऊ नये, म्हणून एअर होस्टेसने प्रवाशांना बोलण्यात गुंतविले. विमान उतरू लागले, तेव्हा टयुनिस-जवळच्याच तळावर आपण उतरत आहोत, अशी प्रवाशांची समजूत होती, पण विमान उतरताच फ्रेंच अधिकाऱ्यांनी बेनबेला व इतर चार अल्जीरियन नेत्यांना अटक केली; तेव्हा सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला.

## हंगामी सरकारची स्थापना

बेनबेला व त्यांच्यावरोबरच्या चार नेत्यांना अटक झाली, तरी त्यामुळे नाउमेद न होता स्वातंत्र्यचळवळ चालूच राहिली. एकोणीस सप्टेंबर, १९५८ ला अल्जीरियन प्रजासत्ताकाचे हंगामी सरकार स्थापन झाल्याची घोषणा कैरो, टयुनिस व रावत येथून एकाचवेळी करण्यात आली. अल्जीरियन स्वातंत्र्य आघाडी (एफ् एल् एन) पक्षाच्या कार्यकारिणीचेच सभासद मंत्रिमंडळात होते. फेरहट आब्बास पंत-प्रधान झाले आणि बेनबेला अटकेत असताही त्यांना उपपंतप्रधान आणि त्यांच्या-बरोबरच्या चार नेत्यांना मंत्री करण्यात आले. बेलकासेम क्रिम हे दुसरे उपपंत-प्रधान झाले. संयुक्त अरब प्रजासत्ताक, मोरोक्को, टयुनिशिया, लिबिया आणि इराक यांनी या सरकारला लागलीच मान्यता दिली.

हंगामी सरकारच्या स्थापनेनंतर अल्जीरियाच्या स्वातंत्र्यलढ्याला अधिकच जोर चढला. ऑगस्ट, १९६१ मध्ये फेरहट अब्बास यांच्या जागी बेन युसुफ बेनखेडा यांची पंतप्रधानपदी निवड करण्यात आली. अब्बासपेक्षा बेनखेडा अधिक लढाऊ व क्रांतिकारक धोरणाचा पुरस्कार करणारे होते. त्यानंतर अकरा महिन्यांतच फ्रेंचांना नमावे लागून अल्जीरिया स्वतंत्र झाला.

स्वतंत्र अल्जीरियाच्या पहिल्या सरकारचे पंतप्रधानपदी हंगामी सरकारचे पंतप्रधान बेनखेडा यांचीच निवड झाली, पण बेनखेडा फार काळ अधिकारावर राहणार नाहीत, त्यांच्यापेक्षा अधिक लोकप्रिय असलेले नेते बेनबेला मुक्त होताच त्यांच्याच हाती देशाची सूत्रे जाणार, हे उघड दिसू लागले होते व त्याचप्रमाण घडले.

### राजकारणावर लष्कराची पकड

बेनबेला लष्कराच्या पाठिंब्याने अधिकारावर आले. स्वातंत्र्यसेनेचे प्रमुख कर्नल बुमेदियन व आणखी दोन लष्करी अधिकाऱ्यांना बेनखेडांच्या सरकारने बडतर्फ केले. सरकारचे हे कृत्य बेकायदा आहे; सेनाप्रमुखाला काढण्याचा अधिकार फक्त अल्जीरियन प्रजासत्ताकाच्या नॅशनल कौन्सिलला आहे, असे लष्कराच्या मुख्य कचेरीने जाहीर केले. बेनबेला त्यावेळी लिबियात होते. त्यांनीही बुमेदियन याच्या बडतर्फीचा निषेध केला. यानंतर राबत येथे बेनखेडांचे प्रतिनिधी व बेनबेला यांच्यात वाटाघाटी होऊन तडजोड झाली. त्यात बुमेदियन व इतर दोन लष्करी अधिकाऱ्यांच्या बडतर्फीचा हुकूम बेनखेडा सरकारने मागे घेतला. लष्कर व बेनबेला यांनी सत्तास्पर्धेच्या झगडयात हा पहिला विजय मिळविला.

अल्जीरियाच्या राजकारणात लष्कराची पकड बरीच आहे, हे या घटनेने स्पष्ट झाले. बेनबेला यांनी आपणास पाठिंबा दिला हे लक्षात घेऊन लष्कराचे प्रमुख बुमेदियन यांनी बेनबेलांनाच पंतप्रधान करण्याच्या हालचाली सुरू केल्या व त्या यशस्वी झाल्या. बेनबेला पंतप्रधान झाले तरी पडद्याआड खरे सूत्रधार कर्नल बुमेदियन होते. पंतप्रधानपदाच्या मोबदल्यात लष्कराचे प्रभुत्व बेनबेला यांना मान्य करावे लागले. घटनासमितीत एकतृतीयांश जागा त्यांना लष्करी अधिकाऱ्यांना द्याव्या लागल्या.

बेनबेला डाव्या गटाचे समजले जातात, पण त्यांचे सुरवातीचे धोरण कम्युनिस्ट राष्ट्रांची मदत स्वीकारण्यापेक्षा पाश्चात्त्य मदत स्वीकारण्यास अधिक अनुकूल होती. रशियाने अल्जीरियात १००० व नेवढे नको असतील, तर १०० डॉक्टर पाठविण्याची तयारी दर्शविली. तसेच शिक्षक पाठविण्याची तयारी दर्शविली, पण बेनबेलांनी ही दोन्ही प्रकारची मदत नाकारली. उलट अमेरिकेतील 'केअर' संघटनेचे डॉक्टरांच्या मोठया तुकडया जुलै, १९६२ पासूनच अल्जीरियात काम करू लागल्या आणि रशियातून शिक्षक आणण्यापेक्षा फ्रान्समधून शिक्षक मिळविणे त्यांनी अधिक पसंत केले.

आशिया. आफ्रिकेतील बहुतेक नेत्यांप्रमाणे बेनबेला समाजवादाचे पुरस्कर्ते होते, पण कम्युनिस्ट नव्हते. कम्युनिस्ट राष्ट्रांची विचारप्रणाली त्यांनी अंधपणाने कधीच स्वीकारली नाही. समाजवादाच्या ध्येयाबद्दल अल्जीरियन नेत्यांत सर्वसाधारणपणे एकमत होते. मतभेद निर्माण झाले, ते तो कसा आणावयाचा याबद्दल.

बेनबेला समाजवादाच्या, घोषणा करीत असले, तरी समाजवादाचा निश्चित कार्यक्रम राष्ट्रापुढे ठेवून तो अमलात आणण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही, अशी अल्जीरियन क्रांतीचे एक नेते व बेनबेला यांचे तुरुंगातील सहकारी बुडियाफ यांची टीका होती. ही टीका ते उघडपणे करू लागले. त्यासाठी समाजवादी दल–आघाडी

त्यांनी काढली. सरकारविरुद्ध कटाचे आरोपावरून बेनबेलांनी त्यांना अटक केली.

## बाणेदार व धडाडीची वृत्ती

भूमिहीन शेतकऱ्यांना १९६३ अखेर २७ लाख हेक्टर जमीन देण्याची योजना बेनबेला यांनी जाहीर केली होती. खाणी, वीज व परदेशी व्यापार यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे सरकारचे धोरण आहे, पण बाकीच्या उद्योगधंद्यांत परदेशी भांडवल गुंतवणुकीस सरकार वाव देईल, असे धोरण बेनबेला यांनी जाहीर केले होते. बुडियाफ यांच्या दृष्टीने हा फार अपुरा कार्यक्रम होता.

बेनबेलांच्या धोरणास विरोध करणाऱ्या नेत्यांचे मतभेद नुसत्या टीकेपुरतेच मर्यादित राहिले नाहीत. कबिलिया भागात एन. महमद यांनी बेनबेलांविरुद्ध बंड पुकारले व ते मोडण्यासाठी सरकारने फौजा पाठवल्या. याच सुमारास मोरोक्कोशी सीमावाद उपस्थित होऊन मोरोक्कोने अल्जीरियाच्या कांही भागांत अतिक्रमण केले. त्याला विरोध करण्यासाठी सर्व राष्ट्र एकजुटीने उभे राहिले. विरोधी नेत्यांनी आपले विरोध बाजूस ठेवले. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील एकजूट अल्जीरियात पुनः एकदा दिसून आली. बेनबेलांचे सामर्थ्य या घटनेने अधिकच वाढले.

तेलाच्या पाइप-लाइनचे प्रश्नावर घेतलेल्या बाणेदार निर्णयाने त्यांची प्रतिष्ठा आणखी वाढली. तिसरी पाइपलाइन टाकण्याचे काम एका फ्रेंच कंपनीकडे सोपविले होते, पण या कंपनीचे भांडवलात पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक शेअर्स अल्जीरियन सरकारचे असले पाहिजेत, असा आग्रह अल्जीरियन सरकारने धरताच फ्रेंच कंपनीने ते काम करण्याचे नाकारले. तेव्हा पाइपलाइन टाकण्याचे काम स्वतःच करण्याचे सरकारने ठरविले. अरब राष्ट्रांच्या इतिहासात ही अपूर्व घटना होती. अरब राष्ट्रे तेल उत्पादन करतात, पण तेलाच्या वाहतुकीचे नियंत्रण मात्र परकीय राष्ट्रांकडे, अशी बहुतेक राष्ट्रांतील परिस्थिती होती. अल्जीरियाने प्रथमच तेलाच्या वाहतुकीचे नियंत्रण स्वतःकडे घेतले.

बेनबेला यांनी अधिकारावर येताना लष्कराचा पाठिंबा घेतला होता. कर्नल बूमेदियन यांच्या नेतृत्वाखालील लष्कराने दिलेल्या पाठिंब्यामुळेच ते अधिकारावर येऊ शकले. कर्नल बुमेदियन यांनी त्यांना पाठिंबा का दिला, याचे कारण बेनखेडांच्या सरकारने बुमेदियन यांना बडतर्फ केले, तेव्हा बुमेदियन यांची बाजू बेनबेला यांनी घेतली व बेनखेडांना ती बडतर्फी रद्द करायला भाग पाडले.

## बुमेदियन यांच्या सत्तेला पायबंद

बुमेदियन यांचा पाठिंबा व मदत घेताना ते पुढे डोईजड होतील, याची कल्पना बेनबेला यांना नव्हती असे नाही. राजकीय नेत्यांशी झगड्यात विजय मिळवून आपले स्थान बळकट केल्यानंतर लष्कराचे व बुमेदियन यांचे वर्चस्व कमी करण्याच्या प्रयत्नाकडे बेनबेला वळले. बुमेदियन यांच्याकडे उपाध्यक्षपद व संरक्षणखाते होते.

[ पृष्ठ ७१ वर पाहा ]

# प्रवासातील एक वर्ष

**चंद्रप्रभा जोगळेकर**

माजघरातल्या नेहमीच्या गप्पा
ऐकून कंटाळा आला असेल.
भाषा नीट येत असली,
तर असे होते; नाही तर...

जीवन हा एक प्रवासच आहे. हे वाक्य जुनंच आहे. माझ्या अशा प्रवासातली गंमत सांगायची आहे, म्हणून सुरवात करताना लिहिले इतकेच.

एका जागेहून दुसरीकडे जाताना आपण गाडीमधे आरामशीर जागा बघतो. एकदा बस्तान बसलं, की आपण चौफेर निरीक्षण करू लागतो. आजूबाजूच्या चित्र-विचित्र व्यक्तींना आपली नजर न्याहाळते. क्वचित कोणी मनात भरल्यास त्यासंबंधी कुतूहल जागृत होतं. मुकाट बसून कंटाळा आला, की आपण कोणापाशी तोंड उघडायचा प्रयत्न करतो.

"किती वाजले ?" हा संभाषणाचा ठराविक प्रश्न असतो. यावेळी आपल्याही मनगटावर घड्याळ आहे, याकडे दुर्लक्ष करतो, किंवा ते बरोबर चालत असले, अगदी रेडिओ–सिलोनच्या 'लोमा' टाईमवर लावलेले असले, तरी ते बरोबर आहे, की नाही, हे पडताळून पाहाण्याचा बहाणा केला जातो; किंवा क्वचित दुसऱ्यांच्या आपसातील संवादात कानावर आलेल्या बोलण्यावर हास्य प्रकट करतो, नाही तर 'फिल्लम फेअर' उघडून दुसऱ्याचे कुतूहल जागृत करतो. एक ना दोन; एनकेन-प्रकारेण दुसऱ्याचे लक्ष वेधून घेणे, हा हेतू मुळात असतो. अशा ओळखी होतात. प्रवासाचे तास भराभर सरकतात आणि विवक्षित स्थळी पोचल्यावर "सुखरूप पोचलो. प्रवास सुखाचा झाला," असली तार करायला मजकूर तयार होतो.

जीवन हा एक असा प्रवासच आहे. आयुष्यात योग्य बस्तान बसवायला किती खटपट करावी लागते, ते सांगणे नकोच. मात्र एकदा बस्तान बसले, हवी असलेली पोझिशन मिळाली, की त्या सर्वाला उजाळा द्यायला आपण आपले शोभादायक संबंध वाढवू लागतो. आजकालच्या जगात माणसाची पारख त्याच्या अशा शोभेच्या सोशल कॉन्टॅक्टस्‌नं होत असते. कै. पंडितजींच्या भूतपूर्व सेक्रेटरीच्या मेव्हणीची ओळख



दिल्ली, किंवा एखाद्या कॉंग्रेस कार्यकर्त्याच्या हस्तांदोलनाचा शिक्कामोर्तब झाला, की आपण समाजात जरा वर उचलले जातो. मनुष्य हा जात्याच 'सोशल' असतो. Two is a company & three is a crowd हे मला तरी मान्य नाही. अगदी तीन दाहे तीस असले तरी ते जर योग्य परिचयाचे आणि मनमिळाऊ असले, तर दोघांच्या गूढ गुंजनापेक्षा ह्या घोळक्यात अधिक मौज वाटते.

या अशा आयुष्यात सारेच काही मनाजोगे मिळत नसते; परंतु जे मिळते, त्यांच्या आठवणी सदैव मनोरंजक असतात. अशाच काही आठवणींची मला नोंद करून ठेवायची आहे.

एका वैमानिकाची बायको बनून मी बस्तान बसवलं ! साहजिकच सोशल स्टेटस् आलेच ओघाने. मद्रासला होतो आम्ही. मी ह्यांना म्हटलं, "तुमच्या मित्रांच्या घरी ओळखी करून द्या ना. नाहीतर एवढ्या मोठ्या घरात तोंड बांधून बसायचं म्हणजे शिक्षाच होईल मला."

"करमणुकीला तुला काही कमी नाही." हे म्हणाले, "एवढी मोठी बाग आहे, फुलं आहेत, झाडं आहेत. हे एवढं लिंबाचं झाड आहे लदबदलेलं. लिंबं तोड, लोणचं कर, सरबत करून ठेव. शिवाय पुस्तकांचा ढिगारा आहेच तुझा."

"अहो, पण मला दिवसभर गप्प नाही बसता येत."

"मग शेजारणीशी ओळख करून घे."

"अहो, पण आपल्याच व्यवसायातल्या लोकांत मिसळलं, तर बरं नाही का ?"

पण ह्यांनी काही मनावर घेतलं नाही. लिंबं तोडून झाली, लोणचं झालं, सरबत झालं, अखेरीस बिच्चारी लिंबं माझी पितळेची भांडी चमकवायला बलिदान करू लागली.

आमच्या आजूबाजूच्या रस्त्यातून इंडियन एअरलाइनची गाडी वरचेवर दिसायची. तेव्हा येथे ह्यांच्या व्यवसायाचे लोक बरेच असावेत, असा माझा तर्क होता.

एका सकाळी आमचे घरमालक आले. माझ्याशी फार आस्थेनं बोलले. आमच्या घरी येत जा, लागलं सवरलं तर कळवीत जा, वगैरे वगैरे. फार प्रेमळपणे बोलले. मी म्हटलं; चला. एक तर बातचीत झाली. तीही एका मोठ्या व्यक्तीशी, म्हणजे त्यावेळी गव्हर्नर असलेल्या पट्टाभींचे हे चिरंजीव. त्यानंतर काही दिवसांनी स्वत: गव्हर्नरसाहेबही पायधूळ झाडून गेले. इतकेच नव्हे, तर "My child" (बाळकेवढा सलोखा या शब्दात) म्हणून बोलले. त्यानंतर नागपूरला असताना त्यांची सून भेटायला आली, की गव्हर्नमेंट हाउसची गाडी दारापुढे थांबायची. लोकांची नजर मोठ्या कुतूहलाने आम्हांला बघायची. माझ्या सोशल कॉन्टॅक्ट्स्च्या धडपडीत या सर्वांचा उल्लेख केलेला बरा.

तर हे पट्टाभींचे चिरंजीव अधूनमधून आस्थेनं चौकशीला येत आणि माझ्या एकटेपणाची कीव करीत. त्यांच्याकडूनच मला कळले, की आणखीही वैमानिक वगैरे आमच्या कॉलनीत आहेत.

एकदाचे ह्यांनीही मनावर घेतले व एका संध्याकाळी आम्ही उभयता कॉलनीतल्या एकाकडे गेलो. ही माझी पहिली, मोठी मजेदार आणि अद्यापही टिकलेली मैत्रीण म्हणून तिचा पहिला मान देत आहे.

वैमानिकाच्या घराचा सरंजाम सारा ठाकठीक होता. एक मुलगी, एक मुलगा हातात खाद्यवस्तू घेऊन समोरच्या खोलीत नाचत होते. ह्यांचा मित्र हसतमुख आणि अगत्यशील होता. बसल्यावर गप्पा झाल्या, चहा आला, पण बाईसाहेबांचे दर्शन झाले नाही. तेव्हा मीच विचारले—

"Where is Mrs. ? Has she gone out somewhere ?" (आपल्या सौ. कुठे आहेत ? बाहेर गेल्यात का ?)

"No she is inside, in the kitchen." (नाही, ती आतच स्वयंपाकघरात आहे.) मला नवल वाटले. आतिथ्याचा हा प्रकार मी अनुभवला नव्हता, एक तर ही स्त्री भलतीच गर्विष्ठ असावी, किंवा न्यूनगंडाने पछाडलेली असावी, पण तिचा मुखडा पाहाण्याची माझी उत्सुकता मी आवरू शकले नाही. मीच उठून आत गेले. माझ्या पावलांचा आवाज येताच ती अधिकच कोपऱ्यात सरकली असावी. एका कोपऱ्यात मांजरीसारखी दडून बसलेली ही बाई प्रथमदर्शनी मला विचित्रच वाटली. मी नमस्ते केल. तिच्या चेहऱ्यावर हास्याची पुसटशी झाक नव्हती, चेहेरा विलक्षण भेदरलेला होता. नक्कीच, नक्कीच हिला न्यूनगंड असावा: मी खुळ्यासारखी तिच्याकडे बघून हसले, पण तरीही तिचा चेहरा निर्विकार होता. मी फारच बुचकळ्यात पडले. एखाद्या पुतळीसारखी ती निश्चल उभी होती. एकदा वाटलं निघून जावं, पण मी धीर धरला. मी तिला इंग्रजीत विचारलं,

" Do you like this place ? Are you happy ? "

(ही जागा कशी काय वाटते ? आवडते का ?)

" Nice ! " (छान आहे !) एक तुटक शब्द तिच्या ओठांतून निसटला,

" Do you go out very often ? will you drop in at my place ? Do you know anyone else around here ? " (तुम्ही वरचेवर बाहेर जाता का ? माझ्याकडे याल का ? इथं आणखीही तुमच्या ओळखी आहेत का ?) पण ती उगीच राहिली, काहीच बोलली नाही. मला विलक्षण लाजल्यासारखं झालं. मी एक उसासा टाकला.

" अच्छा ! Let me take your leave, pleased to have met you. "

(बरंय्. आम्ही रजा घेतो. आपली ओळख झाली, बरं वाटलं.)

तिलाही उमजलं असावं, ती दोन पावलं पुढं सरकली, म्हणाली– " Wait ! " (थांबा.)

तिनं चांदीच्या वाटीत कुंकू आणलं. एक मोगऱ्याची माळ आणली. मला माळ देऊन तिनं कुंकू पुढं केलं, मी बोटानं ते लावलं.

" I like you. " (तुम्ही मला आवडलात.) मोठ्या प्रयासानं ती बोलली. मला पुन: आश्चर्य वाटलं.

" Thank you." (आभारी आहे.)

" You know, I understand Hindi, English...Talk no. " तिला म्हणायचं होतं, मला हिंदी, इंग्लिश समजतं, पण बोलता येत नाही. आता मला तिच्या मुकाटपणाचं कोडं उलगडलं, मला तिची कीव आली. एका तेलगूखेरीज तिला काही येत नाही. अशा वेळी चार लोकांत मोठी चमत्कारिक परिस्थिती होते. मी तिला खूप धीर दिला. तशी ती अगदीच काही अशिक्षित नव्हती. मॅट्रिक पास होती. " हळूहळू बोलायला सुरवात करा, लाजू नका. हवं तर माझ्याशी बोला. मी मुळीच हसणार नाही. सवयीनं आपोआप शिकाल, " वगैरे वगैरे बोलून मी परतले.

त्यानंतर आठच दिवसांत ती आपणहून माझ्याकडे आली. धीर करून तिनं बोलण्याचा प्रयत्न केला. विचार करकरून एकेक वाक्यं उच्चारली.

" You Marathi ? Your festival our festival same. You no cook ? You want servant ? Mine is good. " सर्वांचा सारांश एवढाच की " तुम्ही मराठी बोलता काय ? तुमचे आमचे सणवार एकच असतात. तुमच्याकडे स्वयंपाकी नाही ? तुम्हाला नोकर हवाय ? माझा चांगला आहे. "

मी हसू मुळीसुद्धा दाखवलं नाही. तिला अधिकच धीर आला. मी तिला म्हटलं, " तुला बरंच येतंय की बोलता. अशीच सवय कर." आणि नंतर ती वरचेवर येऊन आपल्या इंग्रजीची खैरात करू लागली. तासचे तास ती माझ्याजवळ बसे. दडपून बोले. कैकदा मला हसू अनावर होई, पण तिच्या धीटपणाचे कौतुकही वाटते. एका

बुजऱ्या बाईला माणसांत आणल्याचे श्रेय माझ्या पदरी पडायचे होते. तिच्या यजमानांनीही मला धन्यवाद दिले. तिच्या संभाषणात माझी विलक्षण करमणूक होई. चूक, बरोबर तिनं कधी विचारच केला नाही. बेधडक धडक मारी.

" प्रभा, आय लाअीक सिनेमा, डु यू ? "

" Sometimes, yes. "

" अेनी सिनेमा, क्रायिंग ऑर लाफिंग आय लाअिक. " ट्रेजडी असो वा कॉमेडी, हिला आवडत होती.

" व्हाट बुक्स रीड यू ? " मी कुठली पुस्तके वाचते ते तिला समजून घ्यायचं होतं.

" युवर स्टमक बीग लुकिंग ! " माझं पोट मोठं दिसत होतं, दिसायचं कारण ते रिकामं नव्हतंच. मी तिला सांगताच ती आनंदित झाली.

" गुड. यू मस्ट केअर टेक. " (मी काळजी घ्यायला हवी) मलाही पटलं.

" केअर टेक स्पेशल आफ्टर बेबी बॉर्न ! अदरवाईज टमी बीग रिमेन्स. " (बाळ झाल्यावरच खास काळजी घ्यायला हवी, नाही तर पोट राहतं.)

" माय डिलव्हरी ? आय अलोन नो वन टू टाय माय स्टमक, दॅट इज व्हाय दी स्टमक केम टू मी ! " हाय राम ! आता मी हसू कसं आवरू ? इंग्रजीचा खून ! तिच्या बाळंतपणाचे वेळी वडीलधारं कुणी नव्हतं, पोट बांधून घेतलं नाही. पोट मोठंच राहिलं, पण स्टमक केम टू हर—मी मना सज्जनाला आवरले, बा ! हसू नकोस, लेट द स्टमक गो टु हर् बट लेट नॉट लॉफ्टर कम टु मी.

" प्रभा, युवर हसबंड गुड, ही स्टडी, माय, हसबंड नो गुड, ही डज नॉट स्टडी, लास्ट वीक् नेविगेशन एक्झाम, आय टेल हीम यू गो, यू गो, यू गो ! ही नॉट वेटेड... ! "

बाई, प्रथम हा इंग्रजीवरचा अत्याचार बंद कर. माणसाच्या सहनशीलतेलासुद्धा काही सीमा आहे की नाही ? मॅट्रिक परीक्षेत तू पास झालीस तरी कशी ? त्याला नॅव्हिगेशन न का येईना, तुला भूत, वर्तमान, भविष्यकाळ येऊ दे म्हणजे झालं. मना सज्जनाला एकवार पुनः चुचकारले, पण राहवेना—

" विजया, यू शुड नॉट से वेटेड से, ही डीड नॉट गो. "

" ओ माय English bad. " ती वरमली.

त्यानंतर मात्र ती लक्षपूर्वक दुसऱ्यांचं बोलणं ऐकून सुधारणा करू लागली. माझ्याकडे वरचेवर येत असे. मोडक्यातोडक्या इंग्रजीत सिनेमाची अख्खी कहाणी सांगे. नंतर ती इतरही चार बायकांसमक्ष बोलू लागली. पुरुषांत मात्र ती मप्पच वसे. होता होता तिच्यात खूपच सुधारणा झाली. झकपक कपडे, मॅचिंग ब्लाऊज, पर्स, निरनिराळी केशरचना करून ही ललना पतिसमवेत सुखाने हिंडू—फिरू लागली आणि नंतर तिला इतका आत्मविश्वास आला, की हळूहळू ती ह्यांच्याशीही इंग्रजीतून बोलू लागली.

## थरारते नेत्रपापणी

थरारते नेत्रपापणी
मुके मुके झाले मन

गात्रागात्रांतुन जागी
अजुन वेडी आठवण

प्राजक्ताच्या पाकळीतील
स्वप्नगंध ओघळला

शुष्क निर्माल्य पायाशी
एक निश्वास थिजलेला

शहारता वादळवारा
सागरकाठ ओलावला

एका लाटेची कहाणी
वाचा फोडी वेदनेला

*कुमुदिनी आपटे*

मात्र आता घोडचुका होत नसत.

ही माझी मैत्रीण उत्तम इंग्रजी बोलू लागली आहे. सर्वांत मिसळते. इंग्रजी कादंबऱ्यासुद्धा वाचते. बरेच दिवसांनी एकदा ती आली. मला 'बदल' जाणवला. मी म्हटलं,

"युवर स्टमक् विग लुकिंग !"

ती लाजली. म्हणाली, "यस्, आय ॲम कॅरीइंग." (मला दिवस गेले आहेत.)

● ● ●

# पाऊस फुटायचा असतांना!

दत्ता मुकुंद सावंत

**कोकणातला माणूस पावसामुळे असा भिजतो, असा चिंब होतो.**

सात जून जवळ आलेला असतो...वसंताने काढता पाय घेतलेला असतो. आभाळ तरी निरभ्रच असतं. आभाळाच्या पार्श्वभूमीवर लालभडक शेंबाची झाडं चांगलीच खुलून दिसतात...ही झाडं मस्तकावर लाल पदर घेऊन रस्त्याच्या बाजूला उभी राहून माडीवरून 'शुक् शुक्' करणाऱ्या वेश्यांप्रमाणे येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष वेधीत असतात.

लाटांपुढे लाटा पळाव्यात, अशा रचनेत फुलांचे गुच्छ एकापुढे एक असे प्रत्येक फांदीवर पसरलेले असतात...डहाळीच्या अग्रावर आगगाडीसारखी दिसणारी अळी बसल्यावर जसं दृश्य दिसतं, तसंच काहीसं हे दृश्य !...हे झाड कानांवर केसांचा झुपका वाढविलेल्या गोल चेहऱ्याच्या एखाद्या नटवर्यासारखे भासते...काहीसे उघडचा छत्रीसारखे !...

ह्या तांबडचा फुलात एक पांढरट पाकळी असते. ती फारच खुलून दिसते. चारपाच पाकळयांच्या एका फुलामध्ये अशी एक पाकळी हटकून असतेच. ह्या फुलांवर दगड मारला, तर सात-आठ हलक्या पाकळ्या भुरूभुरू खाली पडतात... बर्फाचा पाऊस पडावा तसा... एखादं हट्टी पान जड होतं. ते उभं खाली उतरतं. पॅरेशूटसारखं किंवा हातरुमालाची चारीही टोके एका दगडाला बांधून तो रुमाल उंचावरून खाली टाकल्यावर जसा फुरंगटून मंदगतीने खाली उतरतो तसं !...



पावसाळ्यात हे झाड हिरव्गार होणार असतं. आताच त्याचं रूप जसं पर्णहीन लालभडक असतं, तसंच पावसाळ्यातलं त्याचं रूप पुष्पविरहित हिरवंगार दिसणारं असतं. नाही म्हणायला हिरव्यागार कोवळ्या शेंगा अंगाखांद्यावर खेळणार असतात... त्यानंतरच्या मोसमात (उन्हाळ्यात) त्याची अवस्था रमणीय असते. ह्या झाडावर उरलेल्या असतात फक्त काळ्या-तपकिरी, खुळखुळ वाजणाऱ्या शेंगा. नुसतं शेंगांचं झाड !... तहानेने व्याकुळ झालेल्या कुत्र्याप्रमाणे जिभा बाहेर काढून-शुष्कावून ते उभं असतं...लुटूपुटूची लढाई खेळायला कोकणची लेकरं ह्या शेंगांचा उपयोग करतात.

कोकणात बरोबर सात जूनला पाऊस पडतो. इकडच्या शेतकऱ्यांना त्याची प्रतिक्षा करावी लागत नाही. आराधना करावी लागत नाही. बरोबर ठरलेल्या

तारखेला तो हजर ! असं जरी असलं तरी एकदोन दिवस आधी तो वर्दी देऊन ठेवतो–हजेरी लावून जातो.

शेतकरी जळणाची लाकडे, गुरांचा पेंडा, गवत खोपीत-पडवीत किंवा गोठयाच्या माळ्यावर भरून टाकतो...कौलं उरपतणे व घरे शाकारणे आधीच झालेलं असतं. चुकून जर एखादा कोणी राहिलाच तर पावसाने एकदोन दिवस आधी आपल्या आगमनाची वर्दी देऊन ठेवताच तो घाई करतो. बरेचजण त्याच्या अडत्याला धावून येतात ! कोकणचं हे वैशिष्ट्य !...एकतेचं संगीत इथं नांदत असतं. एकेकाळी शिवरायानं एकत्र गुंफलेले हे मर्द अजूनही एकीने आहेत...एकाच्या पायात भरलेला काटा दुसऱ्याच्या डोळ्यांतून पाण्याच्या रूपाने बाहेर येतो. एकाच्या शेताचं झालेलं नुकसान पाहून दुसरा शेतकरी ढळाढळा रडतो. कष्ट स्वत:चे असोत किंवा दुसऱ्याचे असोत, हाडाच्या शेतकऱ्याला त्याची पर्वा असते.

आकाशात धडधडत असताना आसन्नमरण म्हातारे आसू पुशीत असतात. त्यांच्या आठवणी जागतात. ज्या धारांखाली आपण कष्ट केले...पहिल्या सरी अंगावर घेताना पुलकित झालो, त्या धुंदीत कधी नाही इतकं ढवळ्या-पवळ्यांना गोंजारलं, त्या धारा दारात आल्या असताना आपण ह्या अंधाऱ्या खोलीत कोंडलेले आहोत. ज्या मातीतून दोन दोन हातांनी सोनं उपसलं, त्याच मातीत आता आपण जायचं याचं त्यांना वाईट वाटत असतं. धरतीचं हे स्मशानरूप त्यांना अप्रिय वाटत असतं...

घरातली उमदी पोरं शहरी पळालेली असतात. कृत्रिम जीवन जगत असतात. काहीजण नोकरी-धंदा करतात. काहीजण बेकाम राहातात. शिवाय दूर असल्याने जिवाला घोर. पत्रावर पत्रं पाठवून त्यांतला एकसुद्धा परत फिरायला मागत नसतो. शहरी, लाचार जीवनाची चट त्यांना लागलेली असते. शेताच्या मळ्याच्या मळ्या ओसाड राहतात. पूर्वी ज्या मळ्यात ओवलेल्या मण्यांसारखी नांगरांची रांगच रांग लागलेली असायची, तिथं आता एक किंवा दोनच जोतं आढळतात...उंबऱ्यातून हे दृश्य पाहताना ह्या म्हाताऱ्याकोताऱ्यांचा जीव कासावीस होतो !...

एक दोन दिवस सरी पडून गेलेल्या असल्यामुळे झाडं तुकतुकीत हिरवी दिसू लागतात. बालिकाही नाही आणि युवतीही नाही, अशा किशोरावस्थेतलं तेज असतं त्यांच्या अंगावर !...

७ जून उजाडतो...रात्रीच केव्हापासून तरी पावसाला सुरवात झालेली असते. पहाटेस उठलेला शेतकरी न्याहारी वगैरे आटोपतो. देवाच्या पाया पडतो. नारळ, बैल, नांगर व बी भरलेली रोवळी घेऊन शेतात येतो...पाऊस थांबलेला असतो. माती भिजून चिण् झालेली असते...नारळ फोडून तो फाळ घुसवतो. फाळ पार आत बसतो. बैलांना इशारा मिळताच ते फर् फर् नांगर ओढीत चालू लागतात. मळीच्या बांधाच्या आतून ते फिरत असतात. नक्षीदारपणे माती वर वर येत असते.

## दोन कविता

अगा पेटलो पेटलो
जसे ज्येष्ठातले उन्ह !
—तूच निर्विकार कशी
रानवणवा पेटून ?

*

पारिजात देठीओठि जाहला लाल, उणिव तव सले
मी अधीर आतुर हाय, चुंबितो फुले, उमलती फुले,
जळतळी असुन मासळी मारिते उसळि कमळकळि लागी,
डोळ्यांत उतरली रात, करू नको घात प्रीत अनुरागी,
सखि, अंतर तुजविण सुने, दीप मिणमिणे, एकला उरे,
निस्संग तुझा श्रीरंग, होत तम-भंग, रात ही सरे !

चंद्रकांत पाटील

---

नांगरणी झालेली असते. धरतीच्या पोटातून सुगंध वर उफाळत असतो. नांगरटीने वर आलेल्या ढेकळांना तो ओला होऊन लगटलेला असतो. शेतकरी अबोध हर्षाने वेडा होतो. खाली वाकून तो गंध पिऊ पाहातो. वारा प्यालेल्या वासरासारखी स्थिती होते. त्याचा मागील पाय रुतवून ढेकळं तुडवीत सैरावैरा धावावंसं वाटतं, पण एक नवीनच वस्तू त्याचं लक्ष वेधून घेते. सकाळपासूनच्या नांगरणीच्या गडबडीत त्याचं लक्ष तिकडे गेलेलं नसतं !...लाल, गुलाबी, मखमली-मिरग !—मृगाचा दूत ! !...

हलकेच त्याला तो चिमटीत पकडून तळहातावरल्या फोडाप्रमाणे जपत तळव्यावर ठेवतो. त्याच्याभोवती बोट फिरवून "चाल चाल मोरा" करतो; पण तो भ्यालेला असतो...पोटात पाय घेऊन निपचित पडतो...शेतकऱ्याला गंमत करायची लहर येते. तो त्याला परत मातीत टाकतो. थोडा वेळ वाट पाहिल्यानंतर मातीवर तो पूर्ववत चालू लागतो. अरेच्चा !...हे पाहा त्याचे जोडीदार...एक, दोन, तीन—अरे बापरे ! किती हे ! जिकडे तिकडे तेच...मातीभर !... जितकी माती तितके मिरग !...

दोनतीन दिवस आधी पाऊस पडून गेला असल्यामुळे धरणीतल्या गर्भातले कोंब एकमेकांचे हात धरून, पाठीस पाय लावून वर आलेले असतात. " अरेच्या, माझेच भाऊ हे! धरतीमातेचं मी जसं लेकरू तसंच हे कोंबदेखील—" शेतकऱ्याच्या मनात विचार चमकून जातो......

लालसर मातीवर फिकट हिरव्या रंगाची खुलावट खुलून जाते. आभाळ ओथंबलेलंच असतं; ते परत कधी कोसळेल याचा नेम नसतो !......

पांढराखड दिसणारा एकुलता एक सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता मातीने माखलेला असतो......त्याच्या बाजूची माती वाहून आल्याने जीर्ण म्हाताऱ्याची हाडे कातडीखालून डोकावीत तशी मातीखालची खडी बाहेर डोकावू लागते......

हवा धुंद–कुंद असते. वळू डुरकाळ्या फोडू लागतात. मृदगंधाने–मातकट वासाने ते मस्त होतात. शिंगांनी माती उकरू लागतात......नाकपुड्या फुस्कारतात... वर्षभर भावासारख्या वागलेल्या सोबत्याबरोबर देखील तो कुस्तीला तयार होतो... शेतकऱ्याची गाळण उडते. तो मग त्याला काठीने झोडपून काढतो, छडीने फोडून काढतो...तरी मस्ती सुप्तावस्थेत असतेच. तो मोकळा असताना परत उफाळते !

एखादा उंडगा, मरतुकडा पाडाही लहान वासराच्या किंवा कुत्र्याच्या अंगावर शिंगं रोखून धावतो !......

वारा काहीसा जडावलेला असतो. कलंदरासारखा भटकायला आता तो काही एकटाच नसतो......त्याच्याबरोबर असतो सुवास ! तरीपण त्याचा स्वभाव उडी मारतो. पळता पळता मध्येच तो गिरकी घेतो. जबरदस्त झाडांना पिळवटतो. घरांना ढुशा देतो...उसळलेल्या धुळीत घाबरून सुगंध बाजूला सरतो. शांत झाल्यावर वारा परत त्याचा हात धरतो.

ओथंबलेलं आभाळ मधल्या वेळेत परत फिरलेलं असतं. दुपारी पाऊस पडलेला नसतो. त्यामुळे जोतांना सुटी असते.

आता परत आकाश गच्च–भरगच्च असतं. दक्षिण दिशा अंधारलेली असते...... काळ्या कभिन्न, राक्षसकाय मेघांच्या पोटावर विजेची छडी सपासप बसत असते नि त्यांच्या काळजाचं पाणी पाणी होतं. मघापासून मूक विव्हळणारे ते असहायपणे मोठ्याने आरोळ्या ठोकीत खाली कोसळतात.

वाऱ्याच्या उडत्या गालिच्यावर बसून पाऊस येतो. जमिनीवर अंथरतो. अंथरतो कसला आपटतोच. सकाळी पाऊस संपून गेल्यानंतर आतापर्यंत बरीच धूळ साचलेली असते...धूळ फुत्कारत वर उडते. परंतु परत निमूट बसते–मृदगंधी गीत गाऊ लागते. धरतीच्या रोमारोमांतून एक लहर शिरशिरत जाते.

झाडावर छोटे–मोठे पक्षी गात असतात–चिंब असतात. त्यांचे सूर आनंदाने चिंब असतात...सगळं चिंब असतं. झाडं पक्ष्यांसारखी पानं फडफडवतात. मोती ढाळतात. टपोऱ्या मोत्याचं पाणी होऊन ते रस्त्यारस्त्याने, गटारागटाराने,

पाटापाटान गर्दीत धावू लागतं. पाऊस लाग लाग लागत असतो. आता उसंत नसते. ह्या भयंकर पावसाने सर्व कामं थांबलेली असतात. कोणी घरातली गळती काढीत असतात...नांगर परत जोडले जातात, पण पाण्यामुळे रोजचा रस्ता मिळत नसतो. डोईवरलं इरलं, घोंगडी भिजून आतला माणूसही भिजलेलाच असतो. तो गारठ-लेला असतो. बैल पावसाच्या माऱ्याला टक्कर देत मान तिरपी करून चालत असतात.

डोंगररूपी स्तनातून धरित्रीला पान्हा फुटतो...वाहू लागतो. धरतीमातेची, तांबड्या आईची लेकरं पोसली जाणार असतात ह्या पान्ह्यावर !

दिवेलागणीच्या सुमारास पाऊस थोडा मंदावतो, तरी पण अर्धवट राग शमलेल्या माणसासारखी त्याची पिरपिर चालू असते. सगळ्याभर एकच दुर्गंधी पसरते. झाडांवर किंवा कुठेही चपळाईने चढणारे ओंबीळ पावसाच्या तडाख्याने मेलेले असतात. त्यांचा हा दुर्गंध !

पावसाळ्याच्या दिवसात अंधार दिवसभरच असतो, परंतु काजवे काही दिवसभर असत नाहीत. खराखुरा अंधार पडू लागताच काजव्यांचा ताफा झाडांवर झुलू लागतो. इतरत्र तुरळक तुरळक काजवे डोळे मिचकावीत फिरत असतात......

ह्या काजव्यांमुळे अंधार जाळीदार, दाणेदार दिसू लागतो. अंधारात झाडाचं अस्तित्व जाणवतं, ते केवळ ह्या पेटत्या काजव्यामुळं. विजा चमकत असतात. विजा लखलखतात, तेव्हा काजव्यांचा काफला गप्‌कन् मिटल्यासारखा वाटतो. काजव्यांची कधी कधी एक गंमत पाहाण्यासारखी असते. सर्व काजवे एकदम मिटतात. एकदम पेटतात. क्षणकाल संपूर्ण अंधाराचं साम्राज्य पसरतं...चूड पेटावी तसं एकदम सर्व आसमंत पेटतं. झाडं तर नुसती होरपळल्यासारखी वाटतात.

वारा सैरावतो...सोबत धारा घेऊन येतो. धारा थडाथड घरांवर, दारांवर, रस्त्यांवर, आपटू लागतात. काजवे पहिल्यापेक्षा अधिक उघडमिट करू लागतात... बेडकांचंही गाणं सुरू झालेलं असतं.

ह्या निसर्ग–संगीताने श्रमलेले शेतकरी गाढ झोपतात. काहीजण कांबळं शेकवीत पिरशाजवळ बसतात...सकाळचा तो तरुण रसिक शेतकरी एका अज्ञात धुंदीने माखून निघतो. डोळ्यांत झोप लोटत असते, पण ती अज्ञात धुंदी अधिक अनावर असते–ओसंडत असते. मिटू लागणाऱ्या पापण्या ती मिटू देत नाही.

पाण्याच्या, पावसाच्या, बेडकांच्या, विजांच्या, मेघांच्या अशा अमाप जणांच्या–चराचराच्या निसर्गाच्या सुरात आपले मानवी सूर मिळवून तो गाऊ लागतो ! ...वेडावतो! ! तल्लीन होतो ! ! !

# कोकरांची कथा

**राम पं. साठे**

या जगात माझ्यासारखे आहेत, तोपर्यंत बापटही असणार.
बापट असणार आणि कधी असंही घडणारच ! !

आजचा दिवस जसा न उगवलेलाच आहे. सकाळपासून पावसाची बुरबुर चालू आहे. आताच जरा थांबलीय्. अंधार पडू लागलाय्. बाकी आज दिवसभर असाच काळोख दाटलाय्. आता जरा जास्त वाटतोय्. एवढेच. ओथंबत्या थुलथुलीत ढगांनी आकाश ठेंगणं झालंय्. सारं कसं कुंद, उदास वाटतंय्. मनावर त्या वातावरणाचं सावट पडलंय्, पण त्या सावलीचा भारदेखील मनाला सहन होत नाही. कसंतरी दडपल्यासारखं, गुदमरल्यासारखं होतंय्. या विचित्र दडपणाखालून सुटायची मनाची केविलवाणी धडपड चाललीय्.

गरम चहाचा हा तिसरा कप मागवलाय्. 'पनामा' निम्मा खलास झालाय्, पण मनाची हुरहुर थांबत नाही. समोरच्या रस्त्यावरून माणसं चालली आहेत घाईघाईनं. खूप गर्दी उडालीय्. इतकी की माणसाला माणूस चिकटल्यासारखं वाटतंय्. माझ्या डोळ्यांसमोर एवढी हालचाल चालली आहे; पण माझे डोळे कुठेतरी खिळल्यासारखे झालेले आहेत. नजर इकडून तिकडे फिरवायचीसुद्धा उर्मी अंगात राहिलेली नाही. आजूबाजूला खूप गोंगाट चालू आहे, पण तोसुद्धा कसातरी दडपल्यासारखा, गुदमरल्यासारखा. माझ्या कानात तर दडेच बसले आहेत. अंगाला झोंबणारा चावरा वारा अंगावर शहारे उठवतोय्. मनाची हुरहुर काही केल्या थांबत नाही.

"काय साहेब, कसं काय ?" कोणाचा तरी आवाज येतो. अगदी जवळून. मी चमकून शून्यावर खिळलेली नजर आत खचतो. समोर एक माणूस बसलाय्. केव्हा येऊन बसलाय् कोण जाणे. सलगीनं दात विचकतोय्—लाल—पिवळे दात. त्याची सलगी मला आवडत नाही. अंगावर झुरळ चालल्यासारखं वाटतं. मी घाईघाईनं



आजूबाजूच्या लोकांकडे पाहतो. कोणी माझ्याकडे पाहात नसतं. सगळेजण उदासवाण्या नजरेनं रस्त्याकडे पाहात असतात.

" काय साहेब, चलणार का ? आजचा माल एकदम ए वन् आहे. फूल आहे फूल ! दिल खूप हो जाएगा ! " तो माणूस बोलतोय् हलक्या आवाजात.

" अंऽ, " मी झोपेतून उठल्यासारखा काहीतरी आवाज काढतो, पण माझ्या कानांनी त्याचे सगळे शब्द ऐकले आहेत. माझी कानशिलं एकदम तापून सळसळत आहेत. माझ्या छातीत अगदी आत खूप जोरात धडधडत आहे.

बस् ! बस् ! ! ही हवा, हा शहारे उठवणारा वारा, ही उदासीनता, ही मनाची केविलवाणी हुरहुर, या साऱ्यांवर हा एकच उपाय आहे !

मी दोन कप चहा मागवतो. बापटला— त्या माणसाला--माझ्या मनातले विचार कळले आहेत, त्याचा खप्पड चेहरा फुललाय्. तो मनापासून दात विचकतोय्.

" साहेब, एकदम नवी आहे. आत्ता पंधरा वीस दिवसांपूर्वीच धंद्याला लागलीय्. प्रायव्हेट आहे. "

मी धुराची वलयं सोडून त्यात पाहतोय्—त्यात एक काल्पनिक आकृती साकारतीय्—कोवळी, पंधरा-सोळाची...म्हणजे हडकुळी. पंचविशीची. बापट सांगतो त्यात मी नेहमी दहा वर्षे मिळवितो. बापटचा हा धंदाच आहे. मुख्य धंदा आचाऱ्याचा. हा आडधंदा ! आडधंद्यातच त्याला जास्त पैसे मिळतात. त्यांचा माल प्रायव्हेट असतो. गिऱ्हाइकं प्रतिष्ठित. सगळाच चोरीचा मामला. त्यामुळे बापटचं फावतं; पण बापटने दाखविलेल्या जागा तशा चांगल्या असतात. पैसे जास्त पडतात. खरे,

समाधान इतर ठिकाणांपेक्षा जास्त होतं.

" मग चलायचं ना साहेब ? " बापट विचारतो.

" थांबा जरा. " मी उगीचच वेळ काढतोय्. छातीत धडधडत आहे. चोरट्यासारखं वाटतय्.

दरवेळीच असं होतं. खरं म्हणजे मी काही यात नवखा नाही. तरी असं होतं. मनावरचे संस्कार ! पण तसा मी स्वतंत्र विचाराचा आहे. चांगले वाईट–नीति-अनीती यांच्या खोटया कल्पनांना मी कवटाळत नाही. जे मनाला पटतं ते करतो. वेश्यांकडे जाणं ? भयंकर अनीती ! का ? पोटासाठी माणूस वाटेल ते करतो. वेश्या तरी दुसरं काय करतात ? पोटासाठी धंदा करण्यात पाप समजायचं ? त्यांची नाहक उपेक्षा करायची ?

हे सगळे विचार ठीक आहेत, पण जाताना मात्र माझ्या छातीत धडधडतं. मी चोरट्यासारखा सगळीकडे पाहतो. कोणी पाहात तर नाही ना ? हा मनाचा दुबळेपणा !

" चला साहेब. " बापट अर्धवट उठतो.

" अरे थांब. भाव तर सांगशील. " माझा आवाज घोगरा झालाय्...

" तुम्हाला काय भाव सांगायचा साहेब ? तुम्ही खुषीनं द्याल ते. "

" नको बाबा. मागून कटकट नको. "

" बरं साहेब. सांगतो, पण एकच भाव हं. पंचवीस ! "

" हॅः फार होतात बाबा. "

" साहेब, माल पटला नाही तर एक पै देऊ नका. मग तर झालं ? "

अखेर वीस रुपयांवर सौदा तुटतो. आम्ही दोघे रस्त्यावर येतो. बापट तुरूतुरू चालायला लागतो. मी त्याच्याबरोबर फरफटल्यासारखा चालतोय्.

छातीतली धडधड ऐकू येतीय्. तापली कानशिलं सळसळत आहेत. सुखाच्या नुसत्या कल्पनेनंच गात्र न् गात्र धगधगलंय्. साऱ्या अंगात कसलातरी गरम प्रवाह वाहतोय्. आमचं चालणं संपतच नाही. बापट त्या मुलीची दर्दभरी कहाणी सांगतोय्. प्रत्येक प्रायव्हेट मुलीची अशीच एक एक कहाणी असते. बापटनं सांगायची न् आपण ऐकायची ! खोटी चुकचुक करायची.

बापट बडबडतोय्. ही मुलगी चांगल्या कुळातली. शाळेत जाणारी. वडील साधे कारकून आहेत. दुकानात शंभर रुपये मिळतात. या मुलीला आणखी चार धाकटया बहिणी आहेत आणि सर्वांत छोटा भाऊ. शंभर रुपयांत कोणाकोणाचं काय होणार ? आपल्या सरकारची प्रगती चाललीय्. महागाई झेपावत आहे. नाइलाजानं हा धंदा बापटानंच सुचविलेला.

अखेर वाट संपते. एका ओंगळ चाळीत आम्ही शिरतो. अंधारामुळे चाळीची बरीच लक्तरं झाकली असली, तरी तिथला वासच चाळीची जात सांगतो. फाटके जिने

चढून आम्ही कुठल्यातरी मजल्यावर जातो. चाळीतल्या खोलीखोलीत खूप माणसं आहेत. खुराड्यात कोंबड्या कोंबल्यासारखी. सगळीकडे कलकलाट माजलाय्. आमच्याकडे कोणाचचं लक्ष जात नाही. ज्याचं जातं ते नाहीसं दाखवतात.

एका मिटल्या दारापुढं आम्ही उभे राहतो. आतून लहान मुलांचा, मोठ्या माणसांचा कलकलाट ऐकू येतोय. बापट दार ठोठावतो आणि हळूच हाक मारतो. "अहो पंतऽ." आत एकदम शांतता पसरते. काहीतरी कुजबुज, खूपशी हालचाल. मग दाराची एक फळी हळूच उघडते. बापट डोकं आत घालतो. पुन्हा डोकं बाहेर काढून मला आत यायला खुणावतो.

मला पळून जावंसं वाटतंय्, पण धगधगतं शरीर खिळून राहिलंय्. मी अर्ध्या दारातून आत जातो. कोपऱ्यात स्वैंपाकाचा पसारा पडलाय्. एका खालच्या एक चार झिपऱ्या मुली दोन ताटांवरचं अन्न चिवडत बसल्या आहेत. त्या हळूच टव-कारून माझ्याकडे पाहतात, मीच नजर वळवतो. जवळच एक पाळणा आहे. छोटा छोकरा असावा त्यात. घराचा स्वामी माझ्याकडे पाहून लाचारीचं हसू हसतोय्. ऐन पस्तीशीतच तो म्हातारा झालाय्. त्याचं अर्धांग चुलीपाशी बसलंय्. मूळचा चेहरा, मूळचा बांधा रेखीव असावा, पण अनेक बाळंतपणांनी अन् जन्माला पूजलेल्या दारिद्र्यानं सारं सारं झडून गेलंय्

बापट तिला खूण करतो. ती अंगावरच्या कपड्यांचे फाटके भाग झाकीत तिथलं एक दार अर्धवट उघडून आत शिरते. माझी नजर आतला वेध घ्यायचा प्रयत्न करते. काही दिसत नाही.

बापट मला कोपरानं ढोसतो. मी पाकीट काढतो. माझी छाती विलक्षण धड-धडतीय्. मी पाकिटातून पाचाच्या चार नोटा काढून बापटच्या हातात देतो. बापट त्यातल्या तीन पंतांना देतो; एक स्वतःच्या खिशात घालतो. पंत पुन्हा एकदा ओशट हसतो. मी घाईघाईनं सिगरेट पेटवितो. बापट माझं सिगारेटचं पाकीट घेऊन एक सिगारेट पंतांना देतो. एक स्वतः घेतो.

"बराय् साहेब, मी जातो. उद्या भेटेन. बराय् पंत." बापट उठतो. मलाही त्याच्याबरोबर जावसं वाटतं, पण थरथरतं शरीर ठिगळं लावलेल्या सतरंजीला चिकटून राहतं. बापट जातो. मला कसंतरी होतं. मी उगीचच कुठंतरी पाहात राहतो.

थोडा वेळ जातो, पण बराच वेळ झाल्यासारखं वाटतं. आतलं दार उघडतं. ती हडकुळी बाई घाईघाईने बाहेर येते. स्वतःचे तोंड ती शक्य तितके लपविते, तरी भिजलेले गाल मला दिसतात. पंत बोलतात,

"जा साहेब आत."

"अं ? हं." मी भानावर येतो. चटकन् उठतो. आत जाऊ लागतो. जाता जाता सगळ्यांकडे पाहतो. सगळे माझ्याकडे पाहात असतात. त्यांच्या नजरा मला बोच-

तात. मी आत जाऊन दार लावतो. कडी लावून मागे वळतो अन्...

समोर ती उभी असते.

बापट म्हणाला होता, "फूल आहे फूल."

पण ही तर गुलाबाची कळी आहे, थोडीशी उमललेली, बाळपण न ओसरलेली.

माझ्या अंगातली सारी धगधगती आग एकदम सरसरत थंड होते. साऱ्या वासना शरमेत विरघळून जातात. माझ्या अंगाला घाम सुटतो.

ती माझ्याकडे पाहून हसते, पण हसतात तिच्या चेहऱ्यावरील रेषा. तिचे हरणासारखे टपोरे पाणीदार डोळे हसत नाहीत. तिचे जास्वंदी ओठ हसत नाहीत. डोळ्यांत भीती तरळत असते. ओठ थरथरत असतात. सुंदर कपड्यात गुंडाळलेल्या बाहुलीसारखी ती उभी असते.

ही पोर अभिसारिका बनणार? हिला स्वतःला शृंगारणसुद्धा जमत नाही. हिची आई हिला शृंगारते? आणि आतल्या खोलीत हा प्रकार चाललेला असताना हे आईबाप बाहेरच्या खोलीत बसू शकतात? आणि त्या चिमुरड्या पोरी...?

"या ना. उभे का?" ती बोलते. जवळ येऊन हात धरते. दुसऱ्या हाताने लाडिकपणे माझ्या बुशशर्टच्या बटणांशी चाळा करते. लाघट हसते. माझं डोकं भिरभिरत राहतं. डोक्यात घणासारखे घाव पडत असतात. मी दगडासारखा उभा असतो. वेड्यासारखा पाहात असतो.

"चला ना." ती मला ओढते. हे शब्द, ही कृती माझ्या जिव्हारी बसते. मला गदगदून येतं.


"नको... नको." मी कसावसा पुटपुटतो. तिच्या पाठीवरून हात फिरवतो. माझ्या स्पर्शात केवड्यातला विखार नसतो, वात्सल्य असतं. तिला ते जाणवतं. ती थरथरते. सुटकेचा निश्वास टाकते अन् मग तिला रडू फुटतं.

मी तिरीमिरीनं बाहेर येतो. बाहेर सगळे गप्प असतात. खाली मान घालून आपापली कामं करीत असतात. मला पाहून सगळी दचकतात.

पंत लगबगीनं पुढं येतात, "काय झालं साहेब? काही त्रास..." त्यांच्या आवाजातली लाचारी मला सहन होत नाही. मी त्यांचे खांदे धरून आवेगाने दाबतो, त्यांना काही समजत नाही. सगळे बावरलेले असतात. माझ्या तोंडून आवाज फुटत नाही आणि मी झपाट्याने बाहेर पडतो.

हवा मोकळी असते, पण माझं डोकं बधिरलेलं असतं, विचाराचं भिरभिरं भिरभिरत राहतं. पाय वेग घेतात. मी कुठे जात असतो, समजत नाही.

● ● ●



उत्तरार्ध :

लेखांक आठवा

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री



हिटलरशी अनाक्रमणाचा करार केल्यापासून स्टॅलिनचा उजवा हात मोलोटोव्ह हा जर्मनीच्या दिग्विजयांचे स्वागत करीत, वेळोवेळी जर्मनांची पाठ थोपटीत होता. पोलंडवर जर्मनीने हल्ला केला, तेव्हा तर रशियाने त्या देशाच्या पाठीत वार करून लुटीतला अर्धा वाटाही घेतला. ९ एप्रिल, १९४० ला नॉर्वे–डेन्मार्कवर हिटलरची सैन्य चालून गेली, तेव्हा शूलेनबर्ग या मॉस्कोतील जर्मन वकिलाला मॉलोटोव्हने सकाळीच भेट देऊन सांगितले, " जर्मनीला हे जे सर्व करण्यास भाग पडत आहे, ते का, याची पुरेपूर जाणीव सोविएट सरकारला आहे. जर्मनीच्या या संरक्षकयुद्धात आम्ही जर्मनीला यश चिंतितो. "

महिनाभराने शूलेनबर्ग हा रिबेन्ट्रॉपच्या सूचनेनुसार मॉलोटोव्हच्या भेटीस गेला व जर्मनीला बल्जम, हॉलंडमधून फ्रान्समध्ये का उतरावे लागले, याचे खास निवेदन त्याने सादर केले. मोलोटोव्हने यावेळीही सांगितले– " अँग्लो–फ्रेंचांची चढाई रोखण्यासाठी, जमनीला हे करावेच लागणार होते. यात जर्मनी विजयी होईल, याबद्दल सोविएट सरकारला खात्री आहे. "

१७ जून, १९४० ला फ्रान्स पडले. मोलोटोव्हने शूलेनबर्गला मोठ्या प्रेमाने आपल्या कचेरीत बोलावले व सांगितले, " जर्मनीच्या युद्धमंडळाने मिळवलेल्या या

आश्चर्यजनक विजयाबद्दल सोविएट सरकार तुमचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे. '' " Warmest congratulations on the splendid success of the German Wehrmacht !

## तीन कोकरे पचवली

परंतु यावेळी फक्त जर्मनीचे अभिनंदन करूनच मोलोटोव्ह थांबला नाही. त्यान शूलेनबर्गलाही धक्का दिला. तीन दिवसांपूर्वी रशियन सैन्ये, लिथुयानिया, लाटाव्हिया व एस्टोनिया या तीन बाल्टिक राष्ट्रांचा कबजा करून बसली होती. **या तिन्ही राष्ट्रांतील कम्युनिस्ट पक्षाखेरीज सर्व पक्षांना बेकायदा ठरविण्यात आले होते** ... व अशा एकपक्षीय देशात १४ जुलैला मुक्त निवडणुका होणार होत्या ! ! (बाकी सर्व पक्षांना बंदी घालून जे लाल प्रतिनिधी निवडून आले, त्यांनी अर्थातच आपआपले देश सोविएट संघराज्यात सामील कराच, असा गोड हट्ट स्टॅलिनपाशी नंतर धरला व ३ ऑगस्टला लिथुयानिया, ५ ऑगस्टला लाटाव्हिया व ६ ऑगस्टला एस्टोनिया—सोविएट संघराज्यात सामील करून घेण्यात आले.)

१४ जूनला पॅरिसमध्ये जर्मन सैन्ये घुसली, त्याच दिवशी या तीन कोकरांना नऊ तासांचे अंतिमोत्तर धाडून रशियन सैन्याने १४ व १५ जूनला त्यांचा खिमा केला. अर्थातच मोलोटोव्हने प्रेमभराने ही बातमी त्याचवेळी म्हणजे १७ जूनला शूलेनबर्गच्या कानी घातली. शूलेनबर्ग चपापला. परंतु करतो काय ! हसतमुखाने त्यानेही लगोलग रशियन सरकारचे या ' लुटी 'बद्दल अभिनंदन केले.

पुढे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात या तिन्ही बाल्टिक राष्ट्रांचे रीतसर कम्युनिस्ट पद्धतीने पिंडदान झाल्यावर मोलोटोव्हने शूलेनबर्गला कळवले,

" या तिन्ही देशांतील जर्मन वकिलाती आता बंद करा, कारण हे तिन्ही देश आता सोविएट रशियात सामील झालेले आहेत– "

तीन बाल्टिक राष्ट्रांच्या घासांनी स्टॅलिनची भूक शमली नाही. फ्रेंच इतक्या झपाट्याने लोळण घेतील, अशी स्टॅलिनला कल्पना नव्हती. त्यामुळे २३ जूनला कोम्पेन येथे हिटलर फ्रान्सच्या छाताडावर बसताच स्टॅलिनने—ही वेळ अधिक आक्रमणाला योग्य असे ठरवून रुमानियाला त्याने खलिता धाडला. " १९१९ साली गिळंकृत केलेला बेसाबेरिया प्रांत व बुकोव्हिना हा प्रांत रशियात सामील करण्यास तयार व्हा, नाहीतर लाल सैन्ये सरहद्द ओलांडतील– "

रुमानियातील तेलाचे साठे व बाल्कन राष्ट्रातून येणारे अन्नधान्य यालाच धोका उत्पन्न झाला, हे पाहताच रिबेन्ट्रॉपने रुमानियाला सल्ला दिला, " तूर्त संघर्ष टाळा. बेसाबेरिया व बुकोव्हिना देऊन टाका– "

२६ जूनला रशियाचा धमकीवजा खलिता गेला. २७ जूनला रिबेन्ट्रॉपचा सल्ला गेला. २८ जून उजाडण्यापूर्वी लाल सैन्याने बेसाबेरिया व बुकोव्हिनावर अंमल केला. आता यांपैकी बेसाबेरिया हा मूळ रशियाचा प्रांत १९१९ साली रुमानियाला वहाल

करण्यात आलेला होता व म्हणूनच अनाक्रमणाच्या कराराच्या गुप्त परिशिष्टात, या प्रांतावरील रशियाचे वर्चस्व हिटलरने मान्य केले होते; पण या घासावर, बुकोव्हिनाची ' तुपाची धार ' वरली गेली, यामुळे हिटलर अधिकच रुष्ट झाला.

## चर्चिल यांचे स्टॅलिनला खासगी पत्र

जूनच्या अखेरीस स्टॅलिन हा हिटलरच्या नादाने नाझी-पद्धतीचीच पापे करू लागला आहे, हे पाहून विन्स्टन चर्चिल यांनी स्टॅलिनला एक खासगी पत्र लिहिले. हिटलवर विसंबू नका, असा सल्ला दिला. स्टॅलिनने या पत्राला उत्तरही पाठवले नाही. रूसो-ब्रिटिश संबंध ताळ्यावर येण्याकरता चर्चिल यांनी डाव्या मजूर पक्षाचे पुढारी सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स यांची मॉस्को येथे वकील म्हणून रवानगी केली. जुलैच्या पहिल्या आठवड्यात क्रिप्स यांनी स्टॅलिन याला प्रत्यक्ष भेटून आपल्या सरकारतर्फे एक गुप्त स्वरूपाचे निवेदन सादर केले. या निवेदनाला स्टॅलिनने पाने पुसली, इतकेच नाही तर दोन सरकारांतील ही देवाणघेवाण काय झाली, याचा सविस्तर वृत्तांत शूलेनवर्गला १३ जुलैला दिला. युद्धोत्तर सापडलेल्या जर्मन कागदपत्रांत स्टॅलिनने, हिटलरची खुषामत करण्याकरता चर्चिल यांना तोंडघशी पाडण्याचे केलेले हे कृत्य पुराव्यानिशी उपलब्ध झाले आहे. या कागदपत्रांत प्रथम ब्रिटिश सरकारने स्टॅलिनला काय लिहिले, ते दिले आहे—

" ब्रिटिश सरकारची अशी खात्री पटली आहे की जर्मनी युरोपात आपले अधिराज्य निर्माण करीत आहे. सोविएट युनियन व ब्रिटन या दोघांना ही गोष्ट धोकादायक आहे. यामुळे दोन्ही देशांनी एकत्र येऊन जर्मनीविरुद्ध संरक्षणाची योजना व युरोपात सत्तेचा समतोल राखण्यासाठी ......"

याला स्टॅलिनचे उत्तर आहे—

" युरोपात कुणा एका राष्ट्राचे अधिराज्यनिर्मितीचे प्रयत्न चालू आहेत, असे स्टॅलिनला वाटत नाही. जर्मनीच्या लष्करी विजयांमुळे सोविएट युनियनला धोका निर्माण झालेला आहे, असे स्टॅलिनचे मत नाही ! सोविएट देशाचे जर्मनीशी मैत्रीचे संबंधच राहणार आहेत—"

हिटलरच्या मनाचा थांग स्टॅलिनला नव्हता, असे कसे म्हणावे ! पण राजनीती वारांगनेसारखी असते हेच खरे. ' माईन काम्फ ' मध्ये हिटलरने स्वच्छ सांगितले होते—

" When we think of new territory in Europe, we must think principally of Russia & her border Vassal States. The colossal empire in the east is ripe for liquidation & the end of the Jewish domination in Russia will also be the end of Russia as a state—"

[ युरोपात आपल्याला अधिक प्रदेश कुठे मिळू शकेल, याचा विचार केला, तर

आपण मुख्यतः रशिया व त्याच्या सरहद्दीवरील चिल्लर देशांकडेच वळले पाहिजे. पूर्वेकडील हे प्रचंड साम्राज्य दिवाळे काढण्यासाठी अगदी योग्य असे झाले आहे आणि एकदा रशियातील ज्यूंचे वर्चस्व आपण संपविले, की रशियाचे राष्ट्र म्हणून अस्तित्वही संपलेच... ]

रशियावर प्राणसंकट आणण्याची ही कल्पना हिटलरच्या मनात पक्की घर करून होती. म्हणूनच पोलंडचा कबजा होताच त्याने सैन्याला आज्ञा दिली होती–

" पोलंडमधील सडका सुस्थितीत ठेवा. आपल्या पुढल्या हालचालींची पार्श्वभूमी तीच राहणार आहे." (१८ ऑक्टोबर, १९३९)

अर्थातच फ्रान्स पडल्यानंतर जेव्हा ब्रिटिश–फ्रेंच सैन्ये युरोपातून पळाली, तेव्हा रशियावर हल्ला करण्याच्या दृष्टीने एक अट पूर्ण झाली–पश्चिमेकडे आघाडीच उरली नाही.

## रिबेन्ट्रॉपचा व्हिएन्ना–अवॉर्ड !

हे सर्व असूनही स्टॅलिनने बाल्टिक राष्ट्रे गिळंकृत करून बाल्कन राष्ट्रांपैकी रुमानियाला नागवले नसते, तर कदाचित रशियावरील हल्ल्याचा विचार अधिक लांबलाही असता ! पण स्टॅलिनने या दोन्ही हालचाली करून हिटलरला रशियाच्या स्वारीसाठी सबळ कारणेही उपलब्ध करून दिली.

३१ जुलै, १९४० रोजी बर्गहॉफ् येथे सैन्याधिकाऱ्यांपुढे बोलताना रशियावरील नियोजित हल्ल्याचा प्रथम उल्लेख फ्यूररने केला. त्यावेळी त्याने सांगितले–

" ब्रिटन–रशिया व अमेरिकेच्या जिवावर उड्या मारीत आहे. जर रशियाचा फडशा पाडला, तर ब्रिटनची रशियाबाबतची आशा मावळेल व त्याचबरोबर अमेरिकेवरही अवलंबून राहाणे अशक्य होईल. कारण रशियाचा काटा काढताच अतिपूर्वेकडे जपानची शक्ती अवाढव्य होऊन राहील."

पुढील महिना–दोन महिने हिटलरच्या मनात रशियावरील हल्ल्याची अंगेउपांगे आकार घेत होती. २० सप्टेंबरला त्याने यादृष्टीने प्रत्यक्ष हालचाल केली. जर्मनीचे लष्करी शिष्टमंडळ रुमानियाला त्याने त्या दिवशी रवाना केले. त्यांच्याकडे कामगिरी होती–

(१) रुमनियाचे तेलसाठे सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने पाहाणी करणे व (२) सोविएट रशियाशी युद्ध पेटलेच, तर रुमानियातून जर्मन सैन्य कुठे कुठे रशियात घुसवता येईल, याची पाहणी करणे.

मध्यंतरी एक घटना घडली होती. रुमानियाचा लचका रशियाने तोडलेला पाहताच हंगेरीने ट्रॅन्सव्हॉलनिया हा आपला प्रांत रुमानियाकडे परत मागितला. हा प्रांत परत न दिल्यास रुमानिया व हंगेरी यांच्यात युद्ध पेटेल व असे युद्ध पेटले, तर रशिया हंगेरीतही सैन्य पाठवून पुनः या बेकीचा फायदा उठवील, याची अटकळ हिटलरला आली. त्याने रिबेन्ट्रॉपला व्हिएन्ना येथे हंगेरी व रुमानियाच्या प्रतिनिधींची

कानउघाडणी करण्याची कामगिरी दिली. २८ ऑगस्टला रिबेन्ट्रॉपने दोन्ही देशांच्या प्रतिनिधींना धमकीवजा कानपिचक्या दिल्या व एका दगडात दोन पक्षी कसे मारले पाहा–

ट्रॅन्सव्हालनिया हंगेरीला देऊन टाका, असे त्याने रुमानियाला सांगितले. उरलेला रुमानिया हा लष्करीदृष्टया आता जर्मन संरक्षणाखाली सुरक्षित राहील, अशा दृष्टीने तसा करारच करून टाकला.

रिबेन्ट्रॉपचे हे 'व्हिएन्ना अॅवॉर्ड' पाहून मोलोटोव्हच्या पोटात शूळ उठला. या अॅवॉर्डचा फायदा घेऊन जर्मन सैन्ये रुमानियाचा कबजा करणार, हे आता उघड झाले.

व्हिएन्नात काय झाले, ते मॉस्कोत समजावून सांगण्याची कामगिरी शूलेनबर्गवर आली. शूलेनबर्ग–मोलोटोव्ह भेट झाली. मोलोटोव्ह याने रुमानियाबाबत करार करून जर्मनीने अनाक्रमणाच्या करारातील कलमांचा भंग केला आहे, असा निषेध व्यक्त केला. रशियाचे म्हणणे, याबाबतीत रशियाला विचारणे कराराप्रमाणे आवश्यक होते. (१–९–१९४०)

ज्या दोन दरोडेखोरांच्या अनाक्रमणाच्या करारामुळे त्यातील एकाला १–९–१९३९ ला महायुद्ध भडकवणे शक्य झाले, ते दोघे बरोबर युद्धाच्या वर्षदिनी आता भांडूतंडू लागले !!

या पाठोपाठ ६ सप्टेंबरला शूलेनबर्गने मोलोटोव्हला कळवले, की नॉर्वेमध्ये पाठविले जाणारे जर्मन सैन्य व रसद ही फिनलंडमार्गे यापुढे जाणार आहे !

## त्रिपक्षीय संरक्षण–करार

२६ सप्टेंबरला जर्मन वकिलातीतून मॉस्को येथे रशियन सरकारला खालील गंभीर संदेश मिळाला–

"पुढील काही दिवसांत जपान, इटाली व जर्मनी बर्लिन येथे एक लष्करी करार करणार आहेत. या कराराचा रोख रशियाविरुद्ध नाही व तसे या करारात स्पष्टपणे नमूद करण्यात येईल–"

२६ तारखेला शूलेनबर्ग हा रजेवर होता. मॉस्कोत फक्त जर्मन वकिलातीतील कनिष्ठवर्गच सर्व कामे करीत होता. यामुळे मोलोटोव्हला लेखी खुलासे मागण्यापलीकडे काही करता येईना. त्याने खुलासा मागितला–

"त्रिपक्षीय संरक्षण करार काय आहे, त्याची कलमे त्यावर सह्या होण्यापूर्वी आम्हास कळवावी. त्याचप्रमाणे या कराराला काही गुप्त परिशिष्टे आहेत काय ?"

हिटलर हळूहळू रशियाभोवती फास आवळीत आहे, याची मोलोटोव्हला पक्की खात्री आता झाली होती. फिनलंडमधून जर्मन सैन्य जाते, त्यासंबंधी काय करार झाला आहे, तेदेखील कळवा, असे त्याने जर्मन वकिलातीला बजावले.

मॉस्कोमध्ये हे कागदी घोडे नाचत असताना तिकडे बर्लिन येथे २७ सप्टेंबर,

१९४० ला जपान, जर्मनी व इटाली यांचा लष्करी करार होऊन त्यावर सह्याही झाल्या.

तसे या करारात काही खास नव्हते. रशियावरील हल्ल्याच्या दृष्टीने वेळच आली, तर रशियाच्या पाठीत वार करण्यासाठी हिटलरने फक्त जपानला आपल्या कच्छपी लावून ठेवले होते, इतकेच ! या करारात मुख्य कलमे तीन.

(१) युरोपात जर्मनी व इटाली यांचे नेतृत्व जपान मान्य करीत आहे.

(२) अतिपूर्वेकडे जपानचे नेतृत्व राहावे, याला जर्मनी व इटाली मान्यता देत आहेत.

(३) या तिन्ही राष्ट्रांपैकी कुणावर परकी सत्तेने हात उचलल्यास जपान, जर्मनी, इटाली यांनी परस्पर सहाय्य करावे.

या करारामुळे लाल नेत्यांपुढे प्रथम काजवेच चमकले. चोराच्या वाटा चोराला ठाऊक ! हा करार वरवर अमेरिकेविरुद्ध असला, तरी त्याचे एक 'पाते' रशियावरून फिरू शकते, याची कल्पना मोलोटोव्हला आली.

रशियन नेते अस्वस्थ झाले आहेत, याची कल्पना रिबेन्ट्रॉपलाच होतीच. त्याने १३ ऑक्टोबर, १९४० ला मार्शल स्टॅलिनला खास पत्र लिहिले. त्याने या पत्रात लिहिले आहे–

"लढाई जवळजवळ संपल्यासारखीच आहे. ब्रिटन किती काळ दम काढू शकते, तेवढेच पाहावयाचे आहे–" अशी सुरवात करून, त्रिपक्षीय करार हा अमेरिका-विरोधी असल्याने रशियाच्या फायद्याचाच आहे, असा दिलासा पुढे दिलेला आहे. अखेर रिबेन्ट्रॉपने विचारले होते––

"तुम्ही मोलोटोव्ह यांनाच फ्यूररला भेटावयास का धाडीत नाही ? म्हणजे फ्यूरर प्रत्यक्ष भेटीत आपल्या दोन्ही देशांतील भावी संबंधाचे त्यांचे चित्र सांगू शकतील !"

स्टॅलिनने उत्तर लिहिले, ते ८–९ दिवसांनी. त्याने कळवले—

"मोलोटोव्ह याने बर्लिनला भेट द्यायलाच हवी. त्याने तुमचे निमंत्रण स्वीकारले आहे..."

## 'लाल कोल्हा' बर्लिनमध्ये

मोलोटोव्ह बर्लिनला पोचला तो दिवस १२–११–१९४० होता. शिरर विमानतळावर हजर होता. शिरर लिहितो–"मोलोटोव्ह एखाद्या आतल्या गाठीच्या शाळामास्तरसारखा दिसत होता. बाकी क्रेमलीन्च्या स्पर्धेत टिकून राहावयाचे म्हणजे माणूस असाच हवा !"

मोलोटोव्ह हा वाटाघाटीत कसा धोरणाचा पक्का व हुकमाचा एक्का होता, हे त्याच्या या भेटीत रिबेन्ट्रॉप व हिटलरशी ज्या मुलाखती झाल्या, त्यांच्या दुभाष्याने लिहून ठेवलेल्या वृत्तांतावरून स्पष्ट होते. गाठीचे सोडणार नाही व आतली गाठ

सांगणार नाही, असा हा 'लाल कोल्हा' रिब्बेन्ट्रॉपसमोर फारसे बोललाच नाही. रिबेन्ट्रॉपची आत्मस्तुती व लांबलचक भाषण संपले, की एखाद्या प्रश्नातच तो त्याला आडवा घाली ! रिबेन्ट्रॉपने सांगितले—

"रशिया-जर्मनी-जपान व इटाली यांनी आपआपल्या वर्चस्वाच्या कक्षा ठरवून घेण्याची वेळ आता आलेली आहे. फ्यूररचे असे मत आहे, की आता सर्वांनी दक्षिणेच्या दिशेने हातपाय पसरले पाहिजेत. जपान व इटाली दक्षिणेच्या बाजूसच वळले आहेत. जर्मनीने एकदा युरोपची घडी नीट बसवली, की जर्मनीही मध्य आफ्रिकेच्या दिशेने वळू म्हणतो ! रशियानेही दक्षिणेकडील बाजूने समुद्राच्या दिशेने मार्ग काढायला काय हरकत आहे ?"

मोलोटोव्हने फक्त एवढेच विचारले—

"हा कुठला समुद्र ?"

रिबेन्ट्रॉप गडबडला. कारण फिनलंड व रुमानियात जर्मन सैन्येच घुसलेली असताना आता कुठला नवा समुद्र रशियाने पाहावयाचा ? रिबेन्ट्रॉपने विषय फिरवलाच. मोलोटोव्हनेही यजमानाला अधिक पेचात टाकले नाही...कारण त्याने आपला सर्व दारूगोळा हिटलरसाठी राखून ठेवला होता.

## हिटलरच्या गुहेत

रिबेन्ट्रॉपनंतर मोलोटोव्ह-हिटलर भेट झाली. मोलोटोव्ह–हिटलर सुखसंवाद वाचताना देशाचे मंत्री किती चाणाक्ष असावे लागतात, हे ध्यानात येते. परदेशीय वकिलाती व परराष्ट्रखाते हे केवळ जन्मभर उनाडक्या करण्यासाठी आहे की काय, अशी शंका काही काही परराष्ट्रखात्यांतील माणसे पाहून यावी, अशी आज परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर हिटलरच्या गुहेत शिरून त्याला खडे चारणारा मोलोटोव्ह कसा होता, ते पाहा—

नेहमीप्रमाणे प्रथम हिटलरने बोलून घेतले. त्याने सांगितले—

"जरा हवामान सुधारले, की जर्मनी इंग्लंडला अखेरचा रामटोला देईल. अमेरिका गडबड करण्याची शक्यता आहे; परंतु १९७० किंवा ८० पूर्वी अमेरिकेला ब्रिटनसाठी काही करता येणे अशक्य आहे. शिवाय युरोपात, आफ्रिकेत किंवा आशियात अमेरिकेचा काय संबंध...?"

यावर मोलोटोव्ह म्हणाला—

"आपल्या या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. परंतु हे सर्वसाधारण-मत-प्रदर्शन झाले. मला मॉस्कोहून निघताना स्टॅलिन यांनी काही विवक्षित प्रश्नांबाबत शहानिशा करण्याचा आदेश दिला आहे..."

एवढं म्हणून हातातली वही मोलोटोव्हने हिटलरपुढे टाकली. त्यात विलक्षण प्रश्न लिहिलेले होते !

(१) फिनलंडमध्ये जर्मनी कशाकरता गेला आहे ?

(२) युरोपात व आशियात जी नवी घडी बसवली जाणार आहे, त्यात रशियाचे स्थान काय ?

(३) बल्गेरिया, रुमानिया व तुर्कस्थान या देशांत रशियाचे हितसंबंध गुंतलेले आहेत व यासंबंधी संपूर्ण खुलासा करून घ्यावयाचा आहे.

हिटलरने ही प्रश्नावली पाहाताच–" आता कदाचित ब्रिटिश विमानांची बॉम्ब-फेक होण्याची शक्यता असल्याने उरलेले बोलणे उद्या पुढे चालू करू, " असे सांगून त्या दिवशी बोलणीच स्थगित केली.

मोलोटोव्हच्या लक्षात आले, की गोळया अचूक लागल्या आहेत.

दुसऱ्या दिवशी हिटलरने एकएका प्रश्नावर चर्चेला तोंड फोडले. प्रथम फिनलंड-बाबत हिटलरने खुलासा केला––

" फिनलंडचा कबजा जर्मनीने केलेला नसून, आम्ही फिनलंडमार्गे नॉर्वेत सैन्य-वाहतूक करीत आहोत व हे आपणास कळवलेले आहे. परंतु मलाच असे विचारा-वयाचे आहे, की रशियाचा फिनलंडशी पुनः युद्ध सुरू करण्याचा विचार आहे की काय ? "

मोलोटोव्ह बोलेना. नुसता बसून राहिला. कारण या प्रश्नाला खरे उत्तर देता येत नव्हते. फिनलंड एकाकी असताना रशियन रणगाडे बर्फात रुतून बसले. मग या वेळी जर्मन सैन्ये तेथे असताना रशिया काय युद्ध पेटवणार ? परंतु तसा कोरा चेकही हिटलरला देणे सोईचे नव्हते. मोलोटोव्ह गप्प बसला.

हिटलरने या वेळी त्याला लगोलग बजावले– " काही झाले, तरी बाल्टिक समुद्रात युद्ध होता कामा नये ! यामुळे रूसो–जर्मन संबंधांना ताण पडेल व याचा परिणाम काय होईल, सांगता येत नाही– ! "

एवढे सांगून हिटलरनेच विचारले,

" आता रशियाची फिनलंडबाबत अपेक्षा तरी काय आहे ? "

मोलोटोव्हने ताडकन सांगितले,

" बेसाबेरियाप्रमाणे फिनलंड सोविएट संघराज्यात सामील करावयाचे आहे..."

आता हिटलर गडबडला. आतापर्यंत त्याच्या तोंडावर आक्रमणाची भाषा कुणी उच्चारली नव्हती; परंतु मनाचा तोल सांभाळून फ्यूररने पुनः बजावले,

" पण फिनलंडशी युद्ध करून हे करणे शक्य नाही. कारण असा संघर्ष उडालाच, तर त्याचे दूरगामी परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत ! "

संभाषण तापू लागलेले पाहताच रिबेन्ट्रॉपने मध्येच म्हटले,

" परंतु फिनलंडच्या प्रश्नावर वाद कशाला ? याबाबतीत काही गैरसमज असेल, तर पुढे पाहू......"

यावेळी विषय पालटूनही पुनः मोलोटोव्हने लगोलग रुमानियाचाच प्रश्न उप-स्थित केला. त्याने स्पष्ट सांगितले–



मोलोटोव्ह

"जर्मनीने रुमानियात जो हस्तक्षेप केला आहे, तो सोविएट रशियाच्या तेथील हितसंबंधांना विरोधी आहे व रुमानियाशी केलेला करार जर्मनीने संपुष्टात आणावा–";

हिटलरने याला स्वच्छ नकार दिला.

लगेच मोलोटोव्हने विचारले,

"रुमानियाला तुम्ही जशी लष्करी संरक्षणहमी दिली आहे, तशीच रशियाने बल्गेरियाला दिली तर–?"

हिटलरची भुवयी यावेळी किती कमानदार झाली असेल, याची कल्पना करावी! हिटलरने विचारले– "अशी हमी बल्गेरियाने मागितली आहे काय? आमच्या तरी असे कानी नाही आणि समजा तसे काही असले, तरी यासंबंधी रशियाला निश्चित उत्तर देण्यापूर्वी मला मुसोलिनीचा विचार घ्यावा लागेल– !"

मोलोटोव्हचे औद्धत्य आता फ्यररला अधिक सहन होण्यासारखे नव्हते.

सायंकाळ होत आली होतीच. बाँबहल्ल्याच्या धोक्याचे कारण सांगून त्या दिवशीची बैठकही तहकूब करण्यात आली.

## बाँबहल्ला आणि पळापळ

–आणि या रात्रीं खरोखरच ब्रिटिश विमाने रात्री बर्लिनवर आली. यावेळी मोलोटोव्हने जर्मन नेत्यांसाठी रशियन वकिलातीत खाना आयोजित केलेला होता. रात्रीचे नऊ वाजत आले होते. मोलोटोव्हने सुरवातीचे भाषण केले. रशियन टोस्टला उत्तर देण्यासाठी रिबेन्ट्रॉप उभा राहिला असेल नसेल, तोच विमान-हल्ल्यांची सूचना देणारा भोंगा वाजू लागला. एकच गडबड उडाली. रशियन शिष्टमंडळाचे मोलोटोव्ह आदि सभासद व नाझी नेते धावत पळत हातातले ग्लासेस् तसेच टाकून तळघरात पळाले.

वकिलातीसमोरच्या अडलोन् हॉटेलातून (Adlon) शिरर आदि पत्रकार ही धावपळ पाहात होते.

तळघरात मोलोटोव्ह व रिबेन्ट्रॉप जवळजवळ उभे होते. हिलगर (Hilger) हा रशियन वकिलातीतील जर्मन दुभाष्या त्यांचेशेजारी उभा होता.

तळघराबाहेर ब्रिटिश विमाने बाँबफेक करीत होती व विमानविरोधी तोफांचे आवाज निघतच होते. खाणे–पिणे टाकून पळाल्यामुळे आता रिबेन्ट्रॉपने पुनः दुपारचाच विषय काढला. त्याने मोलोटोव्हला म्हटले,

" ब्रिटिश साम्राज्याचे जे मोठे छकलीकरण आता सुरू होत आहे, त्यासाठी रशिया आमच्याशी सहकार्य करणार की नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे..."

आपले म्हणणे स्पष्ट करताना रिबेन्ट्रॉप पुन:पुन्हा हेच विधान करीत होता–
" इंग्लंड आता संपल्यासारखेच आहे...! "

मोलोटोव्हने यावेळी रिबेन्ट्रॉपला ताडकन विचारले– " इंग्लंड संपले– संपले म्हणता ना–मग आपण इथे आता तळघरात का ? बाहेर बाँबफेक सुरू आहे, ती कोण करीत आहे ? "

मोलोटोव्ह लेचापेचा नाही, हे रिबेन्ट्रॉप व हिटलरच्या ध्यानी आले. असे सर्व असूनही जपान–जर्मनी–इटाली व रशिया या चौघांनी नवा लष्करी करार करावा, ही जर्मनीची सूचना मोलोटोव्हने स्वीकारली... व काय अटीवर रशिया हे करू शकेल, हे मॉस्कोला गेल्यावर कळवतो, असे सांगून मोलोटोव्ह मॉस्कोला निघाला.

२६ नोव्हेंबरला रशियाने आपल्या अटी शूलेनबर्गला कळवल्या, त्या अशा–

(१) फिनलंडमधून जर्मनीने फौजा काढून घ्याव्या. रशियाच्या वर्चस्वाखालीच फिनलंड राहील.

(२) बल्गेरियाला रशियाशी करार करून बास्फोरस व दार्दानेल्स या सामुद्रधुनीच्या टप्प्यात रशियाला लष्करी व नाविक तळ ठेवू देण्यास भाग पाडावे.

(३) पर्शियन आखातात रशियाचे हितसंबंध मान्य करण्यात यावेत.

(४) जपानने साखालिन येथील कोळसा व तेलऱ्यांवरील हक्क सोडावा.

या अटी वाचताच हिटलरने उद्गार काढले–

" Stalin is clever and cunning. He demands more and more. He is a cold blooded blackmailer. A German victory has become unbearable for Russia. Therefore she must be brought to her knees as soon as possible. "

[ स्टॅलिन हा डोकेबाज व लुच्चा आहे. त्याची हाव वाढतेच आहे. थंड काळजाचा तो हरामखोर मनुष्य आहे. जर्मनीचे विजय रशियाला पाहवत नाहीत. ते काही नाही–रशियाला लवकरात लवकर गुडघे टेकायला लावल्याशिवाय गत्यंतर नाही– ]

पुढच्या आठवडा-दोन आठवड्यांत हिटलरने स्टॅलिनच्या कारस्थानांचा पुष्कळ विचार केला व अखेर १८ डिसेंबर, १९४० ला त्याने रशियावरील हल्ल्याचा परवलीचा शब्द–operation Barbarossa (ऑपरेशन बार्बारोसा) आज्ञापत्राच्या मध्यभागी लिहून फर्मान काढले, ते असे–




फ्यूरर्स क्वार्टर्स (अत्यंत गुप्त) १८-१२-१९४०

इंग्लंडबरोबरचे युद्ध संपण्यापूर्वीच सोविएट रशियाला झपाट्यासरशी चिरडून टाकण्याकरता जर्मन लष्करी दलांनी तयारी सुरू करावी.

१५ मे १९४१ पूर्वी ही तयारी पूर्ण झाली पाहिजे. हल्ला करण्याची तयारी चालू आहे, याचा सुगावा लागणार नाही, याविषयी सर्व काळजी घ्यावयाची आहे.

—— अॅडाल्फ हिटलर.

याच आज्ञापत्रात रशियावरील चढाईची सर्व रूपरेखा हिटलरने स्पष्ट केली आहे. रशियावरील हल्ल्याचे मुख्य तीन विभाग राहाणार होते. फिनलंडच्या दिशेने होणारा हल्ला लेनिनग्राड उद्देश ठेवून होणार होता. हा पहिला विभाग. पोलंडमधून बाहेर पडणाऱ्या जर्मन सैन्याचे दोन विभाग होणार होते. प्रीपेट मार्शिस या दलदलीच्या विभागाला मध्यबिंदू कल्पून हे दोन्ही जर्मन सैन्यांचे लोंढे विरुद्ध दिशांना वळणार होते. मार्शिसच्या उत्तरेकडील जर्मन सैन्य बाल्टिकच्या दिशेने रशियन सेनेला लेनिनग्राडच्या दिशेने चेपीत कोंडीत धरणार होते. या व्यूहाचा एक जबडा वर फिनलंडकडून उघडला जाणार होता...व दुसरा जबडा म्हणजे लेनिनग्राडच्या दक्षिणेकडून येणारा, या जर्मन सैन्याचा हा दुसरा विभाग राहाणार होता.

तिसरा विभाग युक्रेनमधून घुसून, कीव्ह कबजात घेऊन, रशियन सेनेला डिनेपर नदीपलीकडे पिटाळून लावणार होता. हा तिसरा विभाग ओडेसा या काळ्या समुद्रावरील बंदराच्या दिशेने रेटा देणार होता.

अशारीतीने १९४० चा नाताळ उजाडण्यापूर्वी हिटलरने आपल्या भवितव्याचा अखेरचा फासा फेकला होता. एकदा हा महत्त्वाचा निर्णय—चुकीचा वा बरोबर—घेतल्यानंतर त्याच्या मनावरचे मोठे दडपण संपले व जर्मन सैनिकांच्या सहवासात नाताळ साजरा करण्यासाठी हिटलर इंग्लिश खाडीकाठी फ्रेंच भूमीवर दाखल झाला.

या विश्रांतीच्या काळात त्याच्या मनात कुठले विचार येत असतील ? रशियाच्या रणांगणावर पराभव पावलेला स्वीडनचा राजा बारावा चार्लस् किंवा नेपोलियन बोनापार्ट यांच्यासारखी तर आपली गत होणार नाही ना, या शंकेने तो मध्येच अस्वस्थ झाला असेल काय ? तर्क करायचा, तर हे शक्य वाटत नाही. कारण जगज्जेत्यांच्या नामावळीत कायमचे स्थान मिळवलेल्या व्हिएन्नातील एकेकाळच्या या उनाड पोराला, हल्ला केल्यापासून रशिया महिनाभरात फ्रेंचांप्रमाणे करगारी जमिनीवर लोळण घेणार, याबद्दल मुळीच शंका वाटत नव्हती. आपला पराभव शक्ती अजून जन्मालाच आलेली नाही, अशा आत्मसंतुष्ट अवस्थेत फ्यूरर यावेळी होता.

१८ डिसेंबर, १९४० ला ब्रिटनवरील स्वारीचा विचार स्थगित करून, रशियावरील हल्लयाचा आदेश देणाऱ्या फ्यूररला आठवड्याभरापूर्वी इजिप्तमध्ये इटालियन सैन्याचा फज्जा उडाल्याच्या बातम्या मिळालेल्या होत्या.

सप्टेंबर महिन्यात मार्शल रुडॉल्फो ग्राझियानी या इटालियन सेनानीच्या फौजांनी

इजिप्तमध्ये ६० मैलांची मुसंडी मारून सिदी बरानी हस्तगत केले होते. त्यांची सिदी–बरानीपासून ७५ मैलांवर असलेल्या मेर्सामाजूह बंदराकडे वाटचाल चालू होती. मेर्सामाजूहला इटालियन फौजा पोचल्या, की त्यांना जर्मन सैन्याची कुमक लिबियामार्गे पाठवून भूमध्य समुद्रात ब्रिटिशांना पेचात धरावयाचे, असे हिटलरने ठरवले. ग्राझियानी हा मेर्सामाजूहपर्यंत डिसेंबर, ४० अखेर तरी पोचेल, तशी त्याची अपेक्षा होती.

## मुसोलिनीचा उन्माद

इजिप्तमध्ये सुरवातीच्या विजयाने फुगलेल्या बेनिटो मुसोलिनीने उन्मादात एक गाढवपणा करून ठेवला होता. आपला परममित्र म्हणवणारा हिटलर, त्याचे पुढचे बेत आपल्याला कळवत नाही, आपला विचार घेत नाही व काय करायचे ते केल्यावर या ना त्या सबबीवर आपली नंतर फक्त समजूत घालतो, ही गोष्ट मुसोलिनीच्या लक्षात आता आली होती. अगदी ताजी घटना म्हणजे ३० ऑगस्टला 'व्हिएन्ना–अवॉर्ड' देऊन हिटलरने लष्करीदृष्ट्या रुमानियाला आपल्या पंखाखाली घेतले, या घटनेची गंधवार्ताही मुसोलिनीला आधी कळलेली नव्हती. मैत्री हीदेखील दोन समान ताकदीच्या व ऐश्वर्याच्या पातळीवरच टिकू शकते. मुसोलिनीच्या मनात ही त्याला मिळणारी दुय्यम दर्जाची वागणूक डाचत होती.


या गोष्टीचा कळस झाला, तो म्हणजे २३ ऑक्टोबरला, हिटरलने फ्रँकोची भेट घेतली तेव्हा ! ही गोष्ट मुसोलिनीला कळली, तेव्हा तो मनातून उद्विग्न झाला. ४ ऑक्टोबर, १९४० ला म्हणजे १५–२० दिवसांपूर्वी हिटलरला तो ब्रेनर–खिंडीपाशी भेटला, तेव्हा फ्रँको भेटीविषयी हिटलरने चकार शब्दही उच्चारला नाही. अर्थातच फ्रँको–हिटलर भेटीचे वृत्त मुसोलिनीला कळताच मनातला राग उफाळून बाहेर पडला. आपला जावई व इटालीचा परराष्ट्रमंत्री सियानो यांचेपाशी त्याने सांगितले–

"Hitler always faces me with a 'fait accompli.' This time I am going to pay him back in his own coin. He will find out from the newspapers that I have occupied Greece."

[ हिटलरला सर्व गोष्टी मला होऊन गेल्यानंतर सांगण्याची सवयच झाली आहे. यावेळी मी त्याच्याचप्रमाणे वागून त्याला धडा शिकवणार आहे. वृत्तपत्रांतूनच त्याला हे कळेल, की मी ग्रीसचा कबजा केला आहे. ]

२८ ऑक्टोबरला फ्लॉरेन्स येथे हिटलर–मुसोलिनीची भेट ठरली होती. त्याच दिवशी पहाटे इटालियन सैन्याने अल्बानियाची (अल्बानियाचा कबजा मुसोलिनीने पूर्वीच केला होता) सरहद्द ओलांडून ग्रीसवर हल्ला चढवला.

सकाळी फ्लॉरेन्स येथे हिटलरच्या स्वागतासाठी मुसोलिनी उपस्थित झाला. त्याच्या चेहऱ्यावर मित्राला धडा शिकवल्याचे समाधान विलसत होते. ग्रीस चुटकीसरसा घशात घातला, की जर्मनीच्या तोडीस तोड आपण आहोत, हे लवकरच सिद्ध



हिटलर
मुसोलिनी

होईल, असे मनात मांडे खात, त्याने स्टेशनवर गाडीतून उतरणाऱ्या फ्यूररचे स्वागत केले. त्याचा हस्तांदोलनाचा हात हिटलरच्या हाती असतानाच मुसोलिनीने बेदरकारपणे सांगितले–

–" Furhrer, we are on the march !

–" फ्यूरर, आमची नवी चढाई सुरू झाली आहे ! विजयी इटालियन फौजांनी आज पहाटे ग्रीसोअल्बानियन सरहद्द ओलांडली आहे ! "

मुसोलिनीच्या अपेक्षेप्रमाणे हिटलर चपापला. काहीसा हतबुद्ध झाला. परंतु मुसोलिनीच्या कल्पनेप्रमाणे हिटलरला आपल्या मित्राने हा आपल्यावर काहीसा सूड उगवला आहे, असे काहीच वाटले नाही; किंवा मुसोलिनीच्या या धाडसाचे त्याला कौतुकही वाटले नाही. त्याच्या हतबुद्धतेची कारणे वेगळी होती...त्याच्या अपक्षेप्रमाणे इतरत्र गोष्टी घडत नसताना, आपल्या परम मित्राने हा नवा गोंधळ बाल्कनमध्ये निर्माण करून ठेवावा, हे पाहून तो मनातून चिडला मात्र होता. मुसोलिनीने आणलेले शौर्याचे उसने अवसान तो ओळखीत होता. पाठीत वार करूनही फ्रान्समध्ये इंचभर



जनरल फ्रँको

पुढे सरकू न शकलेल्या इटालियन फौजा इजिप्तमध्ये ब्रिटिशांना बेसावध अवस्थेत सुरवातीला मागे रेटू शकल्या, तरी ग्रीसमध्ये कदाचित हे हात दाखवून अवलक्षण ठरण्याची शक्यता आहे, हे तो जाणून होता. बाल्कनमध्ये मुसोलिनीने असा काही घोटाळा करू नये, हे त्याला बजावण्याकरता वस्तुत: तो आला होता, परंतु उशीर झाला होता आणि मुसोलिनी एखाद्या नाटकातल्या सेनापतीप्रमाणे श्रोत्यांवर परि. णामाची अपेक्षा करीत त्याला आता सांगत होता–

"फ्यूरर, आमची नवी चढाई सुरू झाली आहे!"

## फ्रॅन्कोने दगा दिला

ज्या फॅन्कोभेटीमुळे चिडून मुसोलिनीने हिटलरवर मात करण्याकरता ही ग्रीस-चढाईची योजना आखली होती, ती फॅन्को-फ्यूरर भेट असफल झाल्यामुळे हिटलर आधीच काळजीग्रस्त होता. स्पेनच्या यादवीयुद्धात हिटलर–मुसोलिनीच्या सहकार्या-वर स्पेनचा हुकूमशहा बनलेला हा जनरल फ्रँको, जेव्हा फ्रान्स पडले, तेव्हा आपण-हून सांगत होता–" फ्रेंचांचे आफ्रिकेतील साम्राज्य खतम करण्याकरता मी लवकरच युद्धात उडी घेणार आहे." तोच फ्रँको आता चार महिन्यांनंतर कानांवर हात ठेवू लागला होता.

२३ ऑक्टोबर, १९४० ला फ्रेंच–स्पॅनिश सरहद्दीवरील हेनडे (Hendaye) या शहरी हिटलर–फ्रँको यांची भेट झाली.

'इंग्लंड फार थोडे दिवस तग धरू शकेल,' या हिटलरच्या निदानावर फ्रँको विश्वास ठेवण्यास तयार होत नव्हता. हिटलर तर येताना फ्रॅन्कोला तारखा देण्याच्या तयारीने आला होता—१० जानेवारी, १९४१ ला फ्रॅन्कोने ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारावे. बेल्जियमच्या एबेन्–एमेल हा अत्यंत कठीण दुर्ग चुटकीसरशी सर करण्याचा जर्मन छत्रीधारी सैनिकांच्या मदतीने जिब्राल्टरचा स्पेनने कबजा करून, भूमध्यसमुद्राचे नाक दाबून ब्रिटिश आरमाराला यथेच्छ बुक्क्यांचा मारा देण्याची हिटलरची योजना होती. हिटलरच्या गाडीच्या खास डब्यात हिटलर–फ्रॅन्को खलबते सतत नऊ तास चालली होती. स्पेन युद्धात पडले, तरी जिब्राल्टरसाठी जर्मनीची मदत घेणे कमीपणाचे आहे. युद्धात प्रत्यक्ष पडण्यापेक्षा तटस्थ राहूनच हिटलरच्या स्पेन अधिक उपयोगी पडू शकेल, अशा भूमिकेचा आश्रय फ्रॅन्कोने केलेला पाहून हिटलरची घनघोर निराशा झाली. रिबेन्ट्रॉपला फ्रॅन्कोशी पुढील बोलणी करण्याकरता मागे ठेवून जाताना हिटलरने रिबेन्ट्रॉपला सांगितले—

"That ungrateful coward! He owes us everything & now won't join us...".

[हा कृतघ्न भ्याड माणूस आज या पदावर आहे, याचे खरे श्रेय आपले आहे आणि आता प्रसंग आला, तेव्हा मात्र हा आपल्याला मदत करू इच्छित नाही,!]

फ्रॅन्कोने केलेला विश्वासघात पाहून 'हेचि फळ काय मम तपाला,' असा विचार सतत मनात येत असतानाचं हिटलर चार दिवसांनी मुसोलिनीला भेटायला आला होता आणि नेमका नको तो घोटाळा मुसोलिनीने याचवेळी करून ठेवला होता. बाल्कन्समध्ये युद्ध पेटवण्याची ही वेळ नव्हती— निर्माण केलेले युद्ध चुटकीसरशी संपविण्याची मुसोलिनीची कुवतही नव्हती.

## मुसोलिनीची फटफजिती

याचा परिणाम अपेक्षेप्रमाणे झाला. विजयाचे ढोल बडवीत अल्बानियाची सरहद्द ओलांडून ग्रीसमध्ये घुसलेले इटालियन सैन्य फक्त एकच आठवडा पुढे सरकू शकले व मग ग्रीक सैन्याने असा प्रखर प्रतिकार मांडला, की इटालियन सैन्याचे डोळेच पांढरे होण्याची पाळी आली. ब्रिटिश आरमाराने क्रीट बेट व लेमनॉस बेटांचा कबजा करून ग्रीकांच्या मदतीसाठी ग्रीसमध्ये सैन्य उतरवले. ब्रिटिश सैन्याची कुमक येताच ग्रीक फौजांनी आक्रमक इटालियन फौजांना देशाच्या सरहद्दीबाहेर पिटाळून लावले. शत्रूला सरहद्दीपलीकडे पाहुण्याला पोचवून यावे, त्याप्रमाणे परत येण्याचा खास 'भारतीय' सराव ग्रीक फौजांपाशी नव्हता! ग्रीकांनी अल्बानियाची सरहद्द ओलांडली व मुसोलिनीची चौफेर नामुष्की सुरू झाली. इटालियन सैन्य अल्बानियातूनच बाहेर काढावे लागणार, अशी चिन्हे दिसू लागली.

१४ नोव्हेंबर, १९४० ला हिटलरने सेनाधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेतली. या बैठकीत ॲडमिरल रीडर याने हिटलरला स्पष्टपणे सांगितले—

"इटालीचे नेतृत्व भिकार आहे. इजिप्तची लढाईदेखील त्यांना जिंकता येणार नाही. त्यांना रणाचा पुरेसा अंदाजच नाही. यासाठी जर्मनीने तावडतोब आफ्रिकेत सैन्य उतरवून भूमध्य समुद्राच्या लढाईत हस्तक्षेप केला पाहिजे."

परंतु इजिप्त किंवा बाल्कनमध्ये इटालीच्या मदतीला जाणे, हे पर्यायाने रशियावरील चढाईला मारक ठरणार आहे, ही गोष्ट हिटलरला स्वच्छ दिसत होती. रीडरने इटालीच्या सामर्थ्याविषयी जे विधान केले, तेही सत्य होते. हिटलर पेचात पडला होता. ब्रिटनवरील स्वारीचा विचार तर आता पुढे येणेच शक्य नव्हते. रशियावरील हल्ला, की इजिप्त–बाल्कनची लढाई, एवढाच पर्याय त्याच्यापुढे आता होता. पुष्कळवेळा माणसाला निर्णय घेता येत नाही. मग परिस्थितीचा रेटा असा येतो, की परिस्थितीच निर्णय देऊन टाकते.

यावेळी असेच झाले. भारतीय इन्फन्ट्री डिव्हिजन व रॉयल टँक रेजिमेंट यांसह केवळ ३१,००० सैन्यसंख्या असलेल्या जनरल वॅव्हेल यांच्या सैन्याने मार्शल ग्रासियानीला इजिप्तमधून हुसकण्यासाठी चढाईला सुरवात केली. ७ डिसेंबर, १९४० ला सुरू झालेली ही ब्रिटिश चढाई इतकी प्रभावी होऊ लागली, की ग्राझियानीच्या फौजा भराभर शरणागती वा मरणागती पत्करू लागल्या. पहिल्याच आठवड्यात ३८,००० इटालियन सैन्य शरण आले. इटालियन सैन्याने हळूहळू सायरेन्शिया सोडला व लिबियातून सैन्य पळत सुटले.

मुसोलिनीची अल्बानियात व इजिप्तमध्ये अशी फटफजिती उडू देणे, अंतिम युद्ध जिंकण्याच्या दृष्टीने हिटलरला परवडणारे नव्हते. हिटलरने मुसोलिनीला भेटीचे निमंत्रण धाडले. १९–२० जानेवारीला हिटलरभेटीसाठी आता त्याच्या मदतीसाठी लाचार झालेला मुसोलिनी पळत आला. हिटलरने या भेटीत मुसोलिनीला त्याच्या फौजेच्या ग्रीसमध्ये व इजिप्तमध्ये उडालेल्या दाणादाणीबद्दल अक्षरानेही अपमानास्पद प्रश्न विचारून खाली पाहावयास लावले नाही. ही गोष्ट सियानो याने आपल्या दैनंदिनीत मुद्दाम नोंदवली आहे. हिटलर हे जाणून होता, की आपली चूक झाली, हे मुसोलिनीला जाणवलेले आहे. प्रमाद घडलेल्याला अधिक लाजवणे हे सभ्यतेला धरून नाही, म्हणून मुसोलिनीला आल्याआल्याच हिटलरने आश्वासन दिले, की बाल्कन्समधून खाली उतरून आम्ही ग्रीस कबजात घेतो व पाठोपाठ इजिप्तमध्येही ब्रिटिशांचा समाचार घेतो.

२० जानेवारीला हे आश्वासन दिले गेले व ८ फेब्रु. १९४१ ला जर्मन फील्ड मार्शल लीस्ट व बल्गेरियाचे सरकार यांच्यात गुप्त करारही झाला, की जर्मन सैन्याला बल्गेरियाने वाट द्यावी व या बदल्यात ग्रीसच्या किनाऱ्याचा काही भाग बल्गेरियाला मिळावा. खिशाला झोंबणाऱ्या नातवंडाना आजोबानी खारीक द्यावी, तितक्या सहजपणे जर्मनीने बल्गेरियाची ही मागणी मान्य केली.

२८ फेब्रुवारी, १९४१ रोजी रात्री फील्ड मार्शल लिस्टच्या फौजा रुमानियाकडून

बाहेर पडल्या व डॅन्यूब नदी ओलांडून त्यांनी बल्गेरियात महत्त्वाची ठाणी कब-जात घेतली. बल्गेरिया दुसऱ्याच दिवशी जर्मनी, जपान, इटालीच्या संरक्षककराराचा सभासद होऊन मोकळा झाला.

## बाल्कनमध्ये युद्ध आले

जर्मन फौजा बल्गेरियातून युगोस्लाव्हियाच्या सरहद्दीत पोचविण्यापूर्वीच युगोस्लाव्हियाला त्रिपक्ष संरक्षक-कराराचे सभासदत्व स्वीकारा, अशी आदेशवजा विनंती फ्यूररने पाठविली होती. या धमकीचा परिणाम होऊन युगोस्लाव्हियाचा पंतप्रधान सिर्कोव्हिच व परराष्ट्रमंत्री मार्कोव्हिच हे दोघे २५ मार्चला व्हिएन्नात दाखल झाले. तिथे हिटलर व रिबेन्ट्रॉपने त्या दोघांना थोडे फैलावर घेताच युगोस्लाव्हिया त्रिपक्षीय संरक्षक कराराचा सभासद झाला. युगोस्लाव्हियाचे स्वातंत्र्य अबाधित राहील व त्याच्या प्रदेशाला जर्मनी तसा धक्का लावणार नाही, अशी आश्वासने जर्मनीने दिली. परंतु पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री बेलग्रेडला परतताच २६-२७ मार्चला जनरल सिमोविच याच्या पाठिंब्याने लोकांनी उग्र निदर्शने केली. पंतप्रधानांना बडतर्फ करून पीटर या राजपदासाठी मुक्रर झालेल्या कुमाराला राज्यपद देऊन सैन्याने कारभार हाती घेतला. (यापूर्वी पंतप्रधान सिर्कोविच व पीटरचा पाल्य म्हणून प्रिन्स पॉल राज्यकारभाराचे नेतृत्व करीत असत.)

बेलग्रेडला झालेल्या क्रांतिकारक उठावाची बातमी २७ मार्चला बर्लिनला पोचताच हिटलरने गोअरिंग, हाल्डर, ब्राउश व रिबेन्ट्रॉप आदि नेत्यांची तातडीची बैठक बोलावली. बैठकीत निर्णय झाला, की आता युगोस्लाव्हियाला ताळ्यावर आणण्यासाठी लष्करी उपायावाचून गत्यंतर नाही. हिटलरने आदेश सोडला—

"बेलग्रेड बेचिराख करून टाका. हंगेरियन विमानतळावरून शेकडो जर्मन बॉंबर्स बेलग्रेडला जाऊ द्या!"

याचा अर्थ हिटलरने बाल्कनमध्ये युद्ध आणले, असा होता. तेव्हा हाल्डर-जोडल आदि सेनानींनी प्रश्न उपस्थित केला, की बाल्कनमध्ये युद्ध पसरले, तर रशियावरील हल्ला पुढे ढकलावा लागणार. १५ मे, १९४१ च्या सुमारास हा हल्ला सुरू होणार, अशी सर्व तयारी सुरू झालेली होती.

हिटलरने सेनानींना सांगितले—

"ऑपरेशन-बार्बारोसा या बाल्कन कटकटींमुळे चार आठवडे पुढे ढकलावा लागेल—"

युगोस्लाव्हियाच्या क्रांतीने चिडून हिटलर आता इरेला पेटला होता व त्याने रशियावरील हल्ला चार आठवडे लांबवण्याचा हा घातक निर्णय घेतला. या निर्णयाने हिटलरने आपल्या लष्करी कारकीर्दीतील सर्वात मोठी चूक करून तिसऱ्या राईशचा सत्यानाश

ओढवून घेतला. कारण जर्मन सेनादलप्रमुख ब्राउश व जनरल हाल्डर यांना हे स्पष्ट दिसत होते, की एक महिना उशीर झाला, तर हिवाळा सुरू होण्यापूर्वी व थंडीने गारठून हतबल होण्यापूर्वी मॉस्को गाठणे आता कठीण आहे! आणि ३-४ आठवड्यांच्या या उशिरामुळेच जर्मन सैन्याचा रशियात खातमा करणे रशियन सेनेला शक्य झाले! जी चूक नेपोलियनने केली, तीच चूक अखेर हिटलरने नकळत केली.

युगोस्लाव्हियाविरुद्ध आता सुरू होणारी जर्मन चढाई तितकीशी सोपी नव्हती. कारण अल्बानियाची ⅓ सरहद्द ग्रीसला व ⅓ सरहद्द युगोस्लाव्हियाला भिडलेली होती. अल्बानियात इटालियन फौजा ग्रीकांकडून मार खात होत्या. अशा परिस्थितीत जर्मनीचा हल्ला युगोस्लाव्हियावर होताच युगोस्लाव्हियाचे सैन्य जसे जर्मनीशी लढणार, तसेच ते खाली दक्षिणेकडे अल्बानियात घुसले, तर हिटलर पोचण्यापूर्वी अल्बानियातील इटालियन सैन्याची रेवडी उडाल्याशिवाय राहणार नव्हती! यामुळे युगोस्लाव्हियावरील हल्ल्याची ही संभाव्य प्रतिक्रिया ड्यूसला कळवणे भाग होते.

## हिटलरचे तारपत्र

२७ मार्चला रात्री हिटलरने मुसोलिनीला एकीकडे पत्र रवाना केले व त्याच रात्री जोडल् हा युगोस्लाव्हियावरील हल्ल्याच्या योजनेवर काम करीत होता. पहाटे चार वाजता युगोस्लाव्हियावरील हल्ल्याचा आराखडा हिटलरपुढे आला व त्याच वेळी हिटलरचे तार-पत्र रोममध्ये मुसोलिनी वाचीत होता-

"प्रिय ड्यूस,

सुरवातीपासून युगोस्लाव्हिया हा एक धोकादायक भाग आहे व ग्रीस-प्रकरणात तो विचारात घ्यावा लागेल, हे मी जाणून होतो. म्हणून मी युगोस्लाव्हियाला आपल्या गटात खेचण्याचा सर्व प्रामाणिक प्रयत्न केला. दुर्दैवाने माझ्या या प्रयत्नांना यश आलेले नाही. आज ज्या बातम्या हाती आल्या, त्यावरून युगोस्लाव्हियाचे परराष्ट्रधोरण आता बदलणार आहे, हे स्पष्ट होते. या दृष्टीने मी उपाययोजना सुरू करण्यास सांगितले आहे. ही उपाययोजना अर्थातच लष्करी स्वरूपाची आहे.

माझी तुला एवढीच विनंती आहे, की पुढच्या काही दिवसांत अल्बानियात तुमच्याकडून विशेष हालचाल होऊ देऊ नये. युगोस्लाव्हिया व अल्बानिया सरहद्दीवरील ज्या महत्त्वाच्या खिंडी आहेत, त्यांचे संरक्षण करण्यासाठी, आहे त्या इटालियन सैन्यानिशी होईल तेवढे करावे.

माझी अशीही विनंती आहे, की इटाली-युगोस्लाव्ह सरहद्दीवरील इटालियन सैन्य तावडतोब वाढवण्यात यावे.

आपल्याला हे सर्व अत्यंत गुप्तपणे करावे लागेल. कारण जी उपाययोजना मी करीत आहे, त्याला वाचा फुटली, तर सारेच ऑफस् होईल. ड्यूस, जर आपण उपाययोजनेचा मागमूस कुणाला लागू दिला नाही, तर वर्षभरापूर्वी नॉर्वेत मिळालेल्या विजयापेक्षा मोठा विजय आपण मिळवणार आहोत, यात मला मुळीच शंका दिसत नाही.

शुभेच्छांचा स्वीकार करावा.

आपला

ॲडॉल्फ हिटलर"

फार मोठा विजय पदरात पडणार आहे, हा हिटलरचा अंदाज अगदी बरोबर ठरणार होता.

## बेलग्रेडवर बाँबवर्षाव

६ एप्रिल, १९४१ रोजी बल्गेरिया, हंगेरी व जर्मन यांच्या सरहद्दीवरून जर्मन सैन्ये युगोस्लाव्हिया व ग्रीसवर कोसळली.

६ ते ९ एप्रिल या तीन दिवसांत बेलग्रेडवर तुफानी बाँबवर्षाव करण्यात आला. घराच्या छपरापर्यंत खाली येऊन जर्मन विमानांनी शहर उद्ध्वस्त केले. कारण... सबंध बेलग्रेड शहरात एकही विमानविरोधी तोफ नव्हती ! १७ हजार माणसे या तीन दिवसांत मृत्युमुखी पडली. याहून कितीतरी अधिक जखमी झाली व सगळे बेलग्रेड शहर फक्त एक अतिप्रचंड धुमसता ढिगारा होऊन बसले.


१३ एप्रिल, १९४१ ला जर्मन व हंगेरियन फौजा बेलग्रेडच्या अशा स्मशानभूमीत शिरल्या. १७ एप्रिल, १९४१ ला सैनिकांनी शस्त्रे खाली ठेवली व शरणागती पत्करली. राजे पीटर विमानाने देशाबाहेर निसटले.

ग्रीसमध्ये ५३ हजार दोस्त फौजा उतरवलेल्या होत्या.

या दोस्त सैन्याच्या मदतीने ग्रीकांनी सहा महिन्यांत इटालियन फौजांना सरहद्दीबाहेर पिटाळण्यात यश मिळवले होते; परंतु आता फील्ड मार्शल लीस्टच्या पंधरा डिव्हिजन सैन्याच्या पॅन्झरमुखाच्या लोंढ्यापुढे व लुफ्तवाफ्‌च्या भयानक बॉम्बवर्षावापुढे ग्रीकांनी शरणागती पत्करली. २३ एप्रिलला ग्रीक सैन्याने शस्त्रे खाली ठेवली. २७ एप्रिल, १९४१ ला नाझी टँकदले रोरावत अथेन्समध्ये शिरून त्यांनी ॲक्रोपोलिसवर स्वस्तिक निशाण फडकावले.

ग्रीसमध्ये उतरलेल्या ५३,००० दोस्त सैन्यांवर तर कुऱ्हाडच पडली. दुसरे डंकर्क सुरू झाले. शस्त्रे तशीच टाकून यांपैकी जवळजवळ सर्व दोस्त सैन्य क्रीट बेटावर किंवा इजिप्तमध्ये परतले.

भूमध्य समुद्रात एका क्रीट बेटाखेरीज आता दोस्तांना पाऊल ठेवावयास जागा राहिली नाही.




मुसोलिनीच्या ज्या रणक्षेत्रावर महिनो न् महिने ससेहोलपट उडत होती, तेथली लढाई हिटलरच्या सैन्याने मोजून १५ दिवसांत उरकली. जर्मनीच्या या ताज्या प्रचंड विजयाने हिटलरचे धडाडीचा सेनानी म्हणूनही डिंडीम घुमले व मुसोलिनीची लाचारीही शतपटीने वाढली !

## थोर सेनापती रोमेल

बाल्कनची लढाई जिंकण्यापूर्वी हिटलरने इजिप्तमधील युद्धातही बाजी मारली होती. या रणांगणावरील हा चमत्कार घडवला होता जनरल अर्विन रोमेल याने ! फ्रान्सच्या युद्धात गुडेरिनच्या फौजांत पॅन्झर तुकडीचे नेतृत्व करून, याने प्रथम ब्रिटिशांना धूळ चारली होती. त्याचे त्या वेळचे कर्तृत्व ध्यानी घेऊन हिटलरने इटालियन सैन्याची लिबियातील ससेहोलपट थांबवण्यासाठी रोमेलची रवानगी केली. सर्व

इटालियन व जर्मन सैन्याचे नियंत्रण आता रोमेलकडे सोपवण्यात आले होते. मार्च महिन्यात सैन्याचे नेतृत्व हाती घेतल्याबरोबर ३१ मार्च, १९४१ ला रोमेलने लिबिया-वर हल्ला चढवला. १२ दिवसांत त्याने तो प्रांत कबजात घेऊन टोब्रूकला वेढा दिला. दुसऱ्या अंगाला रोमेलने धडक देऊन बार्डिया गाठले व इजिप्तमध्ये घुसण्याचा पवित्रा घेऊन तो उभा राहिला. सुवेझ कालवा आता जर्मन सेनेच्या टप्प्यात आला होता.

रोमेलच्या या धडाक्यात वॅव्हेलची सेना सर्व शस्त्रसंभार सोडून वाळवंटातून सतत पळत होती. "टँकस्‌ची कुमक आल्याखेरीज रोमेलला रोखता येणार नाही. जर्मन टँकदले ब्रिटिशांना मागे रेटीत आहेत, तरी टँकस् पाठवा," असा आर्त धावा वॅव्हेलसाहेब करीत होते. भूमध्य समुद्रात बोटीने टँकस् पाठवणे धोक्याचे होते. तेव्हा 'केप ऑफ गुड होप्' ला वळसा घालून टँकस् घेऊन ब्रिटिश बोटी इजिप्त-कडे येत होत्या, परंतु त्या पोचेपर्यंत माघार–माघार याशिवाय वॅव्हेलना दुसरे गत्यंतर नव्हते. ब्रिटिशांनी जिंकलेला सर्व मुलूख रोमेलने तोपर्यंत मोकळा केला व टोब्रूकला तो विळखा घालूनही बसला.

रोमेलच्या या कर्तबगारीचा गौरव पंतप्रधान चर्चिल यांनीच मोकळ्या मनाने केला आहे. चर्चिल लिहितात–

" His ardour and daring inflicated grevious disasters upon us, but he deserves the salute......which I made him in the House of Commons in Jan. 1942 when I said of him– " We have a very skilful opponent against us & may I say across the havoc of war – a great general ! "

[ रोमेलच्या कर्तृत्वशक्तीमुळे व धाडसामुळे आपल्यावर क्लेशकारक संकटे कोस-ळली असली, तरी मी त्याला पुढे जानेवारी, १९४२ मध्ये कॉमन्स सभागृहात बोलताना जे अभिवादन केले, त्याला तो पात्रच आहे. मी त्यावेळी असे सांगितले, " आपली ज्या शत्रूशी गाठ पडली आहे, तो अत्यंत चतुर आहे आणि युद्ध–उध्वस्तता ध्यानी घेऊनही मी सांगतो, की तो एक थोर सेनापती आहे ! " ]

### चर्चिल यांची मनधरणी

चर्चिल यावेळी चांगलेच हादरलेले होते. इजिप्त हातातून गेला, की भूमध्य समुद्रा-तून ब्रिटिशांचे अस्तित्व संपल्यासारखेच होते. मध्यपूर्वेतील या शरणागतीचे चित्र अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांच्यापुढे मांडताना, ४ मे, १९४१ रोजी चर्चिल यांनी लिहिले आहे—

" मध्यपूर्वेतील होऊ पाहणाऱ्या आमच्या संपूर्ण पराजयामुळे जे परिणाम घड-तील, त्यांचे गांभीर्य, अध्यक्ष महाराज आपण कमी लेखू नका, अशी माझी तुम्हाला प्रार्थना आहे— "



रोमेलची गरुडझेप

४ मे, १९४१ चर्चिल यांचा असा निराशाजनक नूर असताना त्याच दिवशी राईशस्टॅगपुढील भाषणात हिटलर गर्जत होता—चर्चिलवर आग ओकीत होता—" रक्तपाताची लालसा असणारा चर्चिल हा इतिहासातील अत्यंत बालिश मुत्सद्दी आहे. गेली पाच वर्षे हा माणूस युरोपभोवती एखाद्या पिसाटासारखा घिरट्या मारतो आहे. शोधतो आहे कुठे काडी लावता येते ! या नादापायी त्याला आपल्या एकाच दणक्याने युगोस्लाव्हिया व ग्रीस या दोन्ही ठिकाणच्या लढाया सोडून द्याव्या लागलेल्या आहेत. दुसऱ्या एखाद्या देशात अशा पुढाऱ्याचे ' कोर्ट मार्शल ' झाले असते ... ! "

एक चर्चिल नसता, तर दुसरे महायुद्ध यावेळी संपल्यासारखेच होते, याचा हा पुरावा आहे ! !

अमेरिकेच्या अध्यक्षांना पत्रावर पत्रे लिहून, हिटलर जगावर आणीत असलेल्या संकटाची जाणीव त्यांना सतत करून देण्यापलीकडे चर्चिल यांच्या हाती यावेळी

काही उरलेले नव्हते. जागतिक संकटाच्या या कालात चर्चिल यांना फक्त अमेरिकेचा आधार वाटत होता.

अमेरिकेतील जनमत यावेळी या युद्धात अमेरिकेने पडावे, असे मुळीच नव्हते. २३ एप्रिलला न्यूयॉर्क येथे ३० हजारांच्या सभेत भाषण करताना, अटलांटिक महासागर विमानाने ओलांडणारा पहिला अमेरिकन वैमानिक चार्लस् लिंडबर्ग जनतेला सांगत होता—

" ब्रिटिश सरकारजवळ आता अखेरचा उपाय एकच उरलेला दिसतो ! अमेरिकेला युरोपात सैन्य धाडायला सांगून या युद्धात ब्रिटनचा जो बोजवारा उडत आहे, त्यात अमेरिकेलाही सहभागी करणे !! याच इंग्लंडने युरोपातील लहान–सहान राष्ट्रांना चिथावून त्यांचा कपाळ मोक्ष घडवला आहे..."

अमेरिकेने युद्धात पडू नये, यासाठी कर्नल लिंडबर्ग यांनी अमेरिकन हवाईदलातील आपल्या कर्नलपदाचा राजीनामा २८ एप्रिल रोजी अध्यक्ष रुझवेल्ट यांना पाठवला होता. जागतिक ख्याती पावलेली कर्नल लिंडबर्गसारखी माणसे अमेरिकेने या युद्धात ब्रिटनच्या नादी लागून लढाई अंगावर घेऊ नये, या मताची होती.

एप्रिलच्या अखेरीस अशारीतीने सर्व बाजूंनी ब्रिटन पेचात आलेले होते. सुवेझ कालवा धोक्यात आलेला होता. सतत बॉम्बहल्ल्यांमुळे इंग्लंडची संरक्षणव्यवस्था बरीच पांगळी झालेली होती. अमेरिकेतील लोकमत अजून बहुतांशी अमेरिकेने युद्धात पडू नये, असेच होते. ग्रीसमधून मोठा पराभव खाऊन परतल्यामुळे ब्रिटिश सैन्याचा धीर खचल्यासारखा झालेला होता. रोमेलसारखा अद्वितीय सेनानी लाभल्यामुळे भूमध्य समुद्रातून वाहणारी ब्रिटिशांची अन्नधान्य–नाडीच बंद होण्याची पाळी आलेली होती.

इराकमध्ये रशिदअल्लीने बगदादजवळ बंडाचा झेंडा उभारून ब्रिटिशांना इराकमधून हुसकण्याचा डाव याचवेळी टाकला होता.

उत्तर आफ्रिकेच्या वाळवंटातून जनरल रोमेल " अधिक कुमक व रसद पाठवा, सुवेझ कालवा घेतो," असा तगादा लावीत होता.

परंतु भूमध्य समुद्रात ब्रिटिशांच्या ताब्यात अजून क्रीट बेट होते. २२,००० ब्रिटिश फौज या बेटावर होती. आरमारी ताकदीने हे बेट घेणे जर्मनांना शक्यच नव्हते, म्हणून ही कामगिरी छत्रीधारी सैनिकांवर सोपवण्यात आली होती.

## क्रीटचा कबजा

२० मे, १९४१ ला पहाटे जर्मन विमानांनी क्रीटचे विमानतळावर बॉम्बवर्षाव सुरू केला...व पाठोपाठ हजारोंच्या संख्येने जर्मन छत्रीधारी सैनिक क्रीटमध्ये उतरू लागले. यापूर्वी एबेन एमेलचा किल्ला घेताना किंवा नॉर्वेत काही महत्त्वाच्या ठिकाणी काही शेकडो छत्रीधारी सैनिक वापरण्यात आले होते; परंतु क्रीटमधील युद्धात

गोअरिंगने सर्वच्या सर्व जर्मन सैन्य छत्रीधारीच रवाना केले होते. अशा युद्धात असंख्य जर्मन सैनिक मारले जाणे अटळ होते व न्यूझीलंड फलटणींनी जमिनीवर पाय लावणाऱ्या अनेक जर्मन सैनिकांना यमसदनाला पाठवलेही. या रणकंदनातही अखेर महत्त्वाची ठाणी व विमानतळ जर्मन सैनिकांनी व्यापले. सुमारे १०,००० सैनिक पहिल्या दिवशी क्रीटमध्ये उतरले व त्यांनी विमानविरोधी तोफाच बंद पाडल्या. क्रॅश लँडिंग होऊन शेकडो जर्मन विमाने निकामी झाली, पण यावेळी जर्मनांनी नुकसानीची वा मनुष्यहानीची पर्वा न करता क्रीट जिंकायचेच ठरवले होते. या युद्धात भाग घेणारे हे सर्व जर्मन सैनिक म्हणजे विशीची पोरे होती. जर्मनीचा सर्व मोहोर जणू या युद्धात गोअरिंगने पणाला लावला होता. चर्चिलनीच या सैनिकांचे गुणगान केलेले आढळते.

" The battle began on the morning of May 20 and never was a more reckless, ruthless attack launched by Germans. It was unique. Nothing like it had been seen before. The German Air Force represented the flame of the Hitler youth movement. The flower of German manhood was expressed in these valient, highly trained & completely devoted Nazi parachute troops..."

[ लढाई २० मे या दिवशी सकाळीच सुरू झाली. जर्मनांनी एवढा निर्दय व जीवावर उदार होऊन हल्ला आतापर्यंत केलेला नव्हता. हा खरोखरच अद्वितीय हल्ला होता. यासारखे काही पूर्वी कधीच कुणी पाहिलेले नव्हते. हिटलर यूथ चळवळींची प्रखर ज्योत, असेच जर्मन हवाई सेनेचे वर्णन करावयास हवे. जर्मन युवकांचे सारे पौरुष या निधडचा छातीच्या, उच्च प्रशिक्षित व अत्यंत श्रद्धाशील अशा या छत्रीधारी युवकांच्या रूपाने आकारास आलेले होते. ]

सहा दिवस हातघाईचे रणकंदन झाले. क्रीटच्या चारी अंगाला ब्रिटिशांचे आरमारी वर्चस्व असूनही, २६ मे ला अखेर ब्रिटिश सैन्याने ' क्रीट ' सोडण्याचा निर्णय घेतला. तिसरे डंकर्क सुरू झाले, परंतु क्रीटचा आकार लहान असल्याने हेरवर्ड, डीडो, ओरिअन, डेकॉय ही ब्रिटिश जहाजे जर्मनांनी बुडवली.

क्रीटच्या लढाईत प्राणहानी विलक्षण झाली. सहा दिवसांत ५,००० जर्मन युवक मारले गेले; परंतु ५,००० वळी देऊन गोअरिंगने क्रीटचा कबजा तरी केला. क्रीट अखेर गमावून ब्रिटिशांचे १३,००० सैनिक मारले गेले वा जखमी झाले. जवळजवळ २००० सैनिक जहाजावरील हल्ल्यांत बुडाले वा मृत्यू पावले. ५,००० ब्रिटिश सैनिकांनी शरणागती पत्करली.

क्रीटची लढाई गमावल्यामुळे तर भूमध्य समुद्रातील ब्रिटिशांचा एकुलता एक आधारही संपला.

## सुवेझ की मॉस्को

क्रीटमधील हानीची मोजदाद पुरी होण्यापूर्वी म्हणजे ३० मेला ॲडमिरल रीडर याने फ्यूररला सुचवले, की इजिप्तमधून सुवेझ हस्तगत करण्याची योजना तातडीने हाती घ्यावी व रोमेलला सैन्याचा व रसदींचा मोठा पुरवठा केल्यास हे काम रोमेल तातडीने उरकून टाकील. रीडर याने तर पुढे जाऊन असेही सांगितले –

" This stroke will be more deadly to the British Empire than the capture of London..."

[ लंडन जिंकून जे होणार नाही, ते या एका फटकाऱ्याने होईल. ब्रिटिश साम्राज्याला हा घाव मोठीच ठोकर ठरणार आहे. ]

रीडरचा सल्ला मोलाचा होता. सुवेझ कालवा जर्मनांच्या हाती पडता, तर ब्रिटन ही लढाई कशी चालू ठेवणार, असा प्रश्न चर्चिल यांनी रुझवेल्ट यांना ४ मेच्या पत्रातच विचारला होता. ब्रिटिश साम्राज्यावर प्राणांतिक आघात करण्याची ही संधी हिटलरने कशी काय दवडली हे कळत नाही. याचे कारण एकच संभवते ! बाल्कनच्या युद्धाने चार आठवडे रशियावरील हल्ला पुढे ढकलून त्याने मोठाच धोका पत्करलेला होता. आता निदान जूनमध्ये रशियावर आघात केला, तर रशियाची मान पुरती आवळण्यासाठी फक्त सहा महिन्यांचा अवधी मिळणार होता. एकदा डिसेंबर उजाडला, बर्फ पडू लागले व तोपर्यंत रशिया शरण आला नाही, तर जे नेपोलियनच्या सैन्याचे झाले, ते आपल्याही सेनेचे रशियात होईल, हे त्याला कळत होते. हिटलरच्या हिशोबाने रशियाला शरण आणायला सहा महिने पुरेसे होते. समजा, इजिप्तमधून रोमेलने मुसंडी मारली व लढाई रेंगाळली, तर रशियावरील हल्ला मे, १९४२ पर्यंत पुढे ढकलावा लागेल. या विचाराने अखेर हिटलने चुकीचा निर्णय घेतला, की इजिप्तवरील हल्ला व सुवेझचा कबजा करण्यापेक्षा रशियावरील हल्ला प्रथम पुरा केला पाहिजे ! रोमेलला अधिक कुमक व टँक्स पाठवण्यास हिटलरने नकार दिला. जून उजाडला होता. युगोस्लाव्हिया–ग्रीसमधून पुढे गेलेले जर्मन सैन्य उद्‌ध्वस्त प्रदेशातून रशियन सरहद्दीपर्यंत परतायला अजून १५–२० दिवस हवे होते. तेवढा आणि फक्त तेवढाच वेळ देऊन हिटलरने ' ऑपरेशन बार्बारोसा 'ची म्हणजे रशियावरील हल्ल्याची तारीख मुक्रर केली–२२ जून, १९४१ !

रशियावरील हल्ला सुरू होईल, तेव्हा काय होईल, हे हिटलरनेच पूर्वी एकदा आपल्या सेनानींना सांगितले होते––

" When operation Barbarossa commences, the world will hold it's breath make no comment !"

[ जेव्हा and रशियावरील हल्ला सुरू होईल, तेव्हा सारे जग श्वास रोखून बसेल व कोणाच्या तोंडातून शब्दही फुटणार नाही– ]



‘ सारे जग
श्वास रोखून बसेल !! ’
—हिटलर

जर्मन सैन्ये रशियावर मोर्चेबंदी करू लागली. टँकदले मोक्याच्या ठिकाणी सरकू लागली. बॉम्बचे प्रचंड साठे विमानतळावर एकत्र होऊ लागले. नॉक, लीस्ट, गुडेरिन्, ब्राऊश—स्वप्न पाहू लागले, की १९४१ चा नाताळ मॉस्कोत साजरा होणार ! !

● ● ●

[ अपूर्ण ]

# ' बंद दरवाझे '

## भारतीय रंगभूमीवरील आगळे धाडस !

' खुर्च्या ' सारखी नवनाटके पाहून पाश्चात्त्य रंगभूमीवरील नवीन प्रयोगांची ताकद ध्यानात येते. परंतू नवीन प्रयोग मराठी रंगभूमीवर समजतील अशा प्रकारे सादर केले जात नाहीत. हिंदी रंगभूमीवर मात्र ' बंद दरवाझे ' या नाटकाचे चांगले स्वागत होत आहे. मराठी प्रेक्षकही या नाटकाला गर्दी करतात असे दिसून आले आहे.

' बंद दरवाझे' हे १९६४ चा नोबेल पारितोषिक विजेता फ्रेंच लेखक जीन पॉल सार्त्र याच्या No Exit या नाटकाचे हिंदी भाषांतर. हे भाषांतरही मूळ नाटकाच्या In Camera या इंग्रजी भाषांतरावरून केलेले आहे.

स्वत: सार्त्रने १९४३ साली 'Being and Nothingness' या आपल्या पुस्तकात प्रकट केलेल्या विचारांचेच प्रतिबिंब No Exit मध्ये पडलेले दिसते. सर्व मानवी व्यवहार संघर्षावर आधारलेले आहेत. आपण जसे आहोत, असे स्वत:स वाटते, तसेच इतरांच्या दृष्टीनेही असल्याची पावती दुसऱ्या कोणीतरी द्यावी यासाठी प्रत्येक माणसाची धडपड ! ही धडपड अयशस्वी होते, कारण दुसरा मनुष्यही त्याच धडपडीत असतो. दुसऱ्याच्या दृष्टीने जग पाहणे कुणालाच मान्य नसते. कारण तसे करणे म्हणजे स्वत:शी प्रतारणा करणे आहे, याची जाणीव प्रत्येकाच्या मनात खोलवर दडलेली असते. इतके असूनही योगायोगाने दोन माणसे एकमेकांना समजून घेऊ शकलीच, तर त्या दोघांमधील हा दुवा नष्ट करणारा तिसरा कुणीतरी तिथे हटकून हजर होतो. मग हे दोघेही त्याला आपल्यात सामील करून घेऊ पाहतात. अशा अनेक व्यक्तींची आपसातील रस्सीखेच–हिचेच नाव जीवन ! व्यवहारात पदोपदी हेच घडत असताही याची जाणीव प्रत्येक क्षणी टोचतेच असे नाही; कारण यातून सुटण्याच्या काही पळवाटा माणूस शोधीत राहतो; पण एकदा जीवनच संपले, की या वाटाही संपतात–मग आपण कोण होतो, या प्रश्नाचे उत्तर मागे राहिलेली जिवंत माणसेच देऊ शकतात.

### छळदायी रस्सीखेच

No Exit मध्ये हेच घडते. गार्सन्, इनेज् आणि इस्टेल् ही तीनही पात्रे मरण पावलेली आहेत. तिघेही येतात नरकामध्ये ! हा नरक म्हणजे एक खोली आहे–



**तिघांनी एकत्रच राहायला हवे**

मध्ययुगीन फर्निचरने सजवलेली. खोलीत दोन बाजूला दोन डबलसीट सोफा आहेत. पैकी एकासमोर एकच व्यक्ती बसेल, असा कोच आहे. एका कोपऱ्यात छोट्या टेबलावर एक मूर्ती आहे. त्याच टेबलावर एक कागद कापण्याची सुरी आहे. दुसऱ्या कोपऱ्यात एक टेबलँप जळतो आहे. ती मूर्ती—ती सुरी—तो जळणारा दिवा या सर्वांचे प्रयोजन कुणी केले, हे तिघांनाही नीटसे समजत नाही. तरीही त्यामागे काहीतरी प्रयोजन आहे, याबद्दल प्रत्येकाची खात्री आहे. या सर्वांना एकापाठोपाठ आत घेऊन येणारा एक यमदूत आहे—डोळ्यांच्या पापण्या न हलणारा—मेलेला ! या यमपुरीला अंत नाही. तो नोकर सुटीमध्येही जातो कुठे, तर दुसऱ्या मजल्यावरील काकांच्या खोलीत. अशाच खोल्या सर्व इमारतीत आहेत. या व्यतिरिक्त त्यालाही बाहेरील काही माहिती नाही. त्याला बोलावण्यासाठी दरवाजावर असलेली विजेची घंटा लहरी आहे—कधी वाजते, तर कधी वाजत नाही. विजेचा प्रवाह सारखा चालूच, म्हणजे दिवाही सतत जळतच राहणार—तो बंद करण्याचा स्विचही नाही. कधी बंद केलेलाही त्याला आठवत नाही. एकदा व्यक्ती आत आली, की दरवाजा बंद करून यमदूत बाहेर जातो. मग नरक म्हणजे जणू Self service पद्धत अमलात असलेल्या लॉजची एखादी खोली. उकळत्या कढया नाहीत, तापलेल्या सळया नाहीत—काही नाही ! कारण या खोलीत येणाऱ्या तीन व्यक्तींची आपापसातील रस्सीखेच त्यापेक्षाही अधिक तापदायक आहे—छळदायी आहे.

## गार्सन, इनेज्, इस्टेल्

या खोलीत सर्वप्रथम प्रवेश करतो गार्सन् ! जिवंतपणी हा एक पत्रकार असतो. लढाई सुरू झाल्यावर देशाच्या बाजूने लढण्याऐवजी याला शांतिदूत व्हावेसे वाटते! लढाई सोडून देशाबाहेर जाताना याला सीमेपाशी पकडण्यात येऊन गोळ्या घालण्यात आलेल्या असतात. शांतिदूत होण्यास अमाप धैर्य लागते; ते आपल्यापाशी होते, अशी याची खात्री ! मग गोळ्या झेलताना आपण रडलो—भेकलो का, हा विचार अस्वस्थ करतो. आपण शूरच होतो, याची पावती कुणीतरी द्यावी यासाठी याची धडपड.

खोलीत प्रवेश केल्यावर साऱ्या वस्तू पाहतो-चौकशा करतो. ती मूर्ती—तो दिवा—ती सुरी या साऱ्या वस्तू अशा का ठेवल्या आहेत, त्याला कळत नाही. टूथब्रशही वापरण्यास मिळणार नाही, हे कळल्यावर चिडतो. मग या साऱ्यास धैर्याने तोंड देण्याचा निश्चय जाहीर करतो. यमदूत आश्चर्य करीत निघून जातो. (ही माणसे वेटी मेल्यावरही टूथब्रश वगैरे विसरत नाहीत ! )

थोड्या वेळाने प्रवेश करते इनेज्. समलिंगी आकर्षण असलेली अशी ही स्त्री आहे. (Lesbian) आत आल्यावर पुरुष पाहताच दचकते. इथेही पुरुषाबरोबरच राहायचे—भयंकर कल्पना ! एका नजरेत गार्सनचे पाणी जोखते—भेकड ! गार्सन ओळख करून देण्याचा प्रयत्न करतो—ती दाद देत नाही; पण कसे का होईना, संभाषण सुरू होते. नरकयातना केव्हा सुरू होतात, याचीच वाट पाहात आता बसायचे !

मग प्रवेश करते इस्टेल्. स्वतःच्या शरीराखेरीज हिला दुसरे अस्तित्व नाही. त्या शरीराची पूजा करण्यासाठी कुणीतरी पुरुष हवा—मग तो कसा का असेना—निदान स्वतःचे रूप पाहता येण्यासाठी आरसा तरी हवाच. खोलीत येते तीच किंचाळत, फर्निचरला नाके मुरडीत. प्रत्येकाला एकएक सोफा वाटयाला येतो. इनेज् हिला आपल्या सोफ्यावर बसवू पाहते—त्यापेक्षा गार्सनचा सोफा चांगला !

तिघांनी असे एकत्र का राहायचे, कुणाला कळत नाही. गार्सन् तर दोघांच्या बडबडीने वैतागतो. सर्वांनी गप्प बसायचे ठरते. सारे स्तब्ध बसतात. मग इस्टेल्ला पुन्हा आरशाची आठवण होते. पर्समधील आरसा काढून घेण्यात आलेला असतो. न राहवून गार्सनशी कुजबुजू लागते. त्याच्याकडेही आरसा नसतो. आता इनेज्चे डोळे हाच तिचा आरसा. इनेज् खुलते. इस्टेल्ला जवळ घेऊन कुरवाळू पाहते. इस्टेल्ही बडबडत राहाते. मध्येच वाजूला होते. मग एकमेकांना मृत्यू कसा आला, याची चौकशी होते. अखेर चर्चा सुरू होते—नरकात का यावे लागले असावे यावर.

गार्सन्ला एकच कारण सुचते. जिवंतपणी पत्नीची केलेली प्रतारणा—विवाहबाह्य संबंध—इतके करूनही पत्नी बिचारी प्रेमच करीत राहाते—मुकेपणाने. या सर्व बाहेरख्यालीचे समर्थन ज्याच्या जोरावर करायचे, तो पुरुषार्थ मात्र कुणी मान्य करीत नाही—त्याचे साथीदारसुद्धा त्याला पळपुटा—भेकड ठरवतात.

इनेज्‌ला नरकात येणे स्वाभाविकच वाटते. ज्या कोवळया मुलीला (फ्लॉरेन्स्) तिने नादी लावले, तिचा नवरा अपघातात मरतो. एक दिवस चिडून ती मुलगी इनेज्सह मृत्यू पत्करते. मग अशा माणसे खाणाऱ्या बाईला (इनेज्‌ला) नरकच मिळणार.

इस्टेल्‌ला फक्त न्युमोनिया झालेला असतो. बाकटया भावाकरता एका म्हाताऱ्याशी लग्न केले. काय गैर केले ? पुढे आयुष्यात एक तरणा पोरगा आला. त्याच्यापासून दिवस गेले. ते मूलही मारावे लागले (दुसरे काय करणार ?). याचा धसका खाऊन म्हाताऱ्याने गोळी झाडून घेतली– विचारा ! मग तिला न्युमोनिया झाला; पण नरकात का यावे लागले, कळतच नाही तिला.

गार्सनचे पौरुपत्व इस्टेलला जागे करू पाहते. तसा त्याला कुणातच रस नसतो, पण तिने त्याच्या धैर्याची हमी दिली तर ? तो इस्टेल्‌ला सारे पटवू पाहतो. इस्टेल् विश्वास ठेवू पाहाते – त्याला शूर म्हणते, – पण पुरुष-स्त्रीचे हे एकत्र येणे इनेज्‌ला पाहावत नाही. ती इस्टेल्‌चा खोटेपणा उघड करते. इस्टेल् हताश होते. धीट काय– भेकड काय– पुरुष असल्याशी कारण. मग थोडा वेळ गार्सन्‌ला शूर म्हटलं तर काय झालं !

गार्सन् संतापतो. म्हणजे इस्टेल्‌लाही मनापासून गार्सन् शूर वाटत नव्हता. संतापाने दरवाजा ठोठावतो– बाहेर जाण्यासाठी. अचानक दरवाजा उघडतो, पण त्या ऐनक्षणी गार्सन्‌ला वाटतं– इनेज्‌ला निदान भेकड– शूर फरक तरी कळतो आहे. थोडावेळ थांबलं तर तिची केव्हातरी खात्री पटेल, तो शूर असल्याबद्दल ! मागे फिरतो. दरवाजा पुन्हा बंद होतो.

## तिघेही असहाय

इनेज् गार्सन्‌ला दाद देत नाही. त्याचे बोलणे झिडकारते. तिला हवी असते इस्टेल् ! इस्टेल्‌ला हवा असतो गार्सन् ! ठीक आहे–इनेज्‌ला वठणीवर आणण्यासाठी इस्टेल्‌बरोबर प्रेमाचे नाटक केले पाहिजे. इस्टेल्‌ला उचलून कोचावर ठेवतो. इस्टेल् आनंदाने वेडी व्हायचीच तेवढी राहते. त्याला आलिंगन देते, तिचे ओठ त्याने चुंबन घ्यावे म्हणून विनवण्या करू लागतात; पण इनेज् संतापाने बेभान होते. कोचाजवळ उभी राहून तिचे वाक्ताडन सुरू राहाते. " भेकड गार्सन् भ्रूणहत्या करणाऱ्या इस्टेल्‌शी प्रणय खेळणार, पण माझी नजर आहे दोघांवर– जातात कुठे– सारेजण तुम्हांला पाहताहेत – वारे मर्द, इस्टेल्‌ने बोलावताच कुत्र्यासारखा धावत गेला. भेकड कुठला, भेकड ! "

गार्सन्‌ला हे असह्य होते. प्रणय असा तिसऱ्या व्यक्तीसमोर करता येत नाही. इस्टेल्‌ला दूर ढकलतो.

आता सारेच निराश झालेले असतात. तिघेही एकमेकांवर नाराज; तरीही तिघांनी एकत्रच राहायला हवं– तिघेही भेसूरपणे हसतात– पडदा पडतो.

## सुलभा देशपांडे यांचे धाडस

हे सारं नाट्य उत्कटपणे उभे करण्यात Theatre Unit चे कलावंत बहुतांशी यशस्वी झाले आहेत. यमदूत (अमरेश पुरी), गार्सन् (सत्यदेव दुबे), इनेज् (सौ. सुलभा देशपांडे) आणि इस्टेल् (कु. अलकनंदा समर्थ) या सर्वांचा अभिनय पाहायलाच हवा ! सर्वांवर मात करतात अलकनंदा. त्यांची भूमिका प्रेक्षकांना बुचकळ्यात टाकीत नाही, हा त्यांचा फायदा, पण इस्टेल्ची व्यक्तिरेखा त्या यथार्थपणे उभी करतात. स्वत:मध्येच गुरफटलेल्या स्त्रीचं बोलणं–चालणं–हसणं–रागावणं–इनेज्बद्दल वाटणारी गूढ भीती, बराच कांगावा–मध्येच तरुण मित्राच्या आठवणीने येणारी व्याकुळता–गार्सनशी बोलताना येणारे याचनेचे भाव, हे सारंच त्या अप्रतीमपणे वठवतात. दुसरा क्रमांक अमरेशपुरींचा. काम तसं फारसं नाही, पण यमदूत असाच असला पाहिजे, असं वाटू लागतं. बोलताना पापणी हलू देत नाहीत. इनेज्ची भूमिका सुलभा देशपांडे कसून करतात. इस्टेल्ला कुरवाळीत असताना त्यांच्या चेहऱ्यावर येणारे भाव पुरुषालाही लाजवतील. मराठी स्त्री–कलावंताने या तऱ्हेची भूमिका करावी, हेच एक मोठे धाडस ! सत्यदेव दुबे गार्सन् ठाकठीक उभा करतात, पण त्यांच्या बोलण्याची विशिष्ट लकब समजण्यास थोडी कठीण.

आधीच सर्व नाटक एक मोठे रूपक. त्यातून प्रत्येक व्यक्तिरेखा भारतीय रंगभूमीला सर्वस्वी अपरिचित. नाटकाचा प्रेक्षकवर्ग बराचसा उत्तर हिंदुस्थानी–गुजराती–मराठी. त्यामुळे इंग्रजी चित्रपटाप्रमाणे काही काही वाक्ये अलगद डोक्यावरून जातात. तरीही सारांश इतका मोठा, की प्रत्येकाने जरूर समजून घ्यावा. नाटकाची मर्यादा दीड तासाची; पण बाहेर आल्यावर कित्येक तास प्रेक्षक विचार करीत राहतो–जे पाहिलं त्याचा–जे सूचित होतं त्याचा– सतत पाच मिनिटं आलिंगन पाहूनही शरीर तापलं कसं नाही याचा.

## कलंदर कलावंत– श्री. दुबे

नाटकाचे नेपथ्य साधेच, पण नरकाचा आभास उत्पन्न करणारे आहे. नाटकाचे भाषांतर आणि दिग्दर्शन श्री. दुबे यांचे. M. A. (English) झाल्यावर लट्ठ पगाराची नोकरी करण्याऐवजी रंगभूमीसाठी हा कलावंत काहीसे कलंदर जीवन जगतो आहे. त्याच्या पहिल्याच प्रयत्नाने सर्वांना हादरा बसावा.

प्रत्येक मराठी नाट्यरसिकाने हे नाटक एकदा जरूर पाहावे. मराठी माणसाला अभिमान वाटण्याजोगी गोष्ट म्हणजे कु. अलकनंदा समर्थ आणि सौ. सुलभा देशपांडे (पूर्वीच्या कु. सुलभा कामेरकर) हे दोनही स्त्री कलावंत मराठी आहेत. हिंदी रंगभूमीवरील त्यांची ही बहुमोल कामगिरी उपेक्षिली जाता कामा नये.

**प्रा. यशवंत कानिटकर**

• • •


# भिंतीच्या तुंबड्या

**● अराष्ट्रीय चिवडा ?**

चिवडा खाणे राष्ट्रीयत्वाचे लक्षण आहे, की भजी खाणे ? सकाळी फिरायला जाणे निधर्मीपणाशी सुसंगत आहे, की संध्याकाळी ? रमी खेळल्याने समाजवादी समाजरचनेला पाठिंबा मिळतो की नाही ? अन् शास्त्री-सरकारचे हात बळकट करायचे असतील, तर पोस्टाची तिकिटे जमविण्याखेरीज अन्य मार्ग आहे काय ? प्रश्न गंभीर आहेत. काहींना ते अर्थहीनही वाटतील; पण तसे नाही महाराजा ! आता हेच पाहा ना, पेकिंगच्या एका वर्तमानपत्रात एका वाचकाचे पत्र प्रकाशित झाले आहे. त्यात तो विचारतो, " मला बुद्धिबळे खेळायला फार आवडते; पण त्यात हत्ती, घोडे, राजा, राणी असतात, म्हणून काही भाई म्हणतात, फार बुद्धिबळं खेळल्याने मनावर सरंजामशाहीचा पगडा बसेल. हे खरे आहे का हो ? " दुसऱ्या एकाने कँटनच्या एका वर्तमानपत्राला पत्र लिहून विचारले, " काय हो, फुले लावणे किंवा मासे पाळणे हे ' बूर्ज्वा ' जीवनाचे लक्षण आहे का ? " एक बाई लिहिते, " माझ्याच कारखान्यात काम करणाऱ्या दुसऱ्या एका बाईबद्दल मला फार जिव्हाळा वाटतो, पण माझे सहकारी म्हणतात, अशा प्रकारचे भावनाशील नाते जुन्या सरंजामशाही समाजात ठीक होते. नवीन समाजात ते बसत नाही. तुमचे संपादकीय मत काय आहे ? "

थोडक्यात म्हणजे चीनमधले तमाम संपादक सध्या " उषा–वहिनींचा सल्ला " देण्यात गुंतलेले दिसतात. प्रस्तुत प्रश्नकर्त्यांना त्यांनी काय सल्ला दिला, याची माहिती उपलब्ध नाही; पण कल्पनाच करायची झाली, तर बुद्धिबळे खेळणाऱ्या बुद्धिमंताला त्यांनी असे सांगितले असेल, की राजा-राणी काढून त्यांच्या जागी च्याव–म्याव ठेव, म्हणजे झाले, पण सगळ्या प्याद्यांचे साम्यवादी शुद्धीकरण झाले, की तिरके चालण्याचा मक्ता कोणाकडे ठेवायचा, हे ठरविणे मात्र जड जाईल. कारण प्रत्येक प्यादे आपल्याला नवीन मिळालेले तिरके डोके वापरायचा हट्ट करायचे.

आता फुले लावायला तशी काही विरोधविकासवादी हरकत नाही; पण माओने लावलेली आधी सुप्रसिद्ध व नंतर कुप्रसिद्ध " शंभर फुले " ज्याप्रमाणे एकदम खच्ची करण्यात आली, त्याप्रमाणे खच्चीकरणाची मात्र तयारी पाहिजे. माशांबद्दल म्हणाल, तर मोठ्या माशाने लहान माशाला कसे गिळले, याचे प्रात्यक्षिक माओवादाच्या विद्यार्थ्यांना दाखविण्यापुरतेच ते पाळावेत. फार तर पाण्यात राहून



माशाशी वैर कसे करावे, हे समजण्यासाठी या माशांचा उपयोग करावा.

आणि अखेर एका माणसाला दुसऱ्या माणसाबद्दल जिव्हाळा, आपुलकी, प्रेम असे काही वाटणे हे निश्चितच नव्या समाजरचनेशी अगदी विसंगत व म्हणून सर्वथैव त्याज्य आहे. नवरा–बायकोने एकमेकांवर प्रेम करणे, यासारखी बुरसटलेली कल्पना जगात कोठलीच नसेल. नव्या जमान्यात नवरा–बायकोचा संसार सुखाचा होणे, हे नवऱ्याने कारखान्यात किती टन पोलाद एका दिवसात तयार केले व बायकोने कापड–गिरणीत किती वार कापड एका तासात विणले, यावरच सर्वस्वी अवलंबून राहायला हवे.

## ● ताजी बातमी, शिळी भाकरी

सकाळच्या चहाबरोबर वर्तमानपत्र नसले, तर चहा बेचव लागतो. चाऊने आफ्रिकेत काय उपद्व्याप केले आहेत, येथपासून कुणाच्या गाईला जुळी वासरे झाली (मराठी जिल्हापत्रांची पेटंट बातमी ?), येथपर्यंत यच्चयावत घडामोडींवरून नजर टाकून मगच ऑफिसच्या तयारीला लागायचे, हा आधुनिक मध्यमवर्गीय माणसाचा नित्यनैमित्तिक्रम आहे, पण आता कराचीहून बातमी आली आहे, की अल्लादित्ता नावाचा भिकारी सकाळ–संध्याकाळ वर्तमानपत्र विकत घेऊन वाचल्याखेरीज भीक मागायला निघत नाही ! या अल्ला ! काय ही जिज्ञासा ! अमूक एका दिवशी भीक किती मागायची व ती मागताना आर्थिक परिस्थितीच्या कुठल्या पैलूवर विशेष प्रकाशझोत टाकायचा, हे कळण्यासाठी त्या दिवशीचा 'जीवनमान निर्देशांक' काय आहे व जागतिक राजकीय परिस्थितीमुळे शेअर-बाजारात किती तेजी-मंदी आली आहे, हे पाहण्याचा कोण हा कटाक्ष !

हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशात " भिकाऱ्याला पैसा दे भगवान " म्हणून पोटावर थापडी मारली किंवा चांगले असलेले डोळे झाकून " आंधळ्यावर दया करा, " म्हटले की काम भागते, पण पुढारलेल्या पाकिस्तानात आता तसे राहिलेले दिसत नाही. तिकडचे लोक यापुढे भिकाऱ्यांच्या डोळेझाकीकडे डोळेझाक करायला तयार नसल्यामुळे अल्लादित्ताच्या सुपीक आणि सुविद्य मेंदूतून ताजी बातमी देऊन शिळी भाकरी काढायची कल्पना निघाली असावी. ●

सुधाकर राजे

## अल्जीरिया आणि बेनबेला (पृष्ठ १९ वरून चालू)

याशिवाय बुतेक्लिफा व मेदाघिरी हे लष्कराचे दोन प्रतिनिधी मंत्रिमंडळात होते. ते बुमेदियन यांच्याच तंत्राने चालत. बुतेक्लिफा यांच्याकडे सुरवातीस प्रवास व नंतर परराष्ट्रखाते आणि मेदाघिरी यांच्याकडे गृहखाते होते. यापैकी मेदाघिरी यांच्याकडील गृहखाते काढून घेऊन बेनबेला यांनी ते स्वतःकडे घेतले व बुमेदियन यांची सत्ता तेवढ्यापुरती कमी केली. आपल्याशी एकनिष्ठ असलेल्या अधिकाऱ्यांनाच अधिकारावर ठेवून बुमेदियन यांनी लष्करावर आपली निरंकुश सत्ता प्रस्थापित केली होती. लष्कराचे वजन वाढू देणे धोक्याचे आहे, त्यातून एक दिवस आपल्या सत्तेलाच धोका निर्माण होईल, याची बेनबेला यांना कल्पना होती. हे वर्चस्व कमी करण्यासाठी त्यांनी निरनिराळे उपाय योजले. बुमेदियन यांच्या निरंकुश सत्तेला पायबंद घालण्यासाठी लष्करात जनरल स्टाफ निर्माण करण्याचा प्रयत्न बेनबेला यांनी केला, पण बुमेदियन यांनी या सूचनेस विरोध केला. लष्करात बुमेदियन यांचे महत्त्व कमी करण्यासाठी त्यांनी आणखी एक उपाय योजला. लष्करापेक्षा पक्ष श्रेष्ठ आहे व पक्षाचे नियंत्रण लष्करावर असले पाहिजे, असा विचार त्यांनी मांडला आणि सैनिकांना राजकीय शिक्षण देण्यासाठी लष्करात राष्ट्रीय लोकशाही आघाडीची केंद्रे निर्माण केली. लष्कर पूर्णपणे बुमेदियन यांच्या नियंत्रणाखाली होते, तेव्हा आपल्या बाजूने वेळ पडल्यास तिचा उपयोग करून घेता येईल, अशी लोकसेना बेनबेला यांनी संघटित केली.

### बेनबेला आणि शास्त्री

परराष्ट्रांच्या नेत्यांशी मैत्रीचे व आपुलकीचे संबंध कसे जोडावे, याची हातोटी बेनबेला यांना चांगली साधली होती. कैरोत गेल्या वर्षी बेनबेला व भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची भेट झाली, ती अनेकवेळा पुढे ढकलावी लागली होती. याचे कारण काय तर मी तुमच्यापेक्षा वयाने लहान आहे, तेव्हा 'मी तुमच्या भेटीस प्रथम येणार' असा आग्रह बेनबेला यांनी धरला. शास्त्रींनी त्यांना उत्तर दिले–तुम्ही अधिकारपदाने मोठे आहात. तुम्ही अध्यक्ष तर मी केवळ पंतप्रधान आहे. तेव्हा मीच तुम्हाला प्रथम भेटायला हवे. पण बेनबेलांनी ते ऐकले नाही व अखेर त्यांनीच प्रथम शास्त्रींची भेट घेतली.

## डाव उलटविला

आशिया–आफ्रिका परिषद झाल्यानंतर बुमेदियन यांना अधिकारपदावरून दूर करण्याचा बेनबेला यांचा विचार होता असे म्हणतात. बुमेदियन यांना त्याची कुण-कुण आधीच लागली व परिषद होण्याची वाट न पाहता बेनबेला यांना पदच्युत करून त्यांनी सत्ता हाती घेतली व बेनबेलांवर डाव उलटविला. काही ठिकाणी बेनबेलांचे बाजूने निदर्शने झाली, पण लष्कर पूर्णपणे बुमेदियन यांच्या नियंत्रणाखाली असल्याने त्यांच्या नव्या राजवटीस धोका निर्माण झाला नाही व नजीकच्या काळात तो निर्माण होण्याची शक्यता दिसत नाही. अर्थात ज्या अल्जीरियन जनतेने फ्रेंच साम्राज्या-सत्तेविरुद्ध झगडून विजय मिळविला, तिला बुमेदियन यांची लष्करी हुकूमशाहीही उलथून पाडणे अशक्य नाही, पण जनतेला संघटित करणारा बेनबेला यांच्यासारख्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा दुसरा नेता आज दिसत नाही. बेनबेलांचे विरोधक बुमेदियन यांनाच पाठिंबा देत आहेत.

बुमेदियन यांच्याशी सत्तास्पर्धेत बेनबेला यांना अपयश आले, याचे कारण लष्कराला समबळ असा राजकीय पक्ष संघटित करण्यात ते यशस्वी होऊ शकले नाहीत. त्यांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य आघाडीत पूर्वीच्या क्रांतिकारकांपैकी फार थोडे लोक होते. यामुळेच देशापुढील अंतर्गत प्रश्न ते यशस्वीपणे सोडवू शकले नाहीत. समाजवादाच्या घोषणा त्यांनी केल्या, काही तात्पुरते उपायही योजले, पण दूरगामी निश्चित कार्यक्रम देशापुढे ठेवला नाही. त्यामुळे आर्थिक अडचणी कायमच राहिल्या. बेकारांची संख्या एक लाखावर गेली.

## परराष्ट्रसंबंधाकडे अधिक लक्ष

बेनबेला यांनी अंतर्गत प्रश्नांपेक्षा परराष्ट्रसंबंधाकडेच अधिक लक्ष दिले. हे खाते त्यांनी अत्यंत कौशल्याने हाताळले. आफ्रिकेच्या नेत्यांत नासर यांच्या खालोखाल प्रतिष्ठा त्यांनी मिळविली होती. क्यूबाशी तर त्यांनी एवढे मैत्रीचे व निकटचे संबंध जोडले होते, की बुमेदियन यांच्या उठावाचा निषेध करणारे आणि बेनबेला यांना उघड पाठिंबा दर्शविणारे पत्रक क्यूबाचे नेते कॅस्ट्रो यांनी काढले. वर म्हटल्याप्रमाणे आशिया–आफ्रिका परिषदेने ही प्रतिष्ठा अधिकच वाढली असती.

बेनबेला हुकूमशहा होते असा आरोप बुमेदियन यांनी केला आहे. सर्व महत्त्वाची अधिकारपदे त्यांनी आपल्या हाती एकवटली होती हे खरे, पण हिटलर, स्टॅलिन ज्या पद्धतीचे व ज्या अर्थाने हुकूमशहा होते, त्या अर्थाने ते हुकूमशहा होते, असे म्हणता येणार नाही. त्या अर्थाचे ते हुकूमशहा असते, तर लष्कराचे नियंत्रणही त्यांनी प्रथमपासून आपल्याकडेच ठेवले असते व बुमेदियन यांना त्यांच्याविरुद्ध उठाव कर-ण्याची संधीच मिळाली नसती. तसेच प्रतिस्पर्ध्यांना केवळ अधिकारावरून दूर करून किंवा अटक करून न थांबता त्यांनी त्यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली खटले



**क्रांतीची दैवते एका रात्रीत बदलतात...**

**बेनबेला यांच्या तसबिरीचे उच्चाटन...**

मरून देहांत शासन दिले असते. याचा अर्थ बेनबेला लोकशाहीवादी होते असे नव्हे. त्यांचा बहुतेक कारभार एकतंत्रीच असे. निरनिराळ्या प्रश्नांवर स्वतःच निर्णय घ्यावयाचे, सहकाऱ्यांचा सल्ला क्वचितच घ्यावयाचा अशी त्यांची पद्धत होती.

बेनबेलांवर देशद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरण्यात येईल, असे बुमेदियन यांनी जाहीर केले. बेनबेलांच्या हातून चुका झाल्या असतील, पण देशद्रोह ज्याला म्हणता येईल असे काही त्यांनी केले असावे असे दिसत नाही आणि ज्या काही चुका घडल्या, त्यांना बेनबेलांच्या इतकेच बुमेदियन जबाबदार आहेत. त्यांनी त्याच-वेळी विरोध का केला नाही ? आपल्या प्रतिस्पर्ध्याचा काटा काढण्यासाठी देशद्रोहाच्या आरोपाखाली त्यांच्यावर खटले भरावयाचे, ही हुकूमशहांची नेहमीचीच पद्धत असते. तिचा अवलंब बुमेदियन यांनी केला आहे.

बेनबेला यांच्या पदच्युतीने आंतरराष्ट्रीय संबंधाचे दृष्टीने अल्जीरियाचे नुकसा-नच होण्याचा संभव आहे. कारण बुमेदियन केवळ लष्करी नेते म्हणून परिचित आहेत. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात बेनबेला यांच्यासारखी प्रतिष्ठा त्यांना अजून मिळालेली नाही.

कर्नल बुमेदियन यांनी स्वतःकडे पंतप्रधानपद घेतले आहे. अल्जीरियाचा तिसरा स्वातंत्र्यदिन ५ जुलैला साजरा झाला. त्या दिवशी ही घोषणा झाली. स्वातंत्र्यदिनात नेहमीसारखा उत्साह यावर्षी दिसून आला नाही. बेनबेलाविरोधी उठावाला

लोकांचा पाठिंबा होता असे दिसत नाही, कारण तसे असते तर स्वातंत्र्यदिन त्यांनी यावर्षी उलट अधिक उत्साहाने साजरा केला असता.

## कम्युनिस्टविरोधी उठाव

बुमेदियन यांच्या राजवटीस चीनने ताबडतोब पाठिंबा दर्शविला. रशियाने या प्रश्नावर मौन पाळले. क्यूबाने बेनबेला यांना उघड पाठिंबा दिल्याचा उल्लेख वर केलाच आहे. पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राष्ट्रांनीहि 'कम्युनिस्टविरोधी उठाव' असे या उठावाचे वर्णन केले. सरकार, अधिकारारूढ एफ् एल् एन पक्ष आणि वृत्तपत्रांतून कम्युनिस्टांची हकालपट्टी करण्यात आली आहे. "उठाव कम्युनिस्टविरोधी व समाजवादविरोधी आहे," असे मत 'एल युनिट' या इटालियन कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रात व्यक्त करण्यात आले. कम्युनिस्ट राष्ट्रे त्यांच्या चष्म्यातून या घटनांकडे पाहतात असे म्हणता येईल, पण ब्रिटिश पत्रांबद्दल तर तसे म्हणता येणार नाही. हा कम्युनिस्टविरोधी उठाव आहे, हे उघड आहे असे मत ब्रिटिश पत्रांनीही व्यक्त केले आहे.

अल्जीरियाचे नवे सरकार समाजवाद आणण्यासाठीच झटेल, पण हा समाजवाद अल्जीरियाच्या परिस्थितीशी व परंपरेशी जुळणारा असेल असे नवे नेते बुमेदियन यांनी सांगितले. हे शब्द संदिग्ध आहेत. बेनबेला परकीय समाजवाद लादण्याचा प्रयत्न करीत होते, हा गर्भित आरोप त्यात आहे, पण या आरोपात तथ्य नाही. समाजवाद आणण्याचे बाबतीत कोणत्याही कम्युनिस्ट राष्ट्राचे अंधानुकरण बेनबलांनी केले नाही. क्यूबाशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते, पण अल्जीरियाचा त्यांनी क्यूबा होऊ दिला नाही. स्वतःच्या कल्पनांप्रमाणेच समाजवाद आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या कल्पना संदिग्ध होत्या. दूरगामी निश्चय, कार्यक्रमाचे स्वरूप बेनबेलांनी त्यांना दिले नाही, अशी टीका त्यांच्यावर उजवे गट करीत होते व तीच अधिक बरोबर होती.

बुमेदियन यांच्या राजवटीची पावले अजून दिसावयाची आहेत, पण परराष्ट्र-राजकारणापेक्षा अंतर्गत प्रश्न सोडविण्यावर ते अधिक भर देणार असे दिसते, पण आतापर्यंतच्या त्यांच्या भाषणावरून त्यांच्यापुढे काही निश्चित कार्यक्रम असल्याचे दिसत नाही.





गजानन शिर्केनिर्मित

मराठी प्रेक्षकांचे

नवे शिरकाण !

सवाल माझा ऐका...

# कधी करिशी लग्न माझे ?

संपादक, 'माणूस'

स. न. वि. वि.

पत्र लिहिण्यास कारण की, डोके-दुखीवर रामबाण उपाय या नावे हल्ली ॲना-सिन-ॲस्प्रो अशी पुष्कळ औषधे मिळतात. त्या औषधांचा एवढा प्रचंड खप का होतो याविषयी माझ्या मनात विलक्षण कुतुहल होते. परवा विजय चित्रमंदिरा-बाहेरील एका केमिस्टच्या दुकानात या औषधासाठी फार मोठी रांग लागलेली होती. कुतुहलाने विचारले, 'का बुवा'?

त्यांनी समोरच्या 'कधी करिशी लग्न माझे' या आडदांड चित्रफलकाकडे रागावून बोट दाखवीत म्हटले, 'आम्ही हा चित्रपट पाहिला !'

या यशाबद्दल आपण यशवंत पेठकर यांचे अभिनंदन करू या. कारण मनात आणूनही मराठी भाषेत इतका एकवटलेला मूर्खपणा यापूर्वी कुणी केल्याचे ऐकि-वात नाही.

एखाद्या चित्रपटाचे व्यावहारिक यश एखाद्या शहाण्या माणसाला गाढव करून सोडते. 'मोलकरीण' चालला, मग यशवंत पेठकरांनी तरी काय करावे ! त्यांनी लगेच उतारा दिला. पहिल्याच दिवशी, टीकाकारांनी नव्हे, तर प्रेक्षकांनी थिएटर-वरच धिक्कार करावा, असा चित्रपट त्यांनी निर्माण केला. उगाच उद्याचा हवाला नको अन् यशाचे लाभलेले वलयही आपल्याभोवती नको. खाली बाकी शून्य !

पेठकरांना एक विनवणी कराविशी वाटते. यापुढे त्यांनी केवळ मराठी भाषेत चित्रपट काढू नयेत. हिंदी, तामीळ, गुजराथी, कानडी ! केवळ मराठी माणसाने असे काय बरे पाप केले आहे की, त्याच्याच वाट्याला अशी दुःखे यावीत ? इतर प्रांतांनाही या दुःखात त्यांनी वाटेकरी करावे अन् आमचे दुःख थोडे हलके करावे.

श्री. यशवंत पेठकर त्या चित्रपटाचे सबकुछ आहेत. लेखक, संवादलेखक, पटकथा लेखक, दिग्दर्शक. आपल्या कर्तबगारीत त्यांना वाटेकरी चालत नाही हेच बरे आहे. ललित वाङ्मयाशी लेखक या नात्याने यांचा कधीकाळी संबंध आला असेल, अशी चुकूनसुद्धा शंका येत नाही. या चित्रपटाची कथा देऊन आमच्या दुःखात वाचकांना सहभागी करता येईल अशी मनी इच्छा होती, पण अनेक यत्न करून ती लिहिता येईना ! कारण सुसंगत अशी एकही घटना या चित्रपटात घडत नाही. दिग्दर्शकाला सांगायचे असते एक, संवाद भरकटतात दुसरीकडे, कॅमेऱ्याचे तोंड तिसरीकडे असा कुणाचा कुणाला मेळ नाही.

एक प्रौढ मुलीचे लग्न होत नाही याचे कारण, लेखकाच्या मते ती विचित्र कारणास्तव भराभर मुले नाकारीत सुटते आणि अखेरी कुंवार राहण्याचा व समाजाकडून चेष्टा करून घ्यायचा प्रसंग तिच्यावर येतो. जिथे हा चित्रपट तयार झाला त्या कोल्हापुरात जयश्री गडकरच्या रूपाला शोभेल असा राहू द्या, पण साधारण सभ्य दिसेल. सर्व इंद्रियांनी धड असेल, असा एकही एक्स्ट्रॉ पुरुष नट मिळू शकत नसावा ! कारण या मुलीला पाहायला येणारे सर्व उमेदवार नवरे चुकून लग्न झाले तरी नंतरही नाकारावेत, याच लायकीचे दाखवले आहेत. म्हणजे असले नवरे नाकारणे हा दुर्गुण तर नव्हताच, पण एक अपरिहार्य बाब होती. या मुलीबद्दल राग येण्याऐवजी सहानुभूती वाटते. पुरुषजातीत इतकी कुरूपता पेठकरांनी कुठून शोधून काढली देव जाणे ! म्हणजे प्रदर्शन मुलीच्या उद्धटपणाचे नसून दिग्दर्शक–लेखकांच्या मूर्खपणाचे आहे.

## भयानक नृत्ये

या चित्रपटात आरंभीला काही भडक नृत्ये दाखविली आहेत. मला वाटते लोकप्रियतेचा मसाला म्हणून हलवण्याजोगे जे जे असेल ते ते हलवीत कॅमेऱ्यापुढे हावभाव करणे व त्याला नाच म्हणणे असा पायंडा सुरू झालेला दिसतो. या चित्रपटातील नृत्यातील नर्तिका इतक्या महाभयंकर आहेत, की दंडकारण्यातील राक्षसणींचे एक लोकनृत्य चुकून या चित्रपटात आले असावे अशी मला शंका आली. त्यात नायिका मधेच रिलीफ म्हणून येते अन् मूर्च्छा येत असता प्रेक्षकाच्या जिवात जीव येतो, पण ही नायिका येथे एवढी स्वच्छंदी वागताना दिसते अन् बोलते–तेही एवढे अगोचरपणाचे की अशा मुलीच्या आयुष्यात हिचे लग्न कसे होईल हा प्रश्न मुळी निर्माणच होऊ शकत नाही ! अशा चवचाल अन् देखण्या मुली भलतेच प्रश्न उलट

उत्पन्न करतात ! आज समस्या आहे ती भले संस्कार झाल्यामुळे किंवा पुरुषात मिसळण्याची संधी नसलेल्या मुलीला तिच्या रुचीनुसार नवरा शोधण्याची सोय नाही ही.

हिंदी चित्रपटातही मूर्खपणाचा सुकाळ असतो. पण तिथे एक बरे असते, की सामाजिक आशय, प्रश्नांची सोडवणूक, 'प्रॉब्लेम्स' वगैरेची मानगड नसते. मराठी डायरेक्टला 'प्रॉब्लेम' झेपत नाही अन् समजत नाही, पण चित्रपटात सामाजिक संदेशाचे पिलू हवेच हवे. परिणामी हत्तीच्या शेपटीला उंदराचे पिल्लू लोंबकळावे तसे गाढवपणाच्या आडोशाला 'प्रॉब्लेम'चे पिल्लू कुठेतरी लोंबकळत असते.

'चित्रपटात गाणी असूच नयेत', असे हा चित्रपट पाहून आलेले प्रेक्षक ओरडून सांगतात. सुराचा पत्ता नाही अन् अर्थ तर शोधून गवसत नाही, अशी ही गाणी घालण्यापेक्षा—संगीत शिक्षेपेक्षा गद्य शिक्षा बरी—या अभिप्रायाशी प्रेक्षक पोहोचतो. पी. सावळाराम यांची गाणी ऐकताच मला 'पी' हे आद्याक्षर नसून अवस्थादशक क्रियापद असावे असे वाटू लागले. 'आम्ही पॉनिटेल सोडणार' अशी भयानक गीते ऐकवतील का ? या चित्रपटातील गाण्यापेक्षा 'सकाळ'च्या अग्रलेखाला चाल लावली तर तोदेखील अधिक गोड लागला असता. या चित्रपटातल्या पहिल्या गाण्याने चित्रपटाचा ज्याने बोलपट केला, त्याचा आत्मा स्वर्गात (आणि आमचा इथे) तळमळला.

मराठी चित्रपट धंदा मोडकळीस आला असला तर हे असले चित्रपट, असले संगीत नियोजक—दिग्दर्शक, लेखक—गीतकार त्याला कारणीभूत आहेत. प्रेक्षकाला काहीही चालते, अशी या मूर्ख मंडळींची समजूत आहे. त्याचप्रमाणे 'सिनेमाचे टेक्निक' नाही समजायचे तुम्हास, असे म्हणून भल्याभल्यांच्या कथांची ही मंडळी वाट लावतात. बाकी चहा आणून देणे, लाईटस् हलवणे, नटीची कुत्री सांभाळणे, स्टेशनवर जागा धरून ठेवणे अशी असंख्य महत्त्वाची कामे करता करता पटकथा, दिग्दर्शन अशी क्षुल्लक कामे करायला यांना पुरेसा वेळ तरी मिळणार कसा ?

या चित्रपटात चांगले काही असेलच तर रणजित बुधकर यांचा अभिनय. या गुणी नटाची कदर कुणी केलेली नाही आणि उणीपुरी ३० वर्षे या लाइनीत काढून हा माणूस तसा वळचणीलाच उभा आहे.

अतिशय कळकट, दरिद्री, कलाशून्य, विसंगत अशा या चित्रपटाच्या निमित्ताने सर्व संबंधितांनी आत्मपरीक्षण करावे, तरच काही तरणोपाय आहे.

आपला

**एक फसलेला प्रेक्षक**

# □ कुटुंबनियोजन

## पाच टक्के महिला केंद्रांचा लाभ घेतात

कुटुंबनियोजनाचा प्रचार अलीकडे मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे, प प्रत्यक्षात त्याचा कितपत परिणाम होतो, किती स्त्रिया या केंद्रांचा सल्ला घेतात त्या सल्ल्याचा उपयोग करतात या दृष्टीने बृहन्मुंबईत नुकतीच एक पाहणी करण्या आली. प्रचाराच्या मानाने फारच थोड्या स्त्रिया या केंद्रांचा फायदा घेत असल्या त्यात दिसून आले. बृहन्मुंबईतील एकूण विवाहित महिलांपैकी फक्त पाच टक्के महिलांनी या केंद्रांवर नावे नोंदविल्याचे आढळून आले.

'दि डेमोग्रॅफिक ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर' या संस्थेने 'दि फॅमिली प्लॅनिं ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर' या संस्थेच्या सहकार्याने ही पाहणी केली. १९४९ ते १९५९ हा दहा वर्षांचा कालखंड पाहणीसाठी निवडण्यात आला. सार्वजनिक संस्थां तर्फे चालविली जाणारी ५३ केंद्रेच या पाहणीत अंतर्भूत होती. या ५३ केंद्रांपैकी २९ महापालिकेतर्फे, ५ फॅमिली प्लेनिंग असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेतर्फे, ७ केंद्रीय सरकारतर्फे आणि १२ इतर संस्थांतर्फे चालविली जात होती. १९४९ ते १९५९ या दहा वर्षांच्या काळात ३०,२७९ स्त्रियांनी केंद्राकडे नावे नोंदविली. १९५९ मध्ये मुंबईतील विवाहित स्त्रियांची संख्या ५,८४,००० होती; म्हणजे सुमारे पाच टक्के विवाहित स्त्रियांनीच केंद्रांकडे नावे नोंदविली होती.

नावे नोंदविलेल्या स्त्रियांत पांढरपेशा सुशिक्षित स्त्रियांची संख्या जास्त होती, हे खरे, पण कारखान्यांतील कामगार, कमी उत्पन्नाचा गट आणि अशिक्षित स्त्रियांचे प्रमाणही काही थोडे नव्हते. कमी उत्पन्नाच्या गटातील स्त्रियांपैकी ५२ टक्के स्त्रिया महिना १५० रु. पेक्षा कमी प्राप्तीच्या कुटुंबातून आलेल्या होत्या आणि एकूण नोंदविलेल्या स्त्रियांपैकी २७ टक्के निरक्षर होत्या.

वयाचे दृष्टीने पाहणी करता असे दिसून आले, की सल्ल्यासाठी आलेल्या स्त्रियांमध्ये ८५ टक्के २० ते ३५ चे दरम्यान होत्या. त्यांच्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक स्त्रियांना तीनपेक्षा कमी मुले होती आणि २·१ टक्के स्त्रियांना मुलेच नव्हती. पती चाळीसपेक्षा अधिक वयाचा व पत्नी पस्तीसपेक्षा अधिक वयाची असेल, तर सल्ला घेण्याचे प्रमाण कमी होते.

केंद्रांच्या सल्ल्याचा कितपत उपयोग झाला, यासंबंधी मिळविलेल्या माहितीत असे आढळून आले, की ज्यांनी पूर्वी कोणत्याही साधनांचा वापर केला नव्हता अशा स्त्रियांच्या बाबतीत केंद्राच्या सल्ल्यानंतर गर्भधारणेचे प्रमाण ५० टक्के कमी झाले व ज्यांनी पूर्वी साधने वापरली होती, त्यांच्याबाबतीत ते प्रमाण ४० टक्के कमी झाले.

हेल्थ व्हिजिटरने किंवा सामाजिक कार्यकर्त्याने केंद्राचा उल्लेख केल्यानंतरच कमी शिक्षित किंवा कमी उत्पन्नाच्या गटातील स्त्रिया केंद्राकडे सल्ल्यासाठी आल्याचे दिसून आले. जाहिरातींचा किंवा फलकांचा फारसा उपयोग त्यांच्या बाबतींत झाला नाही. सुशिक्षित व सुखवस्तू स्त्रियांपैकी बऱ्याचजणी मात्र जाहिराती वाचून आल्याचे आढळले. नातलग किंवा मैत्रिणींचे सल्ल्यानुसार आलेल्या स्त्रियांपेक्षा डॉक्टर, हेल्थ व्हिजिटर किंवा सामाजिक कार्यकर्त्यांच्या सल्ल्यानुसार आलेल्या स्त्रिया अधिक मुले असलेल्या होत्या. कुटुंबनियोजनकेंद्रे गर्भपाताच्या बाबतीत मदत करतात, असा चुकीचा समज काहींचा असल्याचे पाहणीत दिसून आले. केंद्रांची वेळ वाढवावी. ही केंद्रे साधारणतः दुपारी उघडी असतात, पण पुरुषांनाही त्यांचा फायदा घेता यावा यासाठी त्यांच्या सोयीचीही वेळ ठेवावी, अशा सूचना अहवालात केल्या आहेत.

### पहिले केंद्र र. धों. कर्वे यांचे

मुंबईत पहिले संततिनियमनकेंद्र डॉ. र. धों. कर्वे यांनी १९२५ साली काढले. मोफत कुटुंबनियोजनकेंद्रे काढण्याचा ठराव महापालिकेने १९४५ साली केला आणि दादर व गिरगावात १९४७ साली पहिली दोन केंद्रे स्थापन झाली. श्रीमती धनवंती रामराव यांच्या नेतृत्वाखाली फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया ही संस्था जुलै १९४९ मध्ये स्थापन झाली व तिने कुटुंबसुधारकेंद्र सुरू केले. यानंतर भगिनी समाज, अखिल भारतीय महिला परिषद, वगैरे संस्थांनीही केंद्रे काढली. १९५२ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय कुटुंबनियोजन परिषदेने या चळवळीला आणखी चालना मिळाली. पहिल्या योजनेनें शहरांत १२५ व खेड्यांत २१; दुसऱ्या योजनेन शहरांत ५४९ व खेड्यांत ११०० आणि तिसऱ्या योजनेने शहरांत २१०० व खेड्यांत ६१०० केंद्रे स्थापन करण्यात आली. आता चौथ्या योजनेची आखणी करताना या पाहणीचे निष्कर्ष उपयुक्त ठरतील.

## □ स्मोकर्स डायल

### धूम्रपानविरोधी मासलेवाईक आघाडी

हल्ली धूम्रपानविरोधी मासलेवाईक आघाड्या पाश्चात्त्य देशांतून स्थापन होत आहेत. कॅनडातील टोरोन्टोमध्ये सिगारेट ओढण्यापूर्वी ६३३–६४८४ या नंबरला फोन करा, असे फलक तुम्हांला दिसतील. धूम्रपान करावयास उत्सुकलेला माणूस ' काय ही कटकट ! ' म्हणत या नंबरला फोन करील. बहुधा हा फोन सदैव

' एंगेज ' असतो. सुदैवाने फोन एंगेज नसला, तर तुम्हांला पलीकडून एक ध्वनि-मुद्रित केलेला आवाज ऐकू येईल. ' सिगारेट ओढू नका, ते ' अपायकारक आहे ', असे सांगून धूम्रपान कसे थांबविता येईल, याच्या काही पद्धती निवेदन केल्या जातील. सुमारे ९० सेकंद हा प्रकार चालेल व मग फोन आपोआप बंद होईल. आहे की नाही प्रचाराचा हा अजब नमुना !

' स्मोकर्स डायल ' नावाची एक संघटनाच सेव्हन्थ-डे अॅडव्हेन्टिस्ट्स चर्चच्या वतीने कॅनडात स्थापन करण्यात आली आहे. ज्यांना धूम्रपानाची सवय सोडून द्यावयाची आहे त्यांना ही संघटना मदत करते. १९६३ साली या ' डायलप्लॅन 'ला आरंभ झाला आणि ही योजना दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत आहे.

या योजनेच्या यशस्वीतेमुळे ओस्नावाव कॅलगिरी येथील संघटनांनीदेखील ही पद्धत सुरू केली असून, या वर्षाच्या शेवटी कॅनडातील बहुतेक सर्व प्रमुख शहरांतून ही अभिनव योजना सुरू केली जाणार आहे.

अमेरिकेतील लोकही या बाबतीत काही कमी उपद्व्यापी नाहीत. गेल्या १७ जून रोजी अमेरिकेच्या सिनेटने एक मोठा विचित्र ठराव संमत केला आहे. सिगा-रेट उत्पादक कंपन्यांनी प्रत्येक पाकिटावर सिगारेटच्या संभाव्य धोक्याची माहिती दिली पाहिजे, हे ते विधेयक होय. आहे की नाही गंमत ! माल विकणाऱ्यांनीच आपल्या माल वापरण्यापासूनचे धोके सांगावयाचे, हे कोणत्या व्यापारशास्त्रात बसते, तेच समजत नाही. अमेरिकन सिगारेट–उत्पादक याविरुद्ध चळवळ उभारणार असल्याची वार्ता आहे.

धूम्रपानाच्या अतिरेकी सवयीमुळे अमेरिकेत दरवर्षी १,२५,००० जण मृत्यू पाव-तात, अशी माहिती नुकतीच सर्जन जनरल डॉ. लूथर एल् टेरी यांनी दिली आहे. जनतेला सिगारेट ओढण्यापासून परावृत्त करण्यातील एक मोठी अडचण म्हणजे सिगारेटच्या भडक व आकर्षक जाहिरातींचा वाढता प्रभाव होय, असेही त्यांनी सांगितले.

## ● दीड कोट बालकामगार

भारतात पंधरा वर्षांखालील वयाचे दीड कोट बालकामगार आहेत. देशात एकूण कामगारांची संख्या १८ कोट ८६ लाखांवर असून, त्यात बालकामगारांचे प्रमाण साडेसात टक्के आहे. शहरांपेक्षा खेड्यांत शेती व इतर घरगुती कामांसाठी मुलांचा अधिक उपयोग करून घेतला जातो. शेतीवर काम करणाऱ्या मुलांची संख्या एक कोट पाच लाखांपेक्षा थोडी अधिक आहे. शहरांतून मुख्यतः घरगुती कामांसाठी नोकर म्हणून मुलांना नेमले जाते. रजिस्टार जनरल ऑफ इंडियाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात कामगारांची वयाचे दृष्टीने वर्गवारी प्रथमच केलेली असून, त्यात ही माहिती दिली आहे.

● ● ●

| | |
|---|---|
| **लालमहाल** | **प्रतापगड** |
| **पन्हाळगड** | **राजगड** |
| **पुरंदर** | **आग्रा** |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन |
| रा ज हं स | प्र का श न, पु णे. |

MANOOS (Fortnightly) : 15 July 1965 : 30 Paise : Regd. No. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



Parkerson/srp/12

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणे ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर